१६०८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

सं. क्र. ३५८

REFBK-0000366

नं. २५३

महाराष्ट्राचें सर्वांगसुंदर आवडतें मासिक

दा २२७९

# मधुकर

REFBK-0002241

संपादकः—विश्वनाथ नारायण लेले, बी. ए.

ह्या मासिक पुस्तकांत अनेक सुप्रसिद्ध लेखकांचे बोधपर, सुन्दर, स्फूर्तिदायक व प्रासादिक लेख, गोष्टी, निबंध, चरित्रें, कविता प्रसिद्ध होतात. तसेंच एक सुन्दर चालू कादंबरी नेहमींच्या अंकांतून देण्यांत येते. शिवाय वर्गणीदारांना वर्षांतून दोन वाङ्मयरत्नें भेटीदाखल बक्षीस देण्यांत येतात. वर्षारंभ जुलै किंवा जानेवारीपासून. गेल्या जुलैमध्यें '**माझा सम्राट !**' ही नितांतरमणीय कादंबरी बक्षीस देण्यांत आली असून येत्या जानेवारींत '**भविष्य काळ**' ही पहिल्या कादंबरीच्या उपसंहारात्मक कादंबरी बक्षीस देण्यांत येणार आहे. नवीन वर्षारंभापासून अंकांत सर्वतोपरी अनेक सुधारणा करण्यांत यावयाच्या असून 'लोकनायक' ही वरील दोन्ही कादंबऱ्यांचे कर्ते श्री. वि. वा. हडप यांनीं मुद्दाम मधुकराकरितां लिहिलेली आजच्या देशकालपरिस्थितीवर उज्वल व उद्बोधक प्रकाश पाडणारी हृदयस्पर्शी कादंबरी सुरू व्हावयाची आहे. वा. व. ट. ख. सह रु. ३.

वा. नं. २२३५

म्यानेजर मधुकर, मुंबई नं. ४.

बाल्यांतून तारुण्यांत पदार्पण करतांना व केल्यावर मानवी जीविताचें साफल्य कसें करावें, उच्च शील व सच्चरित्र कसें बनवावें व जन्माच्या सार्थकाचें अंतिम मोक्षमय ध्येय ठरवून संसार करतां करतां 'माणूस' कसें बनावें, हें शिकवणारी, चित्ताला थरारून सोडणारी व प्रौढ विद्यार्थी-विद्यार्थिनींची अत्यंत आवडती होऊन बसलेली अशी मराठी भाषेंतील अगदीं नवीन व अगदीं पहिली सामाजिक कादंबरी ती हीच—

# माझा सम्राट !

लेखक,

**विठ्ठल वामन हडप.**

केसरी, नवा काळ, मौज, आनंद व इतर वृत्तपत्रें आणि मासिकें यांनीं व अनेक विद्वानांनीं ह्या कादंबरीची मुक्तकंठानें प्रशंसा केली असून कादंबरी-लेखनाचा उद्देश यशस्वितेनें तडीस गेल्याची साक्ष दिली आहे. किंमत १ रु. ट. ख. निराळा.

---

'**माझा सम्राट !**' पेक्षांही सर्वस्वी कांकणभर चढ अशी सदर कादंबरीच्या उपसंहारात्मक व सदर लेखकानेंच लिहिलेली

# भविष्य काळ.

ही कादंबरी सध्यां छापत असून जानेवारीमध्यें प्रसिद्ध होईल. किं. १ रु. शिवाय ट. ख.

म्यानेजर मधुकर,
मुंबई नं. ४.

ग्रंथ संग्राहक ... क्र. २२.७८

महाराष्ट्रगौरव ग्रंथमाला–पुस्तक १ लें.

# मौलाना महंमदअली

(चरित्र)

ग्रंथ संग्रहालय

लेखक,
विठ्ठल वामन हडप.

संपादक,
विश्वनाथ नारायण लेले, बी. ए.
महाराष्ट्रगौरव ग्रंथमाला,
गिरगांव, मुंबई.

(प्रथमावृत्ति)

किंमत आठ आणे. } नोव्हेंबर १९२३ { माळेच्या ग्राहकांना ६ आणे.

प्रकाशक:—
विश्वनाथ नारायण लेले, बी. ए.
महाराष्ट्रगौरव ग्रंथमाला,
गिरगांव, मुंबई.

मुद्रक:—
विनायक परशुराम नागपूरकर,
राष्टसेवक प्रिंटिंग प्रेस,
६ खटाव बिल्डिंग,
गिरगांव मुंबई.

# महाराष्ट्रगौरव ग्रंथमाला

ग्रंथ संग्रह
नं.
आ.

## उद्देश व नियम

ह्या मालेंतून विविध विषयांवरील, महाराष्ट्र सारस्वताला गौरवास्पद असे ग्रंथ सामान्यतः दर दोन महिन्यांनीं एक याप्रमाणें प्रसिद्ध करण्यांत येतील.

प्रत्येक पुस्तक सामान्यतः १०० ते ४०० पृष्ठांचें असेल व साधारणतः प्रत्येक पुस्तकाची किंमत ८ आणे पासून २ रु. पर्यंत असेल.

मालेच्या कायमच्या ग्राहकांना सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतील.

आगाऊ तसें कळविल्यास मालेचें कोणतेंही एखादें पुस्तक ग्राहकानें न घेतल्यास चालेल.

कायमच्या ग्राहकांनीं प्रथम ६८ प्रवेश फी भरली पाहिजे. पण मालेचें दुसरें पुस्तक 'जगाची रीत' हें प्रसिद्ध होण्यापूर्वीं पहिलें पुस्तक घेऊन ग्राहक होणारांना प्रवेश फी पडणार नाहीं.

सेक्रेटरी

**महाराष्ट्र गौरव ग्रंथमाला,**

गिरगांव, मुंबई.

स्वातंत्र्य पाहिजे असेल तर हिंदु–मुसलमानांनीं आपसांत एकी करून गुलामगिरीच्या शृंखला हिंदुस्थानच्या हातीं पायीं असलेल्या तोडून टाकण्यासाठीं मनोभावानें झटलें पाहिजे. हिंदु व मुसलमान या दोघांनीही यावेळीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं, ते एकदिलानें कार्याला लागल्याशिवाय त्यांच्या कपाळींची ताबेदारी टळावयाची नाहीं.

—मौलाना महंमदअल्ली.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# प्रस्तावना.

गोष्ट आश्चर्याची तर खरीच; पण तितकीच ती खरीही आहे; मौलाना महंमदअल्लींना मी प्रथम पाहिले ते धुळ्याच्या तुरुंगांत, व तेव्हां ते आणि मी, दोघेही राजकीय गुन्ह्याबद्दल सरकारचे ' सक्त-मजुरीचे कैदी ' असतांना! तेव्हां त्यांच्याबरोबर माझे सध्यांचे मित्रवर्य व तेव्हांचे साथेच डॉ. सैफुद्दिन किश्चलू हेही प्रख्यात कराची खटल्या-बाबत कैदी म्हणून धुळ्यांत आले. पुढें दुसऱ्याच दिवशीं मौ. महंमद-अल्लीना विजापूरच्या तुरुंगांत नेण्यांत आलें.

खरें पाहिलें तर या घटकेपर्यंत तरी माझी व मौ. महंमदअल्लींची तीच पहिली भेट व तीच एकुलती एक भेट! पण त्या एकुलत्या एका भेटीनें जगांतील एका महान् व्यक्तीचें दर्शन मला घडविलें, व त्या घडीभरच्या सहवासांत त्यांच्या बोलण्याचालण्यावरून व हालचालीवरून त्यांच्या आयुष्यांतील निष्काम देशसेवेचें रहस्य मला ओळखतां आलें. अगदी पहिल्या वहिल्या भेटींत आपण जर समताबुद्धीनें, डोकें ठिकाणावर ठेऊन एखाद्या व्यक्तीच्या चरित्राची खोली अजमावली, तर अनुमान बहुतांशीं खरेंच ठरतें. विकाराची बाधा होऊन मनाच्या अकलेला डेळेफांटे फुटतात ते मागाहून; पहिल्यानें नव्हेत. ह्या तत्त्वावर विश्वासून मौ. महंमदअल्लींच्या चरित्राची जी रूपरेषा त्यांच्या पहिल्या वहिल्या भेटींत माझ्या मनावर रेखाटली तिच्यापुढें डॉ. किश्चलू, तसेंच डॉ. चोइथराम ( सिंध प्रां. कॉ. कमिटीचे अध्यक्ष ) व मौ. महंदअल्लींचे दुसरे कांहीं निकट सहवासी जे माझ्याबरोबर धुळ्यांत तुरुंगवास भोगीत होते, त्यांच्याशीं ह्या विष-यावर बोलून मूळच्या स्थूल कल्पनांवर मी नव्या संगतवार माहि-तीची मखलाशी केली. कराचीचा सदर खटला समग्र पुस्तकरूपानें आम्हांला धुळ्यांतच वाचावयास मिळाला, तेवढ्यावरून, व विशेषतः

मौ. महंमदअल्लींनीं त्या खटल्यांत दिलेल्या कैफियतीवरून त्यांच्या अंतरंगाची कोणासही परिक्षा करतां येण्यासारखी आहे. स्थलाभावामुळें ती कैफियत ह्या छोटेखानी चरित्रांत देतां आली नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

मौलाना साहेबांचें चरित्र सध्यांच लिहिण्याचें कारण, आजकाल बजबजून गेलेलें हिंदी राजकारणाचें वातावरण होय. हिंदुस्थानच्या कमनशिबानें अनत्याचारी असहकारितेचे जनक महात्मा गांधी आज तुरुंगांत असल्यामुळें राजकारणांतलि मतभेद विकोपाला जाऊन वर्तमान काळीं असहकारितेचा पडता काळ आला आहे हें खरें. अशा आणिबाणीच्या वेळीं राष्ट्राची दुफळी व्हावयाची ती दिल्लीच्या जादा राष्ट्रीय सभेंत मौ. महंमदअल्लींच्या मुत्सद्दीपणामुळेंच टळली. आतां कौन्सिलाचे कैवारी लोक कौन्सिलांत जात आहेत, व राजद्वारीं अपमान, उपहास व विटंबना सोसून पुन्हां पुढील तीन वर्षांच्या आंतच बहुधा येरे माझ्या मागल्या ह्या न्यायानें असहकारितेच्या पूर्व पदावर येतील, तेव्हां जनतेच्या मनोभूमीवर एकतंत्री सम्राटसत्ता गाजवणारा महात्माजींच्या तोडीचा दुसरा पुढारी मौ. महंमदअल्ली हाच एक होय, असें सर्वांना एकमतानें कबूल करावें लागेल. मागच्याला ठेंच; पुढचा शहाणा या न्यायानें शहाणपण शिकणाऱ्या असहकारिताबाद्यांचें धर्म-राजकारण तर आज त्यांच्या हातीं आहे; पण ठेंच लागल्याबरच शहाणपण विकत घेण्याचा ज्यांचा हट्टाग्रहाचा बाणा, त्यांचें राजकारणही पुढील तीन वर्षांत त्यांना—मौ. महंमदअल्लींनाच शरणचिठी लिहून देईल, व तेव्हां हिंदी राष्ट्राची खरी एकी होऊन स्वराज्याचा रस्ता मोकळा होईल.

अशा ह्या भविष्यकालीन राष्ट्रसूत्रधाराच्या चरित्राची त्रोटक तरी माहिती मराठी वाचकांना असावी ह्या हेतूनें मी हें लहानगें चरित्र लिहिलें आहे. वाचकांनी तें गोड करून घ्यावें.

३०, मुगभाट लेन,
मुंबई नं. ४.
ता. ७।११।२३

सर्वांचा नम्र,
**विठ्ठल वामन हडप.**



मौलाना महंमदअली.

The New Madhukar P. Press, Bombay.

ॐ

# मौलाना महंमदअली

## उपोद्घात.

जगांतील कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तरी अडचणी, अडथळे, संकटें, दैवी व आसुरी अशा सर्व प्रकारच्या आपत्ति यांची योजना त्यांत ठिकठिकाणीं ठळकपणें करण्याशिवाय इतिहासाची घटनाच करतां यावयाची नाहीं. सामान्यतः अशा संकटपरंपरांची सांखळी हातीं धरून आपण मार्ग काढावा, तेव्हांच एखाद्या देशाचाच काय, तर सर्व जगाचा इतिहास आपणाला उपलब्ध होतो. पण अशा संकटपरंपरांचें निराकरण वेळच्या वेळीं होत असतें, म्हणूनच जगाच्या भाषाकोशांतील भविष्यकाळ या शब्दाची सत्यता आपल्या मनाला पटते. ह्या भविष्यकाळाचे जनक कोण हा प्रश्न येथें सहाजिकच कुतूहलपूर्वक आपल्या मनासमोर उभा रहातो, व त्याचें उत्तर देण्यासाठीं जगद्विख्यात संशोधक, जगद्विख्यात् तत्वज्ञानी, जगप्रसिद्ध देशसेवक, जगत्श्रेष्ठ कार्यकर्ते यांच्याकडे व त्यांच्या कार्यकर्तृत्वाकडे अभिमानपूर्वक अंगुलिनिर्देश करता येतो. असे लोकोत्तर पुरुष सामान्य मानवी समाजांतच जन्माला येतात; अजातयोनि अस कांहीं आकाशांतून कोसळून पडत नाहींत.,पण समाजांत जन्मून समाजांत वावरतां वावरतांही ते समाजापासून स्वतंत्र अशा वातावरणांत संचार करीत असतात.. अशा स्वतंत्र वातावरणांत वावरतां वावरतां ते समाजाला कल्याणकारी अशा कितीएक महान् तत्वांची अमोल देणगी समाजाच्या पदरीं टाकतात, व अशा रीतीनें सर्वतोपरी समाजाच्या उद्धाराला कारणीभूत होतात. असे लोकत्तर पुरुष सत्यवादी व सत्वधीर अस-

तात, व शाश्वत सत्याची ध्वजा हातीं धरून प्रयाण करतां करतां परोपरींच्या अकल्पित अडचणींना, संकटांना व प्रतिपक्षाच्या शरसंधानांना आपणासमोर नमवावयाला लावून परिणामीं विजयशाली ध्रुवतेजानें सतत चमकत राहातात. अशा लोकोत्तर पुरुषाचें चरित्र-लेखन करणें ही सामान्य लेखकाच्या आवांक्याबाहेरची गोष्ट आहे हें तर खरेंच. तशांतही तो चरित्र-नायक आज जगासमोर जीविताच्या तेजाळतेनें चमकत असतां, त्याच्यापासून त्याच्या मायदेशाला—ह्या हिंदुस्थानला, व तदनुषंगानें साऱ्या जगाला किती तरी अमोल देणग्या अजून मिळावयाच्या असतां त्याचें चरित्र लिहिणें ही तर अवघडांतली अवघड गोष्ट. या वेळीं जगाचा एक सामान्य शिरस्ता असा ध्यानीं घेण्यासारखा आहे कीं, जोंपर्यंत जगाच्या डोळ्यांसमोर एकादी थोर व्यक्ति एकसारखी वावरत असते, तोंपर्यंत त्या व्यक्तीचा खरा थोरपणा जगाच्या मनाला यथान्याय पटलेला नसतो; त्याची खरी किंमत करण्याइतकें जग त्याच्या हयातींत विचारी नसतें. हे सारे नियम मौलाना महंमदअली यांना यथायोग्य लागू पडतात. त्यांच्या थोरपणाविषयीं द्विधा मत कोठेंही नाही हें खरें; पण कालांतरानें त्यांच्या चरित्रावर 'आधीं सोन्याचें वर जडावाचें' या न्यायानें नव्या लोकोत्तर कामगिरींचें जडकाम करतां आलें असतं हेंही खरें. पण अशा थोर व्यक्तीचें चरित्र स्थूल मानानें तरी आपणाला कळावें, अशा प्रकारची जनतेची उत्कंठाही तशीच अमर्यादित असते. हें ध्यानीं घेऊन प्रस्तुत चरित्र-लेखनाचा आवडता उतावळेपणा करण्यांत आला आहे, व वाचकांनाही तो तितक्याच उतावळेपणानें आवडता होईल अशी आशा आहे. ह्या चरित्र-लेखनांत जो बराचसा ग्राह्यांश असेल, तो यथातच चरित्र-नायकाच्या तेजस्वी चरित्राचा व कामगिरीचा आस्वाद होय.

---

# मौलाना महंमदअली.

## जन्मकथन.

मौलाना महंमद अली यांचे पितृवंशाचे पूर्वज मुरादाबाद येथें रहात असत. त्यांचे आजे खान-इ-समान अलीबक्षखान यांना तेव्हांचे रामपूरचे नबाब व सध्यांच्या नबाबांचे पणजे युसफअली खानबहादुर यांच्या कृपाछत्राखालीं रामपूर संस्थानांत नोकरी मिळाली. अलीबक्षखान यांनीं आपल्या स्वामींची अत्यंत निष्ठापूर्वक सेवा केली. हिंदुस्थानच्या इतिहासांत प्रसिद्धपणें चमकणाऱ्या इ. स. १८५७ सालच्या बंडाच्या निमित्तानें तेव्हांच्या सरकारी —अर्थात् इंग्रज सरकारच्या—कागदपत्रांतही सदर अलीबक्षखान यांची 'उजवेहात' ( Right-hand-man ) अशी गौरवपूर्वक संभावना केली आहे, एवढें सांगितल्यावर इंग्रज सरकारच्या राजनिष्ठेच्या कसोटीवर अलीबक्षखान हे बावन कशी व शंभर नंबरी राजनिष्ठ ठरले होते, हें निराळें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. तेव्हांचे रामपूरचे नबाबही तसेच बावन कशी व शंभर नंबरी राजनिष्ठ मांडलिक होते. त्यामुळें त्यांच्या आज्ञेनुसार अलीबक्षखान यांनीं रोहिलखंड व कुमरोओन येथें इंग्रजांचा बचाव केला, व विशेषतः इंग्रज लोक नैनिताल, व आलमोरा येथें काळाच्या जबड्यांत उभे राहून आपत्तीच्या एका कं· पासरसे काळाच्या उदरीं गडप व्हावयाच्या बेतांत होते, तेव्हां तर अलीबक्षखानच त्यांना त्राते भेटले. ह्या अलौकिक कामगिरीबद्दल तेव्हां रामपूरच्या नबाबांना खान-इ-समान हा बहुमानाचा किताब मिळाला° व अलीबक्षखानांच्या ह्या नेकीच्या सेवेबद्दल मुरादाबाद जिल्ह्यांत त्यांना जमीनसारा-माफीची भली मोठी जहागीर इंग्रजांकडून मिळाली. या शिवाय संस्थानाकडून त्यांना मानमरातब व देणग्या मिळाल्या त्या निराळ्याच. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव नबाब कल्ब-इ-अलीखान बहादुर यांच्या मागेंही हें राजशाही कृपेचें छत्र त्यांच्याप्रमाणेंच अव्याहत झुलु झुलु रुळत होतें. अली बंधूंचे चुलतेही

रामपूर संस्थानांतील सैन्यांत बड्या हुद्यांवर नेमले गेले होते, व वडील अबदुल अलीखान यांनींही संस्थानांतील सैन्य व राज्यकारभार यांत अत्यंत जबाबदारीनें काम करून राजा व रयत या उभयतांचीही सारखीच मर्जी संपादन केली होती. त्यांचें राजघराण्याशीं अत्यंत घरोब्याचें नातें होतें, व त्या नात्याचीं पाळेंमुळें उभय कुटुंबांच्या मनांत इतकीं खोलवर गेलीं आहेत कीं, तेव्हांपासून आतांपर्यंत प्रतिकूल परिस्थितीचे कितीं प्रचंड झंझावात त्यांच्यावरून वाहून गेले, किती विजा कडाडल्या व किती धरणीकंप झाले, तरी तो उभय कुटुंबांतील प्रेमाचा वृक्ष कांहीं उन्मळून पडलेला नाहीं. इतकेंच काय, तर अजूनही अली बंधूंच्या घराण्यांतील पुरुष पूर्वीं इतक्याच श्रद्धेनें व कार्य-तत्परतेनें रामपूरच्या नबाबांच्या राज्यांत स्वामिकार्यासाठीं हाडें झिजवून खाल्ल्या मिठाला जागत आहेत.

महंमदअली यांचे वडील इ. स. १८८० या वर्षी आपल्या वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी मृत्युमुखीं पडले, व तेव्हां महंमद-अलींसह सहा पोरक्या मुलांची जबाबदारी त्यांच्या तरुण मातेवर पडली. आज साऱ्या हिंदुस्थानला मातेप्रमाणें वंदनीय झालेल्या वृद्धा बी अम्मा त्यांच्यावर वैधव्याचा डोंगर कोसळला तेव्हां त्या अवघ्या २७ वर्षांच्या वयाच्या होत्या. त्या प्रसंगीं अलीबंधूंपैकीं वडील शौकतअली यांचें वय सुमारें सात वर्षांचें असून महंमदअली तर अवघ्या दोन वर्षांचेंही होते कीं नव्हते ! अलीबंधूंची माताही नांवानें अबला असली तरी कृतीनें सबला होती: तिनें शौकत अली व त्यांचे वडील बंधू झुल्फिकारखान यांना इ. स. १८८९ मध्यें प्रथम बरेली येथें व पुढील वर्षाच्या जून महिन्यांत अलीगड येथें महाविद्यालयांत पाठविलें. तेव्हांची परिस्थिति आजच्यापेक्षां बरीच निराळी होती. इंग्रजी शिक्षण घेणें हें तेव्हां हिंदुस्थानांत सर्वत्रच बहुशः पाप गणलें जात असे. तशांत जीर्ण परंपरांना चिकटून रहाण्याची मुसलमानी समाजाची अत्यंत आवडती चाल ! यामुळें

इंग्रजी शिक्षण घेणें हा मुसलमानी समाजांत तेव्हां जवळ जवळ सामाजिक गुन्हा गणला जात असे. ह्या भावनांशीं झगडतां झगडतां मुसलमान समाजाला अलीगड मुस्लिम युनिव्हर्सिटीच्या द्वारा उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले करून देतां देतां नाकीं नव आले! पण अशा विकट परिस्थितींतही न डगमगतां अल्ली बंधूंच्या धीरोदात्त वीरमातेनें आपला मार्ग काढला व आपल्या मुलांना शिक्षण दिलें. बी. अम्मा ह्या वीर-माता, वीर-पत्नी तशाच वीर-कन्याही आहेत. इतकेंच काय; पण त्यांच्या नसानसांत वीर्यशाली पूर्वजांचें रक्त वहातें आहे. मोंगल दरबारीं त्याच्या पूर्वजांनीं लोकोत्तर शौर्य व राजकारणचातुर्य दाखविलें असून अलोट मानसन्मान मिळविला आहे. अशा 'शुद्ध बीजा पोटीं, फळें रसाळ गोमटीं' निपजलीं तर त्यांत आश्चर्य कसलें? खरोखर इतक्या धीटपणानें कर्तव्यतत्पर राहून परिस्थितीशीं टक्करा देतां देतां आपल्या लेंकरांच्या शिक्षणाची इतकी काळजी घेणाऱ्या माता आपल्या देशांत फार थोड्या सांपडतील. बी. अम्मा नुसत्या आपल्या मुलांना शिक्षणाच्या मार्गाला लावूनच स्वस्थ बसल्या नाहींत, तर त्यांचें शिक्षण व दिनचर्या यांवरही त्यांची करडी नजर असे. त्या वारंवार अलीगड येथें जाऊन आपल्या चिरंजिवांच्या शिक्षणाची व वर्तनाची चौकशी करीत, व वेळोवेळीं मुलें व त्यांचे शिक्षक यांनाही योग्य त्या सूचना देत. ही झाली त्यांच्या तरुणपणाची गोष्ट! पण आज ती माउली वृद्ध झाली असली तरी तिची कार्यतत्परता, आपल्या मुलांबरोबर सर्व परिस्थितींत सुखदुःखाचा समान वांटा उचलण्याचा तिचा उत्साह, व स्वतःच्या मुलांच्या क्लेशांत मायदेशाचें मंगल सांपडत असलेलें पाहून तिला होणारा अपरिमित आनंद हीं पहातां तिच्या समोर मी मी म्हणणाऱ्या तरुण, उत्साही स्त्रियांनाच नव्हे, तर पुरुषांनाही लाजेनें खालीं माना घालाव्या लागतील! पण यांत तरी काय आश्चर्य आहे? महंमद अल्ली-शौकत अल्ली असल्या लोकोत्तर पुरुषांना, भारत वर्षाच्या जिवाभावाच्या ह्या मौल्यवान लेण्यांना जन्म देणाऱ्या साध्वी-

च्या आंगीं इतकी थोरवी असेल, यांत निराळें ते काय सांगावयाचें ? खाण तशी माती म्हणतात, या म्हणीचा अर्थ ह्या माय-लेंकरांच्या बाबतींत अक्षरशः पटतो.

अलीगड येथील अली बंधूंच्या आयुष्याविषयीं विशेष सांगण्यासारखी व जी आजमितीला अलम् दुनियेच्या मनाला सूर्यचंद्राप्रमाणें ढळढळीत पटते आहे, ती गोष्ट हीच कीं, हे दोघे भाऊ आतांप्रमाणेंच तेव्हांही एकमेकांवर जिवाभावानें प्रेम करीत असत. आजलाही त्यांचे देह निरनिराळे दिसतात; पण त्यांचें दिल पाहिलें, तर तें स्पष्टपणें साक्ष देईल कीं, आपसांतील वैमनस्य, बेबनाव, किंवा भाऊ बंदकी हे शब्द अलीबंधूंच्या कोशांत नाहींत. ते लौकिकाचे बंधु नसून दिलामेळाचे बंधु आहेत.

---

## विलायतेंत.

विद्यार्थी दशेंत असतांना महंमदअली यांच्या बौद्धिक व मानसिक उन्नतीला चांगला वाव मिळाला. ज्यांना त्यांचा थोडासा तरी सहवास घडला आहे, त्यांना त्यांच्या बुद्धिवैभवाविषयीं निराळें कांहीं सांगावयाचें कारणच नाहीं. विद्यार्थी असतांनाही त्यांची स्मरणशक्ति अचाट, ग्रहणशक्तीही अमर्याद, व कल्पनाशक्तीही सामान्य जनांच्या कल्पनेच्याही आटोक्यापलीकडे विशाल होती. निबंधलेखनांतील त्यांचें नैपुण्य अलौकिक होतें. त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेचे हे नानारूपी खेळ पाहून रामपूर संस्थानचे तेव्हांचे मुख्य प्रधान नबाब महंमद इसाकखान हे मोहित झाले, व त्यांनीं त्यांना विलायतेंत आय्. सी. एस्. होण्यासाठीं पाठविलें. ह्या परिक्षेसाठीं गेलेले विद्यार्थी बहुशः केंब्रिज येथें रहातात; पण महंमदअली यांना वाङ्मयाची अपरंपार गोडी असल्यामुळें त्यांनीं विलायतेंत ऑक्सफोर्ड येथेंच वसती केली.

ते इ. स. १८९८ पासून १९०२ पर्यंत तेथें लिंकन कॉलेजांत शिकत होते. त्या वेळच्या विद्यार्थ्यांचे ते एक आवडते दोस्त होते, व बरोबरीच्या विद्यार्थ्यांशीं जोडलेली दोस्ती आजलाही कांहीं व्यक्तींपुरती मित्रत्वांत परिणत झालेली आहे. लिंकन कॉलेजांतील महंमदअल्लींचा अभ्यासक्रम पुरा होण्याच्या सुमाराला बडोद्याचे कै. राजपुत्र फत्तेसिंग हे त्या कॉलेजांत शिक्षण घेत होते. त्यांना महंमदअल्लींच्या अचाट बुद्धिमत्तेची पारख झाली, व त्यांच्या मार्फत बडोद्याचे सयाजीराव महाराव गायकवाड त्यांच्या कानीं त्यांची कीर्ति गेली.

ऑक्सफोर्ड येथें शिकत असतां महंमदअल्लींची सर्व धारणाशक्ति व कार्यकर्तृत्व एकस्या अभ्यासापुरतींच संकलित होऊन रहातीं, तर त्यांनीं सर्वांपेक्षां निराळ्या रितीनें ‘ स्कॉलर ’ म्हणून यशस्वितेनें नांव कमावलें असतें. पण अभ्यासाबरोबरच वाङ्मयसेवा व दुसरीं आवडतीं व्ययधानें त्यांनीं बळेंच आपल्या मागें लावून घेतल्यामुळें त्यांना ‘ ऑनर्स स्कूल ऑफ मॉडर्न हिस्टरी ’ मध्यें केवळ दुसऱ्या वर्गांत पास होतां आलें. अशाच कारणांमुळें त्यांना आय्. सी. एस्. च्या परीक्षेंतही यश मिळालें नाहीं. हें झालें हें एका अर्थी बरेंच झालें असें म्हणावें लागतें. कारण, न जाणों, जर ते आय्. सी. एस्. झाले असते, तर कदाचित बडे सरकारी अधिकारी होऊन सुवर्ण व सत्ता यांच्या राशींखालीं झांकून गेले असते. पण मग हिंदुस्थानला असा धडाडीचा पुढारी कुठचा सांपडला असता ?

असो; इ. स. १९०२ च्या जानेवारी महिन्यांत महंमदअल्ली विलायतेतून हिंदुस्थानांत परत आले, व रामपूर संस्थानच्या शिक्षणखात्याच्या मुख्याधिकाऱ्याच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. पण पुन्हां त्याच वर्षी एप्रिल महिन्यांत ते बी. ए. च्या परिक्षेसाठीं विलायतेंत गेले. तेथें ते मे महिन्यांत जाऊन पोंचले व त्याच महिन्यांत परिक्षेला बसून, यशस्वी होऊन जुलै महिन्यांत पुन्हां हिंदुस्थानांत आले.

## संस्थानची नोकरी.

विलायतेंतून येतांच महंमद अल्ली अलाहाबाद येथें हायकोर्ट वकिलीच्या परिक्षेला बसले; पण अगदीं थोड्या गुणांनीं अयशस्वी झाले. त्यानंतर त्यांनीं बडोदे संस्थानांत नोकरी पत्करली. तेथें त्यांनीं अनेक जबाबदारीचीं कामें केलीं, व त्यांत चांगलें नांव मिळविलें. त्यांच्या कारकीर्दींत, ते अफूखात्यांत काम करीत होते तेव्हां त्या खात्याचें उत्पन्न चौसपट वाढलें. त्यांनीं लोककल्याणाचीं जीं अनेक कामें संस्थानी नोकरींत केलीं; त्यांत नवसरी जिल्ह्यांतील गांवढळ लोकांच्या कपाळीं जमिनीबद्दल येणारा जुलूम टाळणें ह्याचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल. या बाबतींत महंमदअल्लींवर चौकशीचें काम येऊन पडलें, तेव्हां त्यांनीं आपल्या चौकशीचा जो अहवाल सादर केला, तो एका अपवादाखेरीज सर्वांना सारखाच मान्य झाला. हा अपवाद म्हणजे नवसरी येथील पार्शी लोकांची सिंडिकेट होय. श्रीमान लोक मोठमोठ्या किंमतींना गोरगरिबांच्या गळ्यांत जमिनी बांधीत व त्यांना छळीत, त्या त्यांच्या छळाला सरकारी रित्या आळा बसला, हे महंमदअल्लींच्या श्रमांचें फळ होय.

पण महंमदअल्लींना परमेश्वरानें मुळीं नोकरीसाठीं जन्मालाच घातलेलें नाहीं. त्यामुळेंच तर त्यांना बड्या नोकरपेशाच्या सनदी परिक्षेंत अपयश आलें. व बडोदें संस्थानांतही, संस्थानचा सर्व कारभार अत्यंत समाधानकारक व कोणाही योग्य अधिकाऱ्याला अभिमानास्पद वाटेल असा असून सुद्धां, महंमदअल्लींना नोकरी पेशांत करमेना ! अखेर त्यांनीं तेथील नोकरीला रामराम ठोकला, व आपली जात व आपला देश यांच्या सेवेंत मनोभावानें वाहून घेतलें. या कार्यासाठींच वस्तुतः परमेश्वरानें त्यांना जन्माला घातलें असावें. त्यांच्यावर श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांचें पोटच्या मुला-

प्रमाणें प्रेम होतें. पण महंमदअल्लींच्या कर्तव्यतत्परतेनें प्रेम बिघडूं शकलें नाहीं; तें कर्तव्यशून्य प्रेम नसून कर्तव्य-पूर्ण प्रेम होतें.

---

## वाङ्मय सेवा.

राजकारणी पुरुष म्हणून महंमदअल्लींची जेवढी थोरवी आहे, तेवढीच किंवा तशाच प्रकारची थोर कामगिरी त्यांनीं वाङ्मयक्षेत्रांतही केली आहे. बडोद्याला असतांना त्यांनीं 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्यें कांहीं पत्रें प्रसिद्ध केलीं, व तीं पुस्तकरुपानें 'Thoughts on Present Discontent' या नांवानें प्रसिद्ध झालीं. यांत विशेष गौरवाची गोष्ट सांगावयाची ती ही कीं, त्यांनीं हीं सारीं पत्रें अवघ्या एका रात्रींत लिहिलीं होतीं. पण तीं हिंदी व विलायती, दोन्ही प्रकारच्या विद्वानांना मान्य झालीं. लॉर्ड मिंटो यांनीही तीं वाचून 'वाहवा' म्हणून मान तुकावली! इ. स. १९०४ मध्यें त्यांनीं 'ऑल इंडिया मुसलमान शिक्षण परिषद' मध्यें एक सुंदर निबंध वाचला. इ. स. १९०७ मध्यें मि. लोवेट फ्रेझर, तेव्हांचे टाइम्सचे संपादक यांच्या विनंतीवरून त्यांनीं 'आजचें अलिगड' व दुसरे कांहीं निबंध लिहिले. त्यांनीं 'इंडियन स्पेक्टॅटर' व 'हिंदुस्थान रिव्ह्यू' मध्यें अनेक लेख लिहिले त्यांपैकीं 'हिंदुस्थान रिव्ह्यूमध्यें प्रसिद्ध झालेला 'India past and present' हा लेख तर सर्वत्र अत्यंत प्रशंसिला गेला होता. महंमदअल्ली हे पाहिल्या प्रतीचे विनोदी गृहस्थ आहेत. हें त्यांच्या संपादकत्वाखालीं अलाहाबाद येथें पूर्वी निघत असलेल्या 'Gup' नांवाच्या मासिकांतील त्यांच्या लेखांवरून कोणालाहि कळून येण्यासारखें आहे. दुर्दैवानें ह्या मासिकाचे पहिले दोनच अंक सूर्यप्रकाश पाहूं शकले. यानंतर मोर्ले-मिंटो सुधारणांवर त्यांनीं कांहीं लेख लिहिले, त्यावरून त्यांच्यांत व कै. ना. गोखले यांच्यांत बराच महत्वाचा वादविवाद झाला. पुढें श्री. महंमद हयातखान या कोणा पुरुषानें 'Argus' या टोपणनांवाखालीं

लाहोरच्या ' ऑब्झर्वर ' पत्रांत शौकतअलींवर वायफळ टीका केली, तेव्हां त्याच पत्रांत सणसणीत पण मनाला गुदगुल्या करून सोडणारे लेख लिहून महमदअलींनीं त्या टीकाकाराचे दांत त्याच्या घशांत घातले.

महंमदअली यांनीं पवित्र कुराणाचें इंग्रजी भाषांतर केलें असून तेंही सर्व मान्य झालेलें आहे.

वरील सर्व गोष्टी आटोपल्यानंतर महंमदअली यांनीं स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याचा मनाचा निर्धार केला. त्याच सुमाराला सर मायकेल ओडवायर यांच्या मध्यस्थीनें त्यांना जवोरा संस्थानच्या नबाबाकडून त्या संस्थानची दिवाणगिरी पत्करण्याची विनंति करण्यांत आली. तेवढ्यासाठीं खासेस्वारींशीं प्रत्यक्ष गुलदस्तांतील बोलाचाली व्हावयाच्या त्याही झाल्या. पण त्यांचा कांहीं उपयोग न होतां स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्यासाठीं महंमदअली कलकत्त्यास निघून गेले.

वास्तविक बडोद्याला असल्यापासूनच वर्तमानपत्र काढण्याची योजना त्यांच्या मनांत घोळत होती. ती इ. स. १९११ च्या १४ जानेवारीमध्यें एकदांची फळाला आली. या दिवशीं त्याच्या ' Comrade ' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. कॉमरेडच्या धोरणाविषयीं त्यांनीं पहिल्याच अंकांत जाहीर केलें होतें कीं, " आम्हीं कोणाचे पक्षपाती नाहीं; आम्हीं सर्वांचे सोबती. सहकारी आहों. आपल्या देशांत जातीजातींमध्यें असलेल्या व वाढत जाणाऱ्या तेढी पाहून आमच्या मनाला फार वेदना होतात. हा भेद दूर होऊन सर्व हिंदुस्थान राजकारणाच्या क्षेत्रावर एकमतानें उभा रहावा अशी आमची फार इच्छा आहे. "

राजा व प्रजा यांचें परस्परांशीं नातें कोणत्या प्रकारचें असावें, याविषयीं त्यांनीं त्याच अंकांत प्रसिद्ध केलेल्या विचारांचा मथितार्थ असा कीं, " राजा व प्रजा हीं वस्तुतः दोघेंहि एकच आहेत; एकमे-

नं. २६

कांशीं एकमेकांचा देह व जीव असा संबंध आहे. येसाठीं यापुढें तरी राजा–प्रजा एममेकांपासून अलग आहेत असें कोणी म्हणूं नये. ही गोड परिस्थिति प्राप्त झाली म्हणजे सध्यांचें सर्व मतभेद व असमाधानाचें वातावरण दूर होईल, विरोध असला तरी तो सरकार या संस्थेला जबाबदार असा होईल, व जबाबदारी सर्वांना कळून जबाबदारांच्या हातींच जबाबदारीच्या गोष्टी केल्या जातील. ”

हिंदु–मुसलमानांतील दुही पाहून, तसेंच पूर्व-पश्चिम यांच्यांत मतांतर व विचारांतर असलेलें पाहून महंमदअल्लींना आज नव्यानेंच दुःख होतें असें नाहीं; पूर्वींपासूनच होत होतें. हा भेद आहे हें त्यांना मान्य आहे. पण कांहीं आडमुठे देशी व परदेशी लोक म्हणतात त्याप्रमाणें ही मतभेदाची भेग भरून निघावयाची नाहीं, असला रड्या निराशावाद मात्र त्यांच्या गांवीं नाहीं. त्यांचें म्हणणें असें कीं, संशय व दुराग्रह यांना एका बाजूला काढा, संशय व अहंता यांना दुसऱ्या बाजूला काढा, म्हणजे त्या भेगीवर आपल्याला पूल खात्रीनें बांधतां येईल. हे विचार महमदअल्लींना आज सुचलेले नसून नऊ दहा वर्षांपूर्वीही ते त्याच गोष्टी बोलत होते, ही गोष्ट त्यांच्या टिकाकारांनीं अवश्य ध्यानीं ठेवावी.

वरच्या विधानाची सत्यता पटण्यासाठीं हिंदु-मुसलमानांच्या एकीवर त्यांनीं कॉमरेडमध्ये लिहिलेल्या एका लेखांतील उतारा देणें अप्रासंगिक होणार नाहीं:—

“ ...पण आजच्यासाठीं तरतूद करतांना आपल्याला उद्यांचा विसर पडतां कामा नये. आमचा असा पूर्ण भरंवसा आहे कीं, हिंदु व मुसलमान यांनीं आपसांत विरोध माजवून तर कधीं नाहींच, पण एकमेकांशीं सहकारिता एकी न करतांहि त्यांना त्यांच्या चळवळींत यश लाभावयाचें नाहीं. यासाठीं प्रत्येक पाऊल टाकतांना आपण फार विचारानें टाकलें पाहिजे......हिंदुस्थानच्या प्राचीन किंवा अर्वाचीन-

इतिहासांत हिंदुस्थानच्या सध्यांच्या प्रसंगाला उपयोगीं पडेल अशी प्रसंगांची परंपरा मुळींच दिलेली नाहीं. इतिहासाची पुनरावृत्ति कधींच आपोआप होत नसते. पण स्वतःमधील एकीचें बळ कायम राखण्यासाठीं पश्चिमेकडील राजकारणी व तत्वज्ञानी पुरुषांची जिवा-पाड धडपड चालली असतांना आपण हिंदी लोकांनीं आपल्या राष्ट्रीय बाणा तरी कां सोडावा ? आपणांला आपल्यांत आजच्या आज जपानांतील चार कोटी लोकांच्याप्रमाणें स्वदेशाभिमानाची जळ-जळीत ज्योत एकसमयावच्छेदेंकरून तेवती करितां येणार नाहीं, हें खरें. पण कानडाप्रमाणें निर्वाहापुरतें ऐकमत्य करून वागण्याला तर आपल्याला हरकत नाहीं ? हें अशक्य खास नाहीं. हा विवाह प्रेमविवाह होणार नाहीं; हरकत नाहीं. पण हा परस्परांच्या सोईचा विवाह तरी होईल, व त्यामुळें एकमेक एकमेकांचा तिरस्कार कर-ण्याचें सोडून देऊं. हें आपणाला वाटतें तितकें सोपें काम नाहीं; पण प्रत्येक हिंदी कन्या-पुत्राचें हें एक पवित्र कर्तव्य असून त्याच्या बजावणीसाठीं प्रत्येकानें वाटतील तितके श्रम व वाटेल तेवढा स्वार्थ-त्याग करण्याला तयार असलें पाहिजे. हे ऐक्यदेवते ! तूं उगवशील, लोकांचा एकोपा घडवून आणशील व एका देशाला दुसऱ्या देशा-च्या मानेने मान घालून गुण्या गोविंदानें नांदवशील. तूं येशील खास. पण केव्हां ? आमची कमालीची सत्वपरिक्षा होईल, तुझी वाट पाहून पाहून आम्हीं थकून जाऊं, उत्कंठेचा अतिरेक होऊन आमच्या जिवाचा कोंडमारा होईल, व निराशेच्या उदास वातावरणांत आम्हीं गुदमरून जाऊं तेव्हां !

अशा प्रकारें 'कॉमरेड' नें आपल्या जोमदार, तेजस्वी व जिवंत लेखांच्या द्वारां हिंदी जनतेला शिक्षण देण्याचें काम जारीनें चालविलें होतें. त्यांतील विशेष जादू ही कीं, बड्या बड्या गोऱ्या अधिकाऱ्यांना-लॉर्ड व लेडी हार्डिंग यांनाही कॉमरेड अत्यंत आवडे, व त्याची सर्वत्र वाहवा होई; पण पुढें मुसलमानांचा जातिविषयक प्रश्न हातीं घेऊन

हिंदी राजकारणाचें विशेष खोल आलोडन करण्याची कॉमरेडनें सुरवात केली, तेव्हां त्याच्यावर गोऱ्या अधिकाऱ्यांची खप्पा मर्जी झाली!

कलकत्त्याला 'कॉमरेड' ची कचेरी ठेवण्यांत हिंदुस्थान सरकारच्या हालचालींशीं प्रत्यक्ष संबंध ठेवण्याचा महंमदअल्लींचा मुख्य हेतु होता. त्यामुळें इ. स. १९१२ मध्यें हिंदुस्थानची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला आली, तेव्हां कॉमरेडचेंहि स्थानांतर झालें. पण दिल्ली येथील एक विशिष्ट कंपू ह्या लहानग्या पत्राला पाण्यांत पहात असल्यामुळें शेवटीं तेथेंच तें अनेक अडचणींमुळें बंद पडलें.

सामान्य वाचकांना इंग्रजी वर्तमानपत्र वाचतां येत नाहीं ही अडचण महमदअल्लींच्या तेव्हांच ध्यानीं आली होती. ती उणीव भरून काढण्यासाठीं त्यांनीं 'हमूदर्द' नांवाचें उर्दू दैनिक सुरू केलें. त्याचा खप हां हां म्हणतां ९००० वर गेला, व जनतेंत त्यानें अपूर्व जागृति केली. पण सरकारला त्या पत्राचा उत्कर्ष व त्या करवीं होणारी कामगिरी असह्य होऊन त्यानें 'सेन्सॉरची' एक धोंड त्याच्या मानेवर उचलून ठेवली. ह्या जाचाला कंटाळून महंमदअल्लींनीं तें बंद केलें.

---

## मुस्लिम लीग व मुस्लिम विश्वविद्यालय.

हिंदुस्थानांतील मुसलमान समाजाचें अस्तित्व जगाच्या मनावर यथातथ्य पटविणाऱ्या ज्या एका हाताच्या बोटावर मोजण्यासारख्या संस्था आहेत, त्यांपैकीं मुस्लिम लीग व मुस्लिम विश्वविद्यालय यांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येण्यासारखा आहे. पैकीं मुस्लिम लीग ही डाकाचे नवाब सलिम-उल्लाखान व अमरोहाचे नवाब विगरुल-मुल्कखान यांच्या खांद्याला खांदा भिडवून महंमदअल्ली यांनीं इ. स. १९१६ मध्यें स्थापन केली. त्यावेळचे लीगचे उद्देश अर्थातच आपलपोटे, फक्त मुसलमानांचा तेवढा हितसंबंध पहाणारे असे होते व त्यांचा

राजनिष्ठेवर अत्यंत भर होता. आजला असले एकाद्या देशोपकारी संस्थेचे उद्देश असणें ही गोष्ट चमत्कारिक दिसते खरी, पण एके काळीं बारा चौदा वर्षांपूर्वी ती तशी अस्तित्वांत होती. ह्या लीगनं महंमदअलींच्या नेतृत्वाखालीं हिंदी मुसलमान समाजांत फार जागृति केली, इतकेंच काय पण इ. स. १९१२ सालीं कौन्सिल ऑफ लीग ऑफ नेशनमध्यें स्वराज्याचा ( Self Government ) प्रश्न जो चर्चेला निघाला त्याचें बीजारोपण खरें पाहिलें असतां हिंदुस्थानांत मोस्लेम लीग व राष्ट्रीय सभा यांच्या चळवळींतच झालेलं आहे.

मुस्लिम लीगप्रमाणेंच मुस्लिम विश्वविद्यालयाच्या मूलभूत आधारस्तंभांतही महंमदअलींच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. विश्वविद्यालय एकदांचें स्थापन झालें, पण सर्व मुसलमानी शिक्षणाची योग्य ती दिशा ठरविण्याची सत्ता सरकारनें विश्वविद्यालयाच्या हातीं दिली नाहीं, तेथें आपला हातचा राखून ठेवलाच. सरकारच्या ह्या अन्याय्य वर्तनाबद्दल महंमदअलींनीं कसून विरोध केला. अलीगड येथें विश्वविद्यालयाच्या फाउंडेशन कमिटीनेंही विरुद्ध ठराव पास केले, व तेव्हां अलीबंधू हे सरकारच्या अटकेत असल्यामुळें त्यांच्या सुटकेपर्यंत ह्या प्रश्नाचा विचार तहकूब ठेवावा असेंही ठरलें. महंमदअलींनीं ह्या महत्वाच्या गोष्टीचा विचार करण्यासाठीं सभेला हजर राहाण्याची परवानगी सरकारपाशीं मागितली. पण सरकारला माहीत होतें कीं, महंमदअली तेथें हजर असल्यास सर्व कारभार तिरपगडा होईल. त्यामुळें त्यांना हजर रहाण्याची परवानगी मिळाली नाहीं. त्यानंतर अलग्या कालांतरानें कमिटीची दुसरी सभा भरली, व तिच्यावर सरकारी दराऱ्याचें पिशाच्च कोणत्या अज्ञात मार्गांनीं सत्ता गाजवीत होतें नकळे, त्या सभेंत सरकारच्या अटींप्रमाणें मुस्लिम विश्वविद्यालयाची स्थापना करण्याचा ठराव पास झाला. महंमद

अलींसारखा मंद्या मनाचा व निधड्या छातीचा नेता जेथें नाहीं, तेथें आंतून पोखरापोखर करण्याच्या कामीं विघ्नसंतोषी लोकांना कसें यश येतें, याचें हें एक सुंदर उदाहरण आहे.

---

## हिंदू-मुसलमानांचें ऐक्य.

महंमदअलींवर सामान्य जनसमूहाचा असा एक जबरा आरोप आहे कीं, महंमद अली हे आपल्या मुसलमान जातीपुरतेच पक्षपाती आहेत, व आतांपर्यंत त्यांनीं जी कांहीं देशसेवा केली, ती आपल्या जातीच्या उन्नतीसाठींच केली. हें विधान वाटतें तितकें खरें नाहीं. महंमद अली हे आपल्या जातीचे व धर्माचे पक्षपाती व अभिमानी आहेत हें खरें, व त्यांच्या प्रत्येक कार्यांत ह्या विवक्षित विचारप्रणालीची छटा स्पष्ट उमटलेली दिसून येते खरी. पण त्यांची सर्व चळवळ केवळ मुसलमान व मुसलमानी धर्म यांपुरतीच असते असें विधान करणें धाडसाचें होईल. हिंदु-मुसलमानांची एकी झाल्याशिवाय मायदेशाचें मंगल व्हावयाचें नाहीं, अशी त्यांचा पूर्ण खात्री आहे, व त्याच जाणिवेनें ते आजवर प्रयत्न करीत आले आहेत. महात्मा गांधींची अनत्याचारी असहकारितेची चळवळ सुरू झाल्यापासून तर त्या दोघां बंधूंनीं हिंदु-मुसलमानांच्या एकीचें तत्व आचरणांत आणण्यासाठीं नेटानें कंबर कसली आहे. आपल्या जातीच्या व धर्माच्या उन्नतीचा विचार करतांना इतर हिंदु किंवा हिंद्वेतर जाती व धर्म यांच्या उन्नतीकडे त्यांचें पूर्णपणें चित्त वेधून राहिलेलें असतें. जाती जातींत भेदभाव असावा किंवा वाढवावा असें त्यांना कधींच वाटत नाहीं, इतकेंच काय; पण ह्या भेदामुळें हिंदुस्थानचें होत असलेलें अपरिमित नुकसान पाहून चिंतेचे विंचु कोणाच्या अंतःकरणाला पहिल्यानें डसत असतील तर ते त्यांच्याच.

बरें; अल्ली बंधूंचीं हीं मतें कांहीं हंगामी नाहींत, हा कांहीं औट घटकांचा राजवाडा नव्हे. जेव्हां असहकारितेचा वाराही हिंदुस्थानांत वहात नव्हता व हिंदु मुसलमानांच्या ऐक्याचीं स्वप्नेंही पडत नव्हतीं, तेव्हांही हिंदु मुसलमानांच्या एकीसाठीं त्यांच्या मनाला कशी तळमळ लागली होती, याचा दाखला मागें एका ठिकाणीं त्यांच्या 'कॉमरेड' पत्रांतील एक उतारा दिला आहे त्यावरून पटण्यासारखा आहे. या विधानाचें दुसरें प्रत्यन्तर म्हणजे, मोस्लेम लीगची प्राण-प्रतिष्ठा करण्यापूर्वी महंमदअल्लींनीं स्वतः जातीनें तरुण हिंदु पिढीच्या मनोभावनांचें सूक्ष्मावलोकन करून तदनुसार मायदेशाच्या मंगलाला पोषक होईल अशी मोस्लेम लीगची घटना करण्यासाठीं बनारस येथील सेन्ट्रल कॉलेजला भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांसमोर हिंदु-मुसलमानांच्या परस्परांमधील नात्याविषयीं सुंदर उहापोह केला, व हिंदु जीविताचें ध्येय काय हेंहि कसोशीनें समजावून घेतलें. तेथें व अन्यत्रही त्यांनीं जनतेच्या मनावर असें बिंबविण्याचा प्रयत्न केला कीं, जर हिंदु लोक खरे हिंदु व मुसलमान लोक खरे मुसलमान होतील, तर त्यांच्यांतील सर्व मतभेद चटसारे तेव्हांच लयाला जातील. इतकेंच नव्हे, तर हिंदु व मुसलमान यांच्या एकमेकांच्या राष्ट्रीय भावनांचें एकीकरणही यामुळें फार सुंदर होईल.

महंमदअल्लींच्या वरील विधानांत जाति भेदाला प्रोत्साहन देणारें असें काय आहे? महंमदअल्ली हे मुसलमान धर्माचे तेवढे कैवारी आहेत, असें विधान करण्याला त्यांच्या चरित्रांत कोणाला काय आधार सांपडण्यासारखा आहे? खरेंच सांगावयाचें तर महंमद अल्ली हे हिंदु-मुसलमानांतील दुही वाढवणारे नाहींत; दुही मिटविणारे आहेत. ते मुसलमानी धर्माचे अनुयायी असले तरी त्यांचा मायदेशाविषयींचा कैवार, हेंच त्यांच्या खऱ्या मुसलमानी ब्रीदाचें सौभाग्य आहे.

'पॅन इस्लामिझम' चा महंमदअल्ली हा आत्मा आहे अशी

समजूत वारंवार करण्यांत येते, व कांहीं कांहीं लोक तर तेवढ्यावरच न थांबतां महंमदअली हे पॅन इस्लामिझमचे कट्टे अनुयायी असून सर्व जगाला इस्लाम धर्माची दिक्षा देण्यासाठीं हपापलेले आहेत अशींहि विधानें करतात. खरें पाहिलें तर ' पॅन इस्लामिझम ' च्या चळवळींत, इतर धर्माच्या अनुयायांची छाती फाटून जाण्याइतके आपत्तीचें अवडंबर मुळींच नाहीं. पण अनेक सुइणी सुईणपणा करूं लागल्यावर बिचाऱ्या बाळंतिणीची वाट लागते असें ह्मणतात, त्याप्रमाणेंच अनेक युरोपीय व तदितर विद्वानांनीं ह्या चळवळीविषयीं रकानेच्या रकाने लिहून तिच्याविषयीं जगांत गैरसमजाला भरपूर जागा करून दिली आहे. ह्या लांड्या कारभारांतील विष प्रत्यक्ष मुसलमानी धर्मालाही बरेंच बाधलें आहे, व तो मुसलमानेतर समाजामधलि कांहीं कांहीं लोकांत अप्रतिष्ठेला, निदान तिरस्काराला तरी खास पात्र झाला आहे.

यूरोपातील लोकांना वाटतें कीं, खिस्ती धर्मावरून नांगर फिरवणारी ही चळवळ मुसलमानांनीं सुरू केली आहे. इतरत्रही तीच भावना कमी अधिक प्रमाणांत बलवत्तर झालेली असून थोडक्यांत सर्व जगाच्या दुराग्रहाची व्याख्या करावयाची तर ती अशी करतां येईल कीं, सर्व जगत् मुसलमानमय करून सोडण्यासाठीं निघालेली ही चळवळ आहे.

पण ही समजूत अत्यंत पोरकट, खोटी व त्याज्य आहे. ' पॅन इस्लामिझमची ' चळवळ धार्मिक समतेच्या तत्वावर उभारण्यांत आली असून तिचा पाया प्रथम १३०० वर्षांपूर्वीं महात्मा पैगंबर महंमदाच्या हातीं रोवण्यांत आला. पैगंबरानें तेव्हां अलम दुनियेला अशी ग्वाही दिली आहे कीं, ' मुसलमान हे धर्मदृष्ट्या बंधू आहेत ' अर्थात् टीकाकारांना किंवा शंकाखोरांना कांहींही वाटलें तरी ही चळवळ कांहीं आजकालची नव्हे, प्राचीन काळची आहे, एवढें एथें सांगणें अवश्य आहे.

आतां प्रत्यक्ष महंमदअलींचा या चळवळीशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे, हें निराळें सांगत बसण्यापेक्षां या विषयावर त्यांनीं आपल्या आवडत्या ' कॉमरेडमध्यें ' काढलेले उद्गार विशेष उद्बोधक होण्यासारखे आहेत:—

' आपण सूक्ष्म दृष्टीनें विचार करूं लागलों तर ' पॅन इस्लामिझम ' हें दुसरें तिसरें कांहीं नसून दुर्ग्रह व उत्तेजित मनोविकार यांचे बनलेलें एक अर्थशून्य लेणें आहे. त्याला जर कांहीं अर्थ असलाच, तर तो हाच कीं, ह्या धर्माचे अनुयायी ह्मणून गणले जाणारे लोक भावना प्रधान व उद्दीप्त असतात. ह्या मुसलमानांमधील सर्व सामान्य वैशिष्ट्याचें द्योतक म्हणूनच हा शब्द योजतां येईल. सर्व मुसलमानांची धर्मतत्वें व नीतितत्वें एकत्रित करून त्यांच्यांत एकीचें बळ उत्पन्न करणारी अशी ही चळवळ होय. या अर्थानें ' पॅन इस्लामिझम ' ह्या शब्दाची योजना करण्यांत आल्यास त्यांत वावगें असें कांहीं नाहीं. पण परधर्म, परजाती, परदेश यांचा द्वेष करणारी ही चळवळ आहे असें जर कोणी गोरा जगाला भासवीत असेल, तर तें त्याच्या तापलेल्या मेंदूंतील काळ्या विषारी विचारांचें प्रतिबिंब होय असें ह्मणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. मुसलमानांत गतकाळापेक्षां वर्तमानकाळीं जास्त जागृति झाली आहे हें उघड आहे, पण ती वरील अर्थाची द्योतक नसून, आपल्यामधील अशिक्षितपणा व अजाणपणा यांची तुलनात्मक दृष्टीनें त्यांना जाणीव झाली आहे, हें त्याचें कारण होय. पण विकृत अर्थानें ह्या शब्दाचा व चळवळीचा आगलावा उपयोग करणाऱ्या उपद्व्यापी लोकांनां सडेतोड उत्तर द्यावयाचें तर तें असें कीं, रोजच्या मुसलमानी धर्माहून ' पॅन इस्लामिझम ' मध्यें जर कांहीं भिन्नत्व असेल, तर त्या चळवळीवर कोणत्याही मुसलमानाचा लवमात्र विश्वास नाहीं. ''

अन्य ठिकाणींही महंमदअली वरील प्रश्नाचाच उहापोह करतांना म्हणतात, "मुसलमानी सुधारणेचें रहस्य काय? ग्रीक संस्कृतीवर

मौलाना महंमदअल्ली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... १९ ... ना.

उजाळा देणारी ती एखादी कला नव्हे; हिंदु सुधारणेचा पाया रचणारा हा एकांगी आत्माध्यात्म वाद ( metaphysics ) नव्हे, किंवा आज कालच्या यूरोपची घटना करणारें हें राजकारणही नव्हे. हें समाज नीतीचें महत्तत्व आहे, हा एक मार्ग आहे. व केवळ जितजेतेपणाच्या जाळ्यांत गुरफटलेल्यांना हा मार्ग सांपडावयाचा नाहीं. हा जनतेचा राजमार्ग होय, व इतर सर्व गोष्टींच्या पलिकडची बहुमोल वस्तु जें सच्चारित्र्य, त्याचा दरवाजा ह्या मार्गानें गेल्यावर मुसलमानांना हटकून सांपडतो. कोणालाही नीतींचे धडे शिकावयाचे असतील, जीवित साफल्याचा मार्ग काढावयाचा असेल, माता, पिता, भ्राता, भर्ता, भगिनी वगैरे निरनिराळ्या नात्यांतील आपलीं कर्तव्यें काय हें ओळखावयाचें असेल, तर त्यानें ‘कुराण’ वाचावें; त्यांत त्याला जें जें हवें तें तें सांपडेल.

वरील विचाराचें परिशीलन केलें, ह्मणजे आजपर्यंत महंमदअल्ली कट्टे मुसलमान या नात्यानें वागत आले, त्यांतील मथितार्थ तेव्हांच ध्यानीं येतो. वरील विधानें स्पष्टपणें सांगतात कीं, महंमदअल्ली हे मुसलमानी धर्माचे कट्टे अनुयायी असले, तरी इतर धर्माच्या मानेवर सुरा उगारून उठलेले खाटीक खास नाहींत. त्यांना आपल्या धर्माचा गौरव व प्रसार व्हावासा वाटतो; पण त्यासाठीं इतर धर्मांचे बळी घेण्याची बद दानत त्यांना सुचत नाहीं. ते स्वतः हिंदु होण्याला, स्वतःच्या धर्मावरील त्यांच्या दृढ श्रद्धेमुळें तयार नसले किंवा तयार होणार नसले, तरी प्रत्येक हिंदूनें मुसलमानी धर्माची दिक्षा घेतल्याशिवाय किंवा प्रत्येक मुसलमानानें हिंदु बनल्याशिवाय हिंदुस्थानचें दुर्दैव टळावयाचें नाहीं, अशा रडव्या निराशावादाची री SSS ओढीत बसणारे रडे ते नाहींत. ते खुल्या दिलानें वै खऱ्या मनानें असेंच ह्मणतात कीं, तुमचा धर्म हिंदु असो वा आमचा मुसलमान असो; एकमेकांच्या धर्म भावनांचे चावे न घेतां आपण सर्व गुण्या गोविंदानें एकोप्यानें वागून आपल्या मायदेशाचें मंगल करूं.

---

# कानपूरचा मशिदी बाबत ' दंगा '

महंमदअलींची आठवण झाल्याबरोबर कानपूर येथील मशिदीबाबत झालेल्या दंग्याची आठवण कोणाला होणार नाहीं? हा लाजिरवाणा प्रकार इ. स. १९१३ च्या आगष्टच्या ३ ऱ्या तारखेला घडून आला. हा वस्तुतः दंगा नव्हता; देवाचें देवपण पणाला लावून त्याची मानखंडणा होऊं नये ह्मणून माणसांनीं केलेली ही माणुसकीला शोभेशी हालचाल होती. पण त्या हालचालीच्या गळयांत 'दंगा' हें मंगळसूत्र सरकारी अधिकाऱ्यांनीं बांधलें आहे. कानपूर येथें मछली बाजारामधून नवीन रस्ता तयार करावयाचा होता, त्यासाठीं तेथील मशिदीचा थोडासा भाग पाडणें अवश्य होतें. कोणाच्याही धर्मांत ढवळा ढवळ करणें ह्मणजे राणीच्या जाहिरनाम्याविरुद्ध विश्वासघाताचें काम सरकारनें करणें होय, व कानपूर येथें मशिदीवर घण घालण्यांत तेथील सत्ताधिशांनीं वरच्यासारखा विश्वासघात केला हें उघड होय. ह्या धर्मविटंबनेला मशिदीच्या कांहीं जो हुकुम खुषमस्कऱ्या व्यवस्थापकांची तोंडदेखती संमति मिळवून म्युनिसिपालिटीनें हें धर्मोच्छेदाचें काम हातीं घेतलें; पण ती योजना उजेडांत आली, तेव्हां मुसलमानी धर्मपंडित, पुढारी व इतर मान मान्यतेचे लोक यांनीं अधिकाऱ्यांच्या ह्या धर्मबाह्य कृत्याचा निषेध केला. पण नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें तो निषेध अरण्यरुदनवत् फोल ठरून पोलिसांच्या खड्या पहाऱ्यांत प्रत्यक्ष पैगंबराने आपल्या हातानें उभारलेल्या पवित्र मशिदीचा अंशतः भाग खणून काढण्यांत आला.

महंमदअलींचें 'कॉमरेड' पत्र तेव्हां निघत होतें. पाहिले कांहीं दिवस मशिदीचा भंग होईपर्यंत व त्यानंतरही सरकारी अधिकारी कांहीं तरी योग्य तडजोड करून हा वाद मिटवतील या आशेनें महंमदअलींनीं त्याविषयीं वाचा-विटाळहि केला नाहीं. इतक्यांत ही

धर्मविटंबना सहन न झाल्यामुळें मुसलमानांची एक प्रचंड निषेध-प्रदर्शक सभा भरली, व सभेच्या शेवटीं सर्व लोक त्या मशिदीपाशीं जाऊन तिचा भग्न भाग पुन्हां बांधण्याचा स्पष्ट इरादा दाखविण्यासाठीं चुनामातीशिवाय कोरड्या विटा रचूं लागले.

पण तीव्र दृष्टीच्या व चाणाक्ष बुद्धीच्या सरकारी अधिकाऱ्यांना यांत दंगा दिसून येऊन त्यांनीं तेथें बंदोबस्तासाठीं पोलिसांना पाठविलें. पोलिसांनीं दंगा मोडण्यासाठीं गोळीबार केला व बंदुकींच्या बायोनेटांनीं किती तरी लोकांना भोसकलें. परिणामीं दंगा मोडला, अनेक जीव मृत्युमुखीं पडले, व अनेकांना दंगेखोर म्हणून पकडून तुरुंगांत डांबण्यांत आलें. ह्या दंगेखोरांत अजाण मुलांपासून तों प्रतिष्ठित मौलवीपर्यंत सर्वांचा सब घोडे बारा टक्के समावेश करण्यांत येऊन त्यांना जनावराप्रमाणें तुरुंगांच्या भिंतींशीं लोखंडी साखळ्यांच्या दाव्यांनीं जखडून ठेवण्यांत आलें होतें. वास्तविक यांत रयतेचा अपराध कांहींच नव्हता. पण जालियनवाला बागेंत असाच बंडाचा अभाव असतां सरकारी अधिकाऱ्यांना बंड दिसलें, तसा कानपूरला दंगा दिसला.

हा सर्व प्रकार होईतों महंमदअल्लींनीं मूग गिळून दिवस काढले पण जखमेवर मिठाचें पाणी या न्यायानें ह्या प्रकरणाबाबत दाद मागण्यासाठीं ले. गव्हर्नर सर जेम्स मेस्टन यांच्याकडे शिष्टमंडळ गेलें असतां त्याच्याही कपाळाला वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत आल्या. तेव्हां महंमद अल्लींना ह्या रणांगणांत उडी घालणें भाग पडलें. त्यांनीं सरकारी हालचालींचा नेहमींचा रोंख ओळखून कालापव्यय न करतां वझीर अल्लींबरोबर विलायतेची वाट धरली, व राणीच्या जाहीरनाम्याशीं, राजानें दिलेल्या वचनांशीं राजाचे अधिकारी कसें बेइमानदारीचें व विश्वासघाताचें वर्तन करतात, हें विलायतेंतील जनतेच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानचा जेथें जेथें व्यक्तिशः किंवा सार्वजनिक दृष्ट्या संबंध येईल; तेथें तेथें हिंदुस्थानची परोपरीनें गोळा

आणे निंदा करण्यासाठीं झटावयाचें, हा कांहीं कांहीं विलायती लोकांचा बाणा असतो व त्यांचीं वर्तमानपत्रें व संदेशवाहक मंडळें नेहमींच असलीं सत्कृत्यें करीत असतात. कानपूरच्या मशीद प्रकरणींही ह्या पुण्यात्म्यांनीं असाच गैरसमज विलायतेंत पसरून ठेवला असल्यामुळें महंमदअल्लींना तेथें काम करणें अवघड गेलें, पण परिणामीं त्यांचें कार्य यशस्वी झालें.

महंमदअल्ली हे तेव्हांतरी निदान सनदशीर चळवळीचे कट्टे भोक्ते होते. त्यांनीं सनदशीर मार्गांनीं भगीरथ प्रयत्न केले, व अखेर अधिकाऱ्यांशीं बोलणेंही लावलें. त्यालाच शेवटीं यश येऊन तेव्हांचे संयुक्त प्रांताचे ले. गव्हर्नर सर जेम्स टॉकी यांच्या मध्यस्तीला मान देऊन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डींग यांनीं स्वतः कानपूर शहराची भेट घेतली; त्यांच्या परवानगीनें मशिदीचा पाडलेला भाग पुन्हां बांधला गेला, व दंगेखोर ह्मणून पकडले गेलेले लोक अखेर निर्दोषी ठरून सुटले. यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, ह्या सर्व यशाचा वांटा महंमदअल्लींनी विनयपूर्वक एकस्या व्हाइसरॉयांच्याच पदरीं टाकला.

---

## तुर्कस्थान व महंमदअली.

युरोपांतील महायुद्धांत तुर्कस्थाननें भाग घेण्यापूर्वी लंडन टाइम्सनें एक अत्यंत कुत्सितपणाचा व इंग्रजांची प्रौढी गाणारा अपमानास्पद लेख लिहून महायुद्धांत पूर्ण तटस्थ रहाण्याविषयीं तुर्कस्थानला धमकावून बजावलें होतें. हा अपमान महंमदअल्लींच्या काळजाला जाऊन झोंबला व मुद्याला मुद्दा या न्यायानें तेवढ्याच किंबहुना त्याहीपेक्षां बाणेदारपणानें उत्तर देऊन टाइम्सचे सर्व कुत्सित मुद्दे सप्रमाण खोडून काढले. हा सर्व प्रकार होऊन चार दिवस होतात न होतात, तों तुर्कस्थाननें रणकुंडांत उडी घेतली, व योगायोगच असा चमत्कारिक

आला कीं, महंमदअल्लींनीं लेख लिहावयाला व जनरल बरो यांनीं मेसापोटेमियावर स्वारी करण्याची परवानगी भारत मंत्र्यापाशीं मागावयाला एक गांठ पडली.

हा सर्व प्रकार होऊन उणापुरा महिना लोटतो न लोटतो, तोंच प्रेस ॲक्टच्या तरवारीचा पट्टा 'कॉमरेड व हम्‌दर्द छापखाना' चालविणाऱ्या चालकावर नोटीस बजावण्यांत येऊन २००० रुपयांची जामिनकी त्या लेखाबद्दल मागण्यांत आली. अर्थात त्या तारखेच्या (ता. २६।९।१४) सर्व प्रति सरकारजमा करण्यांत आल्या, हें नव्यानें सांगावयास नकोच.

सरकारच्या दृष्टीनें महंमदअल्लींचा तो लेख इतका आक्षेपार्ह वाटला असला, तरी लोकांत त्याची सुवर्णतुळाच झाली. सर्वतोमुखी त्याची वाहवा होऊं लागली व त्यांत सत्य गोष्टींचाच विशद रीतीनें उहापोह केला आहे, असें सर्वांचें मत पडलें. पण हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून अनेक वेळां लोकमत व सरकारमत यांमध्यें खऱ्या खोट्याचा निर्णय पूर्वपश्चिमेइतक्या विरुद्ध प्रमाणांनीं होतो हें कोणाला माहीत नसेल?

त्या लेखांत असें होतें तरी काय? त्या लेखांत महंमदअल्लींनीं तुर्कस्थाननें महायुद्धांत मुळींच पडूं नये, व दोस्त आणि तुर्कस्थान यांच्यांत लढा पडला तर हिंदुस्थानांतील शांततेचें रक्षण करण्यासाठीं म्हणून तरी हिंदी मुसलमानांनीं आपल्या सरकारला मोकळ्या मनानें मदत करावी, असें सुचविलें होतें. तसेंच इंग्रज सरकारलाही अनेक सुंदर सल्ला देण्यांत आल्या होत्या. त्या लेखाविषयीं सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत कां, कसें व किती विष घुसलें हा प्रश्न निराळा, पण खरें पाहूं गेलें असतां त्यांत आचार, विचार किंवा कृति यांपैकीं कोणत्याही मार्गानें हिंदी रयतेचीं मनें सरकारविषयीं कलुषित होतील असें कांहीं नव्हतें.

महंमदअल्लींवर सरकारचे आक्षेप कांहींही असोत; राजद्रोहाचें रक्त मुळापासूनच त्यांच्या नसांत खेळत नव्हतें. त्यांनीं कधींच सरकार-विषयीं रयतेच्या मनांत अप्रीति उत्पन्न करून राजद्रोह साधण्याचा प्रयत्न केला नाहीं. ते पक्षीचे टीकाकार होते व आहेत हें मात्र खरें. त्या टीकाकारित्वाबद्दल त्यांना वरच्याप्रमाणें भूर्दंड भरावा लागला हें जरी वाईट झालें असलें, तरी त्या वाइटांतूनही एका चांगल्याचा जन्म झाला आहे. तें चांगलें ह्मणजे वर्तमान पत्रकाराच्या आयुष्यांतील शेवटचा श्वास त्यांनीं सोडला, तो न्यायाच्या, धर्माच्या व सत्याकारणीं सोडला.

---

## अटक.

खरें पाहिलें तर महायुद्धाच्या वेळीं महंमदअल्लींनीं जे लेख लिहिलें, त्यांनीं सरकारी वातावरणांत त्यांचें नांव काळ्या शाईनें नोंदून ठेवलें. वर्तमानपत्राची जामिनकी मागून थोडासा अवकाश होतो न होतो तोंच त्यांना अटक झाल्याची वार्ता सगळीकडे पसरली. हा प्रकार इ. स. १९१५ च्या मेमध्यें घडला. ही वार्ता ऐकून सर्वांना वाईट वाटलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं, पण ज्याला त्याला ही अचंब्याची गोष्ट वाटली याचें कारण, कोणत्या आपराधामुळें महंमदअल्लींच्या कपाळीं अटक आली याची कोणालाच अटकळ करतां येईना. कां तें राजनिष्ठ म्हणून त्यांना अटक, कां महायुद्धाच्या वेळीं इंग्रजांना पोषक अशी तुर्कस्थानच्या बाबतींत त्यांची वागणूक होती म्हणून त्यांना अटक, त्यांना अटक झाली तरी कां ? —हा प्रश्न तेव्हां जितका अवघड होता, तितकाच आजलाही अवघड आहे. हा प्रश्नच उद्भवत नाहीं, इतकी महंमदअल्लींची वर्तणूक राजकारणाच्या दृष्टीनेंही पवित्र असतांनाही त्यांच्या कपाळीं सरकारनें अटक आणली, हा कमला

न्याय ? हा न्यायाचा निव्वळ तमाशा आहे असेंच तेव्हां प्रत्येकाला वाटलें व आजही वाटतें. अटकेचीं कारणें मुळींच देण्यांत आलीं नव्हती. आपली लागली अधिकाऱ्यांची लहर, केली अटक, असा महंमदअल्लींना अटक करण्यांत करमणुकीचा प्रकार झाला कीं काय नकळे ! पण महंमदअल्लींनीं ह्या आपत्तीला कमालीच्या धीरोदात्तपणें तोंड दिलें. त्यांचें मन लवमात्र खचलें नाहीं, पण जनतेच्या विशेषतः मुसलमान समाजाच्या मनांतील सरकारविषयींच्या विश्वासाचा पाया मात्र खचला. देशांत जिकडे तिकडे किती तरी निषेध-प्रदर्शक सभा भरविण्यांत आल्या, ठराव पास करण्यांत आले, व अल्लीबंधूंची सुटका व्हावी ह्मणून भारत मंत्र्यांपाशींही अनेक प्रकारें धरणें धरण्यांत आलें; पण सरकार पडलें तें ! टाकल्या ठिकाणाहून आपल्या हातून अन्याय घडला असला तरी एक इंच तरी मागें हटलें, तर तें सरकार, व त्यांतल्या त्यांत इंग्रज सरकार कसलें ?

ह्या अटकेबाबद महंमदअल्लींच्या रहात्या घरासभोंवार रामपूर येथेंच सरकारी निर्बंधाचें कुंपण घालण्यांत आलें होतें. आणि हें सत्कृत्यही सर जेम्स मेस्टन यांच्या अनुमतीनें करण्यांत आलें होतें. या अटकेंतून लौकरच त्यांना मुक्त करण्यांत आलें. पण हा पडदा पडतो न पडतो, तोंच त्यांच्या आयुष्याच्या रंगभूमीवर निराळ्या नव्या खेळाचा दर्शक असा नवा पडदा उघडला गेला. एक अटक त्यांच्या वाऱ्याची सुटली; पण दुसरी खरी खुरी अटक जवळ जवळ तेव्हांच, ता. १५ मे १९१५ रोजीं सुरू झाली. तो संस्मरणीय दिवस शुक्रवार होता. मुसलमानी धर्माप्रमाणें त्या दिवशीं दोघेही अल्लीबंधू जुम्मा पढावयास मशिदींत गेले होते. त्याच दिवशीं ह्या दोघां तेजस्वी देशसेवकांच्या कल्याणा विषयीं देवाची करुणा भाकण्यासाठीं दुसरे हजारों मुसलमानही त्याच मशिदींत जमून अल्लाला आळवीत होते. अल्लीबंधू सारख्या जगद्विख्यात पुढाऱ्यांच्या अटकेची बातमी हां हां ह्मणतां वाऱ्याप्रमाणें ज्याच्या त्याच्या तोंडीं पसरली

त्यामुळें लोकांच्या चर्येवर उदासीनताही पसरली पण प्रत्यक्ष अली बंधूंच्या चर्येवर उदासीनतेचा मागमूसही नव्हता. त्यांच्या समोर जे जे कोणी यावे, त्यांना त्यांना त्यांनीं हात जोडून प्राप्त प्रसंगाला धैर्यानें तोंड देण्यास सांगावें.

तेव्हांचा तो देखावा खरोखर पाषाणाच्या हृदयालाही पाझर फोडणारा होता. हजारों तरुण, म्हातारे, स्त्रीपुरुष या सर्वांच्या नेत्रांत अश्रु चमकत होते. त्यांच्या मुद्रा बापुडवाण्या झाल्या होत्या, अनेक लोक आपल्या ह्या पुढाऱ्यांच्या मुक्ततेविषयीं मनोभावानें अल्लाची करुणा भाकीत होते, अशा कार्यक्रमांत तासाचे तास निघून गेले व सायंकाळच्या सुमाराला सर्वांच्या दुःखाचा कडेलोट करणारी गोष्ट एकदांची घडून आली; अलीबंधूंना मोटारींत घालून थेट महारोली येथें नेण्यांत आलें. तेथून आणखी एकदोन ठिकाणीं त्यांना स्थानांतर घडवून शेवटीं छिंदवाडा येथें त्यांना ठेवण्यांत आलें. त्यांचा बाहेरील जगाशीं संबंध अर्थातच तेव्हांपासून कायमचा तुटला.

अटकेचा हुकूम दिल्लीच्या चीफ कमिशनरांनीं खरडला तेव्हां महंमदअली हे मधुमेहाच्या विकारानें आजारी होते. त्यापूर्वी कांहीं काळ महायुद्धाचा वणवा पहिल्यानें पेटला त्या सुमारास तर ते ह्या आजारानें आंथरुणाला खिळलेले होते. त्यांतून ते साधारण बरे होतात न होतात, तों त्यांच्या पत्नीचा आजार बळावला व तिनें आंथरूण धरलें. बेगम महंमदअली आजारांतच दिवस मोजीत होत्या; पण तेव्हां त्यांच्याकडे लक्ष्य देण्याला महंमदअलींना फारशी फुरसत मिळाली नाहीं. कारण, दोन हजार रुपयांच्या जामिनकीची तरवार जी त्यांच्या मानेवर लटकत होती, तिच्या तावडींतून कायदेशीर मोकळीक करून घेण्यासाठीं त्यांची धडपड चालली होती. हें कार्य आटोपतें न आटोपतें तोंच त्यांची प्रकृती पुन्हां भयंकर बिघडली व डॉक्टरच्या सल्यावरून त्यांना पूर्ण विश्रांति घेणें भाग पडलें. त्यांनीं छापखान्याची वगैरे सर्व व्यवस्था शौकतअलींच्या माथीं मारली. व

कामाची दगदग शक्य तों टाळली. इतकेंही करून रामपूरच्या उष्ण हवेंत त्यांच्या प्रकृतीला आराम वाटेना, तेव्हां त्यांना रामपूरच्या नवाबांनीं मसुरी येथें पाठविलें. तेथें त्यांच्यासाठीं नर्सिंग होममध्यें स्वतंत्र सोयवार जाग्याची चोख व्यवस्था करण्यांत आली होती. तेथून ते दिल्लीला आले, हेतु होता अजमीर येथें 'उरूस' च्या उत्सवाला जाण्याचा, पण त्यांच्या मनांत हा डाव होता, तेव्हांच भवितव्यतेनें नवा डाव रचला होता. त्या डावानुसार त्यांना दिल्लीला पुन्हां तीव्र रुग्णावस्था प्राप्त झाली, व त्याच प्रसंगीं त्यांना अटक करण्यांत आली.

---

## अपराध कोणाचा ?

अल्लीबंधूंना अटक करण्यांत आली. तेव्हां त्यांच्यावर अपराध कोणता लादण्यांत आला होता हें एक गूढच होतें. स्वतः अल्लीबंधूंनीं ह्या गोष्टीची कसून चौकशी केली, पण ना थांग ना पत्ता ! शेवटीं इ. स. १९१५–१६ च्या दिल्ली प्रांताच्या ऍडमिनिस्ट्रेशन रिपोर्टांत 'बचाव' ह्या सदराखालीं पुढील चार ओळी छापण्यांत आलेल्या आढळल्या:—

,......त्याच महिन्यांत ( मे ) महंमदअल्ली व शौकतअल्ली या दोघांना अटक करणें सरकारला अवश्य वाटलें याचें कारण, त्यांच्या शिकवणीनें मुसलमान समाजाच्या मनावर जें वजन पडले होतें, तें इंग्रज सरकारला घातक असें होतें. '

अल्लीबंधूंनी अटक केल्यापासून सरकारी रीत्या अगदीं पहिल्यानें खुलासा झाला तो वरच्याप्रमाणें. त्यावरून काय अर्थबोध होतो तो भगवान जाणें ! एवढा अर्थशून्य पुरावा अल्लीबंधूंना अटक करण्याला पुरेसा कसा झाला, असें ज्यांना ज्यांना वाटेल, त्यांना सूचनार्थ येथें एवढें सांगणें अवश्य आहे कीं, आधीं कृती करावयाची व मग कारणें

शोधावयाची, हें जगांतील हम करे सो कायदा राज्य पद्धतीचें वैशिष्ट्य असतें, व तें अशा अनेक प्रसंगीं उजेडांत येतें.

असो; वरचा खुलासा झाल्यानंतर थोड्या दिवसांनीं इंपिरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें ना. दादाभाईनीं भारत संरक्षण कानूची फेरतपासणी व्हावी अशा अर्थाचा एक-ठराव आणला, तेव्हां मझरूल हक्क यांनीं ह्या कायद्याचा दुरुपयोग कसा केला जातो, हें अलीबंधूंचें उदाहरण घेऊन सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. जर अलीबंधूंनीं खरोखर कांहीं अपराध केला असेल, तर त्यांना सरकारनें खुशाल अटक करावी. देशाच्या संरक्षणासाठीं ज्या ज्या गोष्टी सरकारला कराव्या लागतील, त्या त्या करण्याच्या बाबतींत आपणही सरकारला मदत करूं. पण अलीबंधूंच्या कोणत्या कृत्यामुळें सरकारवर व देशावर अशी कोणती आपत्ति कोसळली, हें सर्वांना अगोदर जाहीर करणें हें सरकारचें कर्तव्य आहे, असेंही ना. हक्क यांनीं सांगितलें.

वरच्या पृच्छेला गृहमंत्र्यांनीं जें उत्तर दिलें तें असें ........ अटक झालेल्या लोकांचे सामान्यतःदोन वर्ग करतां येतात. यांपैकीं एका वर्गांतील लोक उघड उघड व हेतु पुरस्सर सरकारविषयीं लोकांच्या मनांत अप्रीति उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतात, शांततेचा भंग होईल अशा प्रकारच्या भावना लोकांच्या मनांत उद्दीत करतात, अशा त्यांच्या उपद्व्यापांमुळें जनतेच्या मनांत सरकार व सरकारी अधिकारी यांच्याविषयीं काळें बेरें उत्पन्न होऊन सरकारच्या शत्रूचें फावण्याचा संभव असतो. ज्या वेळीं कोणीहि उघड उघड लेखनद्वारा किंवा भाषणद्वारा अशा प्रकारचा प्रयत्न करीत असतो, त्या वेळीं त्याच्या हेतूविषयीं शंका रहात नसून त्याच्या प्रयत्नांचा जनतेच्या मनावर काय परिणाम होतो, एवढेंच पहावयाचें असतें. हें पहाण्यासाठीं किंवा याचा शोध करण्यासाठीं स्वतंत्र कमेट्या नेमण्याची किंवा कमिशनें बसवण्याची आवश्यकता नाहीं. हा प्रश्न सरकारच्या कार्यकारी मंडळानें आपल्या निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या मताच्या अनुरोधानें व जनतेच्या कल्या·

ण्याच्या दृष्टीनें सोडवावयाचा असतो. त्या बाबतची माहिती कार्यकारी मंडळाबाहेरील कोणत्याही माणसाला देणें इष्ट नसते.

" वरच्या जातीच्या गुन्हेगारांचा दुसरा वर्ग गुप्त कटवाल्यांचा होय. अशा लोकांच्या मागे गेल्या कैक वर्षांतील गुप्त चळवळीचा पुरावा आहे. असे किती तरी लोक वेश व नांवें पालटून देशांत व देशाबाहेर ठिकठिकाणीं सध्यां गुप्तपणें भटकत आहेत; त्यांची माहितीहि सरकारला उजेडांत आणतां यावयाची नाहीं, व त्यांच्या डावपेचांची जाणीव सरकारला आहे हें इतरांना कळूं देणें सुरक्षित-पणाचेंही नाहीं. जगासमोर आणण्यासारख्या ह्या गोष्टी मुळींच नाहींत. या बाबतींत मी एवढें आश्वासन देऊं शकेन कीं, दुसऱ्या प्रकारच्या आरोप्यांना कोणत्याही प्रकारचें शासन करण्यापूर्वीं, त्यांचें व्यक्ति-स्वातंत्र्य देशाला व साम्राज्याला घातक आहे किंवा कसें हें ठरवण्या-पूर्वीं किंवा ठरवल्यानंतरही योग्य अशा न्यायाधिशांच्या नजरेखालून त्यांचे खटले नेले जातील. असें करण्याचा हेतु एवढाच कीं, अशा वेळीं सरकारच्या हातून कोणतेंही अविचाराचें कृत्य होऊं नये.

अलीबंधूंच्या अटकेला त्यांचे जे अपराध कारणीभूत झाले, त्यांचें सरकारी पुराण वरच्याप्रमाणे होतें, वरच्या व्याख्येप्रमाणें सरकारच्या मतानें ते उघड उघड सरकारविषयीं असंतोष पसरविणारे आरोपी होते. त्यांच्या कृत्यानीं सरकारच्या शत्रूचा फायदा होण्यासारखा होता. ते अपराध कोणते होते, हें सांगणें सरकारचे काम नव्हतें व ऐकणें जनतेचें, कायदेकौन्सिलाच्या सभासदांचेंही काम नव्हतें. आणि सगळ्यापेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे, भारतसंरक्षण कानूंत, 'ज्या माणसानें वरच्याप्रमाणें अपराध केला असेल त्यालाच नजर कैद किंवा अटक असावी ' असें नसून, तो तसा प्रयत्न करीत आहे, करणार आहे किंवा करण्याचा संभव आहे, व त्याच्या तसल्या कृत्या-मुळें देशाचें नुकसान होण्याचा संभव आहे, असा भरंवसा वाळगून त्या माणसाला सरकारला अटक करतां येते ! "

वरच्या सरकारी खुलाशानें जनतेचें समाधान अर्थातच होण्यासारखें नव्हतें. तेव्हां जिकडे तिकडे सभासम्मेलनें भरून व ठराव पसार होऊन, सनदशीर रीतीनें हिंदी राज्यकारभारांत अंतस्थ सुधारणा घडवून आणण्यासाठीं झटणाऱ्या सर्व लोकांच्या खटल्यांची फेर तपासणी झाली पाहिजे असे जनतेनें आपलें मत जाहीर केलें. ह्यॉ प्रश्नाला विशेष भयाण स्वरूप प्राप्त होण्याचें कारण श्रीमती ॲनी बेझंट व त्यांचे साथीदार यांनाही भारत रक्षण कानू अन्वयें नजर कैद त्याच सुमाराला प्राप्त झाली होती. ह्या सरकारी कृत्याचा गवगवा दिवसें दिवस वाढतच होता. शेवटीं श्री. जीना यांनी लेजि. कौन्सिलमध्यें प्रश्न विचारून नजर कैद्यांच्या मुक्ततेविषयीं चौकशी केली. तेव्हां सर वुइलिअम व्हिसेंट यांनीं जें सरकारी उत्तर दिलें तें असें:—"श्रीमती बेझंट व त्यांचें दोघे साथीदार श्री. वाडिया व अरुंडेल हीं तिघे जणें जर लढाई चालू असतां कोणत्याही प्रकारची बेसनदशीर चळवळ आपण करणार नाहीं अशी हमी देत असतील, तर त्यांच्या सुटकेविषयीं हिंदुस्थानसरकार मद्रास सरकारपाशीं शिफारस करण्यास तयार आहे. सदर कानूखालीं नजर कैदेंत असलेल्या इतर लोकांविषयीं ही त्यांची चळवळ राजकीय स्वरूपाची असेल तर वरच्या अटीवर त्यांच्या मुक्ततेविषयीं त्या त्या सरकारपाशीं शिफारस करण्यास हिंदुस्थान सरकारची तयारी आहे.

वरच्या उत्तरावरून श्री. जीना यांचें मन साहजिकपणें अलीबंधूकडे वळलें, व त्यांनीं दुसरा पुरवणी प्रश्न विचारला कीं, अलीबंधूंचा खटला विचारांत घेण्याची सरकारची तयारी आहे किंवा कसे ? श्री. जीनांच्या प्रश्नालाही सरकारकडून उत्तेजनकारक उत्तर मिळालें, ' अलीबंधूंच्या खटल्याविषयीं सरकार सध्यां विचार करीत आहे व त्या बाबत चौकशी चालू आहे. '

यानंतर ता. ५ सप्टेंबर सन १९१७ रोजीं सिमल्याहून अबदुल मजीद हे पो. सुपरिटेंडेंट छिंदवाड्याला रवाना झाले, व त्यांनीं सर

चार्लस क्लीव्हलंड यांनीं सही करून दिलेलें हमीपत्र ( Undertaking) अलीबंधूंना दाखविलें. तें पुढील प्रमाणें होतें:—

'I shall abstain during the remainder of the war from doing, writing or saying any thing intended or reasonably likely to encourage or assist the enemies of the King-Emperor. I shall also abstain from doing, writing or saying anything intended or reasonably likely to be construed as an attack upon the allies and friends of the King Emperor. I also promise to abstain from any violent or unconstitutional agitation which is likely affect the public safety.'

'The abstentions promised above are not intended to cause me to refrain from participation in politics within constitutional limits.

वरचें चिटोरें सरकारकडून अलीबंधूंना मसूदादाखल आले त्याचा मराठी भावार्थ असा:—' मी लढाई संपेपर्यंत, बादशहांच्या शत्रूंना साह्यभूत होईल अशी कोणतीही गोष्ट करणार नाहीं, तसेंच बादशहा व त्यांचे इतर दोस्त यांच्यावर कोणत्याही प्रकारचा चढाव करणार नाहीं. त्याप्रमाणेंच सार्वजनिक शांततेचा जेणेंकरून भंग होईल. अशी कोणतीच बेसनदशीर चळवळ मी करणार नाहीं. ह्या सर्व निर्बंधांमुळें सनदशीर राजकीय चळवळ चालविण्याच्या कामीं माझ्या वाटेंत अडथळा येतो असें मात्र मुळींच नाहीं."

खुळे बिचारे सरकारी अधिकारी ! असली अपमानास्पद शरण-चिठी लिहून देऊन अलीबंधू मुक्त होऊं पहातील असा संशय तरी त्यांना कां आला नकळे ! त्यांची ती अपेक्षा जगाच्या अपेक्षेप्रमाणेंच परिणामीं फोल ठरली. सरकारनें मोठ्या आशेनें शरणचिठ्ठीचा मसुदा पाठविला, त्याला अलीबंधूकडून पुढीलप्रमाणें सडेतोड उत्तर मिळालें:—

" आम्ही मुसलमान लोक नेहमीं अल्लाला भिऊन वागत असतों; आमच्या पैगंबराचें चरित्र, शिकवण व पवित्र कुराणांत त्यानें निवेदि

लेल्या आज्ञा ह्या डोळ्यांसमोर ठेऊन आम्ही सदैव वागत असतों. ह्या आमच्या विश्वासाला, धर्मभावनेला धक्का जोंवर लागला नाहीं, तोंवर आम्ही कायदा पाळून नम्रपणानें वागणारे नम्र सेवक आहोंत, व आम्ही सर्व बेसनदशीर व अत्याचारी चळवळींना त्याज्य मानूं: ही परिस्थिती आजकालची आहे असें नाहीं; जगाच्या पाठीवर महा-युद्ध चाललेलें असो वा नसो, कोणत्याही परिस्थितींत वरच्या तत्वां-पासून आम्हीं ढळणार नाहीं. अर्थात वरील मर्यादेचें उल्लंघन होत नाहीं, तोंवर कोणत्याही प्रकारची हमी देण्याची आमची कोणत्याही वेळीं तयारी आहे. त्याचा अर्थ आम्ही असाच घेतों कीं, वरचे निर्बंध कोणत्याही प्रकारें आमच्या धार्मिक कर्तव्यांच्या आड येत नाहींत, किंवा सनदशीर राजकीय चळवळीपासून आम्हांला परावृत्तही करूं शकत नाहींत."

दोन दिवसांनंतर महमुदाबादचे राजेसाहेब सरकारच्या विनंती-वरून छिंदवाड्याला गेले. त्यांनीं अलीबंधूंची भेट घेतली व त्यांच्या शीं त्यांच्या सुटकेच्या प्रश्नावर बरीच चर्चा केली. ती चर्चा राजे-साहेबांना पूर्ण समाधानकारक वाटली. मात्र मुलाखत आटोपल्यावर परत जातांना त्यांना राग आला याचें कारण त्यांच्या मागेंही सरका-रनें गुप्त पोलिसाचा ससेमिरा ठेवला होताच !

ह्या एकंदर प्रकारावरून अलीबंधू ॲनी बेझंटबाई बरोबर सुटतील अशी सर्वांची अटकळ होती. पण ता. १२ सप्टेंबर रोजीं फक्त बेझंट बाई व त्यांचे दोघे साथीदार यांचीच कायती मुक्तता झाली.

यानंतर ता. २६।९।१७ पर्यंत महत्वाचा असा कोणताच प्रकार घडला नाहीं. त्या दिवशीं पुन्हां कायदे कौन्सिलांत श्री. जीना यांनीं तोच प्रश्न विचारला. त्याला सर वुइलियम व्हिन्सेंट यांनीं पुढील आश-याचें उत्तर दिलें:—"महंमदअली व शौकतअली यांना करण्यांत आलेली अटक ही केवळ त्यांच्या राजकीय चळवळीबद्दल करण्यांत आली नसून त्यांनीं उघड उघड आपली सहानुभूति शत्रुपक्षाच्या



मौलाना शौकतअली.

The New Madhukar P. Press, Bombay.

बाजूनें दाखवून सार्वजनिक शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न केला, हें त्याचें खरें कारण होय. हिंदुस्थान सरकारनें ह्या दोघां व्यक्तींविषयीं पूर्ण चौकशी केली आहे, व चौकशीअंतीं मिळालेली माहिती, योग्य जबाबदार अशा व्यक्तींचीं त्यांच्या विषयींचीं मतें व पूर्वींच्या कागद-पत्रांची फेर तपासणी ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतां ह्या दोघांचें वर्तन ह्या बाबतींत सुधारलें आहे, अशी समाधानकारक स्थिति हिंदु-स्थान सरकारला दिसली नाहीं, यामुळें त्यांच्या मार्गांतील अडथळे दूर करणेंही सरकारला श्रेयस्कर वाटत नाहीं.

वरील उत्तरांत 'पूर्वींचे कागदपत्र' (Previous papers) जे सरकारकडून घुसडून देण्यांत आले आहेत, ते सरकारच्या हातीं कधीं सांपडले परमेश्वराला माहीत! ता. ५ सप्टेंबरपर्यंत ह्या कागद-पत्रांचा नामनिर्देशही कोठें करण्यांत आला नव्हता. असें असतां त्यानंतर ता. २६ सप्टेंबरपर्यंत केव्हां तरी त्यांची जुळवाजुळव डाव्या ना उजव्या हातानें करण्यांत आली असावी हें उघड आहे. यांत वाइटांतून चांगलें जें निष्पन्न झालें तें एवढेंच कीं, अलीबंधूंना कोण-त्या अपराधाबद्दल सरकारनें नजर कैदेंत ठेवलें आहे, याचा थोडासा मागमूस जनतेला लागला तरीही हे कागदपत्र कसल्या प्रकारचे, कोणी कोणाला लिहिलेले होते वगैरे गोष्टी तशाच गुलदस्तांत होत्या.

वर निर्देशिलेले 'पूर्वींचे कागदपत्र' हीं दोन पत्रें आहेत; एक अफगाणिस्थानच्या अमीराला लिहिलेलें व दुसरें लखनौ येथील फारंगी महालच्या धर्माध्यक्षाला लिहिलेलें आहे, असें म्हणतात. हीं दोन्ही पत्रें अत्यंत त्वेष उत्पन्न करणारीं व राजद्रोही (treasonable) आहेत असा त्यांच्या नांवचा गवगवा झालेला आहे. त्यांपैकीं पहिलें पत्र महंमद अलींनीं उर्दूंत लिहिलें असून दुसरें पत्र शौकतअलींनीं लिहिलें आहे असें म्हणतात !

अलीबंधूंना वरील पत्रांचा इतिहास कळतांच त्यांनीं ताबडतोब महमुदाबादचे राजेसाहेब ना. मझरुल हक्क व ना. जीना यांच्या नांवानें

तार लिहून नजर कैद्याच्या रिवाजाप्रमाणें सेन्सॉरच्या स्वाधीन केली. त्यांनीं तारेंत स्पष्टपणें सदर दोन्हीं पत्रें आपण लिहिलेलीं नाहींत असें सांगितलें होतें. इतकेंच नव्हे, तर अशीं पत्रें सरकारपाशीं असल्यास त्यांनीं तीं उजेडांत आणून खऱ्या खोट्याचा स्पष्ट निर्णय करून घ्यावा असेंही त्यांनीं बजावलें होतें. पण ह्या तारेचा कांहींच उपयोग झाला नाहीं व इ. स. १९१७ च्या आक्टोबरच्या अखेर पर्यंत कांहीं नवीन खुलासाही झाला नाहीं असें पाहून महंमदअल्लींनीं व्हिन्सेट साहेबांच्या जागीं नवीन आलेले गृहमंत्री सर जेम्स डुबोले यांना पत्र लिहून वरील दोन्हीं किंवा त्या प्रकारचीं दुसरीं कोणतींही आक्षेपार्ह पत्रें आपण किंवा आपले बंधु यांनीं कधींच लिहिलीं नसल्याचें कळवून सत्याचा तळठाव पहाण्यासाठीं म्हणून तीं पत्रें आपणांला पहावयास मिळावीं अशी त्यांनीं विनंती केली होती. ही विनंती मान्य केली गेली नाहीं, हें स्वतंत्र सांगण्याची आवश्यकताच नाहीं. अशा प्रकारें ह्या पत्ररहस्याला सरकारनें जन्म मात्र दिला; पण त्यांचा योग्य तो खुलासा मुळींच केला नाहीं. त्यांच्या खरेपणाविषयींच्या सर्व गोष्टी अंधारांतच आहेत, व विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, तीं पत्रें अल्लीबंधूंनींच लिहिलेलीं आहेत किंवा कसें हें योग्य प्रकारें शाबीत करण्याच्या ऐवजीं सत्य गुलदस्तांत झांकून ठेऊन, जेव्हां जेव्हां अल्लीबंधूंचा संबंध येतो, तेव्हां तेव्हां त्या पत्रांची ढालतरवार पुढें करून सरकार आपला बचाव करीत असतें.

असो; पुढें बेझंटबाईंची व त्यांच्या साथीदारांची सुटका झाल्यावर त्यांनीं अल्लीबंधूंच्या नजर कैदेच्या बाबतींत सरकारशीं पत्रव्यवहार केला, त्यानें तर सरकारच्या एकंदर डावपेंचांवर चांगलाच प्रकाश पाडला. त्यांना जें उत्तर मिळालें त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, अल्लीबंधू हे राजद्रोही किंवा बेसनदशीर चळवळे आहेत म्हणून त्यांना नजर कैदेंत ठेवण्यांत आलें नसून सध्यां महायुद्ध अशा थराला पोंचलें आहे कीं, यावेळीं त्यांची सुटका करणें धोक्याचें होईल. यावरून

निष्कर्ष निघतो तो असा कीं, जनतेच्या दृष्टीनें तर राहोच; पण सरकारच्या दृष्टीनेंही राजा व प्रजा यांच्या हिताला बाधक असें कोणतेंही आचरण अलीबंधूंच्या हातून घडलें नाहीं; भय होतें तें एवढेंच कीं, न जाणों महंमदअलींची सहानुभूति कदाचित रशियांतील नवोदित चळवळीकडे झुकेल व मग त्रास होईल.

थोडक्यांत वरच्या सर्व प्रकरणाचा समारोप करावयाचा तर तो असा करतां येईल कीं, अलीबंधू वरील प्रकरणांत पूर्ण निर्दोषी होते; पण त्यांच्या नशिबानुसार त्यांना गुप्त पोलिसाच्या भिशाच्यानें झपाटून ह्या गोत्यांत आणलें होतें. अशा प्रकारें लोकमताला धाब्यावर बसवून बेबंदशाही कारभार पुढाऱ्यांना त्रास देण्याच्या बाबतींत कसा चालतो, याचें हें ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण आहे.

---

## अटकेंतून मोकळीक.

ता. २५ डिसेंबर १९१९ रोजीं बादशाही जाहीरनामा प्रसिद्ध झाला, त्यामुळें अलीबंधूंची राजाच्या मेहेरनजरेनें सुटका झाली. त्यानंतर चार दिवसांनीं, ता. २९ रोजीं अमृतसर येथें पंडित गोकर्णनाथ मिश्र यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन सुरू झालें. त्या अधिवेशनाला अलीबंधूंना हजर रहातां आलें. त्यांना आपल्यांत आलेले पहातांच सर्व मंडळीला किती अवर्णनीय आनंद झाला असेल याची कल्पनाच करणें चांगलें. तावडतोब अध्यक्षांच्या सूचनेवरून दोघांही बंधूंना राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी निवडण्यांत आलें व त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या सर्व कार्यक्रमांत तेव्हां प्रामुख्यानें भाग घेतला.

त्या राष्ट्रीय सभेसमोर सर मायकेल ओडवायर यांना इशर कमिटीच्या सभासदत्वाचा राजीनामा देण्यास सांगण्याविषयीं सरकारला सुचविण्याविषयींचा ठराव होता. त्याप्रसंगीं महंमदअलींनीं जें भाषण

केलें, त्यावरून त्यांची पुढील चळवळ कोणत्या स्वरूपाची असेल याची अटकळ करतां येण्यासारखी होती. त्यांनीं पहिल्यानें हरून-अल-रशीद, त्याचा अमीन व शिक्षक अबू नवास यांची गोष्ट सांगण्यास सुरवात केली. हरून-अल-रशीदनें आपला मुलगा अमीन याला काव्य कसें करावें हें शिकवण्यासाठीं अबू नवास नांवाचा शिक्षक नेमला. एके दिवशीं शिक्षकानें आपल्या शिष्याला त्याच्या कविता बऱ्या नाहींत असें सांगितलें, त्याबद्दल अमीननें-विद्यार्थ्यानें शिक्षकाला तुरुंगांत पाठविलें. हरून-अल-रशीदला ही गोष्ट कळतांच त्यानें आपल्या चिरंजिवांची चांगली कान उघाडणी केली, व शिक्षकाला कारागृहांतून मुक्त करून त्याच्या पूर्वीच्या जागीं त्याची पुन्हां नेमणूक केली. अमीननें आपली कविता आपल्या बापाला दाखविली व त्याचें तिजविषयीं मत विचारलें. बापानें कविता वाचली व कांहीं मत देण्यापूर्वीं पायांत जोडे चढविण्यास सुरवात केली. असें करण्याचें कारण विचारतां बापानें उत्तर दिलें कीं, ही कविता पूर्वी इतकीच अजूनही टाकाऊ आहे, पण आपण तसें बोलावें तर आपल्याही कपाळीं अबू नवास प्रमाणेंच तुरुंगवास यावयाचा ! यासाठीं कवितेवर मत देण्यापूर्वीं आपण तुरुंगाचा रस्ता सुधारीत आहों.

वरील गोष्टीच्या शेवटीं, आपल्या खटल्याचाही थेट असाच प्रकार आहे असें महंमद अलींनीं सांगितलें. तुरुंगांतून आपली सुटका नुकतीच झाली असली तरी सरकाराच्या अन्याय्य कृत्याचा निषेध केल्याशिवाय आपल्याच्यानें राहवणार नाहीं, व त्याबद्दल आपल्या वांट्याला तुरुंगवास यावयाचा असेल तर त्याला माझी एकी पायावर तयारी आहे असें ते तेव्हां म्हणाले. त्यांच्या शब्दाचा रोंख जालियनवाला बागेंतील कत्तलीवर होता हें सांगावयाला नकोच. जालियनवाला बागेंत सरकारी सैनिकांच्या बंदुकींतून सूं सूं करीत निघालेल्या गोळ्यांनीं जनतेच्या देहांनाच जखमा केल्या असें नव्हे, तर देहापली-

कडे त्यांच्या मनाला, आत्म्यांनाही त्यांनीं रक्तबंबाळ करून सोडलें होतें. ह्या सरकारी अत्याचाराचा परिणाम म्हणून तरी सर्व हिंदुस्थानानें एकोपा करून कार्याला लागले पाहिजे, नुसते ठराव पास करण्यांत कांहीं अर्थ नसून ते ठराव आचरणांत आणले तर त्यांचा उपयोग. यापुढें आपण अत्याचार, जुलूम--जबरदस्ती सहन करावयाची नाहीं, असा हिंदी जनतेनें आतां तरी मनाचा निर्धार करावा. स्वातंत्र्य हा व्यक्तीमात्राचा जन्म सिद्ध हक्क आहे, त्या हक्काची शाबिती करण्यासाठीं प्रत्येकानें अटक, नजर कैद, साधी कैद किंवा त्याहीपेक्षां कठोर अशी शिक्षा भोगण्यास आनंदानें तयार झालें पाहिजे. जगांत जर हिंदुस्थान देशाचें अस्तित्व सिद्ध व्हावयाचें असलें तर तें स्वतंत्र हिंदुस्थानचें अस्तित्व सिद्ध झालें पाहिजे; तेथें गुलामगिरींत कुजत पडलेल्या हिंदुस्थानची उभारणी होतां उपयोगी नाहीं.

वरच्या आशयाचें महंमदअल्लींचें भाषण झालें, त्यानें जनतेच्या मनोभावना उद्दीपित केल्या व सर्वांसमोर नवीन कर्तव्यक्षेत्र उघडलें आहेसें वाटूं लागलें. पण त्याच वेळीं नोकरशाहीच्या मेंदूतही अशी जबरी कालवाकालव झाली कीं, अल्लींबंधू आतां काय करतात व काय न करतात. थोड्या दिवसांनीं सर विइलियम व्हिन्सेंट यांनीं कौन्सिलमध्यें बोलतांना अल्लीबंधूंच्या सदर भाषणाचा उल्लेख करून नक्राश्रु ढाळले कीं, हे पहा अल्लीबंधू ! बादशाही जाहिरनाम्याच्या मेहेरबानीनें तुरुंगांतून सुटून दोन दिवस झाले नाहींत तोंच राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर उभे राहून कसें जळजळीत, अत्याचारी व सरकाराला विरोधक भाषण करतात ते पहा ! सुटकेच्या दिवसापासून महंमदअल्लींनीं राष्ट्रीय सभेच्या राजकीय चळवळींत मनापासून भाग घेण्यास सुरवात केली. त्यांची इंडियन मॉस्लेम लीग त्या सुमाराला त्यांच्या मताच्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं ओघानेंच आली होती. पण हिंदुमुसलमानांच्या एकीच्या प्रश्नाकडे योग्य लक्ष्य देतां व त्या एकीचें महत्व ध्यानीं घेतां मुसलमानांनीं राष्ट्रीय चळवळींत एक-

ग्रा. क्र. ..........

राष्ट्रियत्वानें भाग घेणें अवश्य होतें. मुसलमानांना स्वतःच्या हितासाठी हिंदी जनतेच्या एकमताच्या मदतीची आवश्यकता होती. अशी मदत मिळवावयाची तर त्याला राष्ट्रीय सभा हाच काय तो साधा व खुला राजमार्ग होता. राष्ट्रीय सभेला मुसलमान लोक आपल्या बरोबरीनें काम करण्याला हवे होते; प्रश्न फक्त मुसलमानांच्या खुषीवर होता. ती खुषी महंमदअल्लींच्या प्रयत्नांनीं साधली व राष्ट्रीय सभा मुसलमानांनाही आपलीशी वाटूं लागली. ही एकच गोष्ट ध्यानीं घेतली तरी महंमदअल्लींच्या प्रयत्नांचें ही एकी हें फळ होय, यावरून महमद अल्लींच्या स्वदेशाभिमानाबरोबर त्यांची राष्ट्रीय सभेवरील निष्ठाही किती थोर होती, हें कळून येण्यासारखें आहे. इतकेंच काय, पण हिंदुस्थानला (Declaration of Rights) मिळविण्याविषयींचा जो ठराव अमृतसर येथील राष्ट्रीय सभेपुढें आला, तो वेळेच्या अभावामुळें अध्यक्षांनीं पुढें मांडला, तरी त्याच्या अनुमोदकाच्या जागीं महंमद अल्लींचें नांव झळकत होतें.

यावेळींही इंडियन मॉस्लेम लीगच्या आंगीं पूर्वीपासून बाणलेला मिळमिळीतपणा बहुतांशीं कायम होता. ह्या विधानाला साक्ष म्हणजे त्याचवेळीं अमृतसर येथें मॉस्लेम लिगची जी बैठक झाली, त्या बैठकींत सरकारचे मॉंटेग्यू-चेल्म्सफोर्ड सुधारणाविषयीं गोडवे गाण्यांत राष्ट्रीय सभेपेक्षां मॉस्लेम लीगचाच वर नंबर लागला.

तसेंच महंमदअल्लींच्या मनोभावनांविषयीं किंवा सनद-देसनदशीरपणाविषयीं ज्यांचीं मनें अजून साशंक आहेत, त्यांच्या माहितीसाठीं सांगावयाचें तें हेंच कीं, सरकारनें दिलेल्या वरील सुधारणा अत्यंत अपुऱ्या व निराशाजनक असतांही, सनदशीर मार्गांनीं झगडण्याचें महंमदअल्लींचें ब्रीद असल्यामुळेंच तेथील राष्ट्रीय सभेपुढें आलेल्या सुधारणा ठरावावरील श्री. बिपिनचंद्र पाल यांच्या उपसूचनेला महंमदअल्लींनीं पाठिंबा दिला होता. ती उपसूचना पुढील स्वरूपाची होती. "ही राष्ट्रीय सभा मध्यां तरी अशी शिफारस

करते कीं, सरकाराकडून मिळालेल्या सुधारणांचा शक्य तों लौकर पूर्ण स्वराज्य मिळविण्याच्या कामीं होईल तेवढा उपयोग करून घ्यावा. तसेंच ही राष्ट्रीय सभा श्री. मॉंटेग्यू यांनीं ह्या सुधारणादानाच्या कामीं जे श्रम घेतले, त्यांबद्दल त्यांची आभारी आहे."

सुटका झाल्या दिवसापासून महंमद अल्लींचें सार्वजनिक आयुष्य पूर्वींपेक्षांही जास्त मोलाचें व जबाबदारीचें असें झालें. रयतेचा त्यांच्यावर पूर्वींपेक्षांही दृढ विश्वास बसला. ह्या विश्वासाचें द्योतक ह्मणूनच पुढें त्यांची योजना विलायतेंत राष्ट्रीय सभेच्या वतीनें काम करण्यासाठीं जाणाऱ्या लोकमान्यादि थोर लोकांच्या बरोबर करण्यांत आली. महंमहअल्लींची परदेशीं जाऊन राष्ट्रीय सभेच्या वतीनें धडाक्याची चळवळ करण्याची सर्वतोपरीनें पात्रता होतीच. ती पात्रता हिंदु रयतेनें व हिंदु पुढाऱ्यांनींही ओळखली व हिंदु-मुसलमान हा भेद ध्यांनीं न घेतां योग्यतेच्या माणसावर योग्य ती जबाबदारी संपवली, यांत हिंदूंचीही गुणग्राहकता व मुसलमानांविषयींची प्रेमलता दिसून येते.

इंडियन मॉस्लेम लीगमध्यें तर महंमद अल्लींशीं बरोबरी करील एवढा थोर मनुष्य दुसरा कोणीच पुढारी नव्हता. व ह्या गोष्टीचें प्रत्यंतर, ह्मणजे मॉस्लेम लीगची बैठक साधण्यासाठीं राष्ट्रीय सभेच्याच दिवशीं, ता. ३० डिसेंबर रोजीं मॉस्लेम लीगच्या मंडपांत गेले, तेव्हां सर्व लोकांनीं एक जात उभे राहून त्या दोघां बंधूंचें स्वागत केलें व 'अल्ला हो अकबर' च्या जयघोषानें व टाळ्यांनीं सर्व सभास्थान कित्तिएक मिनिटेंपर्यंत दणाणून सोडलें. अमृतसरच्या सर्व जनसमूहाला व विशेषतः मुसलमान लोकांच्या उत्साहाला त्या दिवशीं पौर्णिमेची भरती आली होती. त्यांचें आगमन मंडपांत होतांच ठराविक कार्यक्रम बिचारा मागें पडला व लोकांच्या अप्रतिहत आग्रहामुळें अध्यक्षांनां महंमदअल्लीस भाषण करण्याविषयीं विनंति करावी लागली. लोकांचा उत्साह पाहून महंमदअल्लींसारख्या

तेजस्वी व श्रद्धाळू पुढाऱ्याचा उत्साह दुणावला-तिणावला. ते प्रसन्न मुद्रेनें भाषण करावयास उभे राहिले तेव्हां पुन्हां किती एक मिनिटें-पर्यंत ' अल्ला हो अकबर ' च्या जयघोषानें मंडप दणाणून गेला. आपल्या भाषणांत त्यांनीं इस्लामी लोकांच्या अधःपाताचें वर्णन करून सर्व लोकांना कणखर व करारी आवाजानें विचारलें, " लोक हो, सांगा: आतां तुह्मी जनरल डायर, त्याच्या फटके मारण्याच्या व पोटावरून सरपट चालण्याच्या हुकमती यांचें अनुकरण करणार कीं देवाच्या-सर्व राजांचाही जो राजा, त्या महाराजाच्या हुकमतीचें अनु-करण करणार ? "

सर्व लोकांनीं महंमद अल्लींच्या कळवळयाच्या प्रश्नाला कळव-ळ्याचें उत्तर गगन भेदक स्वरांत दिलें, " आह्मी परमेश्वरा-शिवाय दुसऱ्या कोणाचेंही अनुकरण करणार नाहीं; आह्मी अल्ला-शिवाय दुसऱ्याकोणाचीही आज्ञा मानणार नाहीं. "

यानंतर सर्व जगावर एकट्या परमेश्वराची एकतंत्री सत्ता कशी चालत असते. व सर्व लोक दुसऱ्या कोणत्याही ' हंगामी ' राजापेक्षां त्या राजाधिराजाचें अक्षयचे प्रजाजन कसे आहेत हें सर्वांच्या मनावर बिंबवलें. अल्ला व त्यानें उपदेशिलेला धर्म यासाठीं आपण आपल्या सर्वस्वाचा यज्ञ–आपली धन दौलत, आपला बंधु, आपली आई, आपलीं बायकोमुलें या सर्वांचा होम करण्याची आपली तयारी अस-ल्याचें त्यांनीं त्या प्रसंगीं जगजाहीर केलें. त्यांच्या सुटकेनें जर कांहीं गोष्टींच्या सत्यतेचा प्रकाश जनतेच्या मनांत पाडला असेल तर तो हाच कीं, रोजच्या रोज त्यांच्या आयुष्यांतील जीवित साफल्याचीं–माय-देशाचें मंगल, स्वधर्माचा गौरव, व समतेचा विजय वगैरे कल्पनांच्या सार्थकाचीं स्वप्नें खरीं होण्याची वेळा जवळजवळ येत चालली आहे व दिवसेंदिवस त्यांच्या व परमेश्वराच्या मधील अंतर कमीकमी होत आहे. त्यांचें संभाषण ऐकतांना त्याचा लोकांच्या मनावर इतका तीव्र

परिणाम झाला कीं, त्यांचा प्रत्येक शद्ब प्रत्येक श्रोत्याच्या नेत्रांतून एक एक अश्रुधारा खळखळ वहाती करीत होता. °

अलीबंधूंच्या सुटकेनंतर हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत आनंदाच्या लाटा उसळून राहिल्या, व ज्याला त्याला कर्तव्याची जाणीव उत्पन्न झाली. हिंदी जनतेची पूर्ण सहानुभूति त्यांच्या प्रत्येक कामीं होतीच, व त्या सहानुभूतीचें द्योतक ह्मणून त्यांचा गौरव करूनच जनता थांबली नाहीं, तर नजर कैदेच्या मुदतींत जो अपरिमित आर्थिक तोटा झाला असेल, त्याची अंशत: तरी भरपाई करण्यासाठीं म्हणून एक अखिल भारतीय सभा नेमून तिच्यामार्फत बराच मोठा फंड गोळा करण्यांत आला व तो अलीबंधूंना अर्पण करण्यांत आला. अली बंधूंनीं आदरपूर्वक त्या देणगीचा स्वीकार केला व तिचा लोककल्याणाच्या कामीं विनियोग करण्याचें ठरविलें.

---

## खिलाफतकार्याची प्राणप्रतिष्ठा.

अमृतसर सोडलें न सोडलें, तोंच महंमद अलींनीं आपल्या वडील बंधूंच्या—शौकतअलींच्या संमतीनें व मदतीनें खिलाफतीचें कार्य हातीं घेतलें. जानेवारी १९२०च्या दुसऱ्या आठवड्यांत दोघां बंधूंनीं आपल्या सहीचा पुढीलप्रमाणें जाहीरनामा कार्यासंबंधीं प्रसिद्ध केला:—

"व्हाइसरायसाहेबांना आम्ही खिलाफत सभेच्या शिष्ट मंडळाला मुलाखत देण्याची विनंती केली आहे व त्यांच्याकडून एक दोन दिवसांतच उत्तर येईल अशी आमची अटकळ आहे. तसेंच इंग्लंड इराण, अमेरिका व तुर्कस्थान या देशांत खिलाफत शिष्टमंडळें पाठविण्याविषयींची व्यवस्थाही करण्यांत येत आहे. हीं शिष्टमंडळें बहुधा या महिन्याच्या अखेरीला हिंदुस्थानांतून निघतील असें वाटतें. आमची फिर्याद इतकी खरी व धर्माच्या इतक्या मजबूत पायावर उभारलेली

आहे कीं, तिच्या प्रीत्यर्थ चालविलेल्या चळवळींत अम्हांला यश येईल किंवा नाहीं याविषयीं आम्हांला फारशी शंका मुळींच वाटत नाहीं. यूरोपियन लोक व अमेरिकन लोक यांना आम्ही भेटूं व त्यांची शिकस्तीच्या प्रयत्नांनीं अशी खात्री करून देऊं कीं, आम्हां मुसलमानांचा खिलाफत, जझरत-उल्-अरब व इतर पवित्र धर्मक्षेत्रें यांच्याशीं जिव्हाळ्याचा संबंध आहे. आमचें ऑटोमन साम्राज्य फार प्राचीन काळचें आहे, आमच्या मागण्या सर्वस्वीं योग्य व स्वीकारणीय अशा आहेत, व त्यांचा उच्चार करतांना आम्हांला आमच्या अफाट इस्लामी जगाचें पूर्ण पाठबळ आहे......"

अशा प्रकारचीं शिष्टमंडळे परदेशीं पाठविणें ह्या कांहीं तोंडच्या गोष्टी नाहींत; त्यांच्यासाठीं पाण्यासारखा पैसा वेंचावा लागतो. अलीबंधूंना ह्या अडचणीची जाणीव आगाऊच होती. त्याला अनुसरूनच त्यांनीं आपल्या जाहीरनाम्यांत स्पष्ट खुलासा केला होता—"तोंपर्यंत वरील कार्यासाठीं निदान दहा लाख रुपये तरी एका महिन्याचे आंत जमले पाहिजेत, तरच शिष्टमंडळांची तरतूद करतां येईल व हातचें काम वाटेला लावतां येईल. आतां ज्या अर्थी आह्मांला आमच्या कितिएक मित्रांना व इतर सहकाऱ्यांना देशभर ठिकठिकाणीं फिरून भेटावयाचें आहे. त्याबाबत सर्वांना आगाऊ सूचना देऊन ठेवावयाची ती एवढीच कीं, ह्या प्रवासांतील आमचा हेतु हातीं घेतलेल्या कामाला पूर्णता व पूर्तता आणावयाची हा आहे. अर्थात् आमच्या सुटकेनंतर आमच्याविषयीं लोकांना वाटत असलेला आदर सक्रीय करून दाखविण्यासाठीं त्यांनीं आह्मी ऑल् इंडिया खिलाफत सभेला जातांना वाटेंत ठिकठिकाणीं शक्य तों जास्त पैशाचे थैले भरून वरील पवित्र व महत्वाच्या कार्यासाठीं आमच्या स्वाधीन करावे. ह्या रीतीनें लोकांनीं आमचा आदरसत्कार केला तर तो आह्मांला अत्यंत आवडेल. तसेंच आमच्या सर्व मित्रमंडळीला आमची अशी विनंती आहे कीं आमच्या आगमनाप्रीत्यर्थ रोषनाई वगैरे करण्यांत त्यांनीं पैशाचा

अपव्यय न करतां वर आह्मी दर्शविल्याप्रमाणें त्याचा सद्व्यय करावा."

वरच्याप्रमाणें जाहिरनामा लिहून दोघांही बंधूंनीं त्याचा समारोप केला:—" शेवटीं पुन्हां एकदां ज्या ज्या सरकारी किंवा बिन सरकारी लोकांनीं आह्मांला वेळोवेळ कोणत्या ना कोणत्या प्रकारची मदत केली, त्यांचे आह्मी मनापासून आभार मानतों. त्यांच्या मदतीनेंच आह्मांला आज आमचें स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग सुकर झाला आहे, व त्यांच्याच कृपेनें आज आह्मी मोकळ्या वातावरणांत हिंडत आहोंत. तसेंच ज्या ज्या अधिकाऱ्यांनीं आपल्या अधिकाराची अंमल बजावणी करतां कोणत्या ना कोणत्या उपायांनीं आह्मांला घातक अशा प्रकारें वागविलें, त्यांचें वर्तन विसरून जाण्याचे आह्मी प्रयत्न करीत आहों व त्या कामीं लौकरच विजयी होऊं असें आह्मांला वाटतें. कांहीं कांहीं देशी व इंग्लिश अधिकाऱ्यांनीं आमच्याशीं फारच भलेपणाचें वर्तन केलें व आमचें अभिष्ट चिंतिलें, त्या सर्वां-विषयीं विशेषतः अॅ. क्रिन, बैतूल तुरुंगाचे सुपरिटेंडेंट यांच्याविषयीं आह्मांला कृतज्ञता वाटते. अॅ. क्रिन यांची आह्मी तुरुंगांतून मोकळे झालेले पहाण्याची फार इच्छा होती; पण तिला अल्लाच्या इच्छेचें पाठबळ नसल्यामुळें तो दिवस उजाडण्यापूर्वीच त्यांच्या आयुष्याचा दिवस मावळला. सर्वांचे शेवटीं परवरदिगर अल्लापाशीं आमची एवढीच प्रार्थना आहे कीं, आमच्याविषयीं सर्व लोकांनीं, त्यांतल्या त्यांत आमच्या पंजाबांतील भगिनींनीं आमच्यावर जें अकृत्रिम प्रेम व आदर दाखवला, त्याला शोभण्यासारखी कांहीं तरी कामगिरी आमच्या हातून होवो. पंजाबांतील आमच्या हजारों भगिनी, कन्या व माता यांनीं आमच्यावर आनंदभरानें शुभाशीर्वादांचा जो गोड पाऊस पडला, तो रमणीय व चिरस्मरणीय प्रसंग आह्मी कधींच विसरणार नाहीं. त्या देणगीहून थोर अशी देणगी एखाद्या राजाला किंवा साधूलाही मागतां किंवा इच्छितां यावयाची नाहीं, इतकी ती देणगी अमोल आहे."

वरच्या जाहिरनाम्यांत दर्शित केल्याप्रमाणें हिंदु-मुसलमानांचें मिळून एक शिष्टमंडळ व्हाइसरायांच्या भेटीला गेलें. तेथें व्हाइसरायांना ह्या सर्व सभासदांनीं आपल्या सह्यांनिशीं लेखी ह्मणणें सादर केलें. तें अर्थात् खिलाफतीविषयींच होतें. त्यांत लक्षांत ठेवण्यासारखी महत्वाची गोष्ट ह्मणजे त्या सादर केलेल्या पत्रिकेवर महंमद अली वगैरे फक्त मुसलमान पुढाऱ्यांच्याच सह्या होत्या असें नाहीं, तर म. गांधी, पं. मालवीय, पं. मोतीलाल नेहरू, पं. रामभुजदत्त चौधरी वगैरे मोठमोठ्या हिंदु पुढाऱ्यांच्याही सह्या होत्या. त्याप्रमाणेंच मुसलमानांतील भिन्न भिन्न मतांच्या पुढाऱ्यांच्याही सह्या त्यावर होत्या. शिष्टमंडळानें व्हाइसरायांच्या मनावर असें बिंबवण्याचा प्रयत्न केला कीं, महायुद्धाचा शेवट झाला आहे, व सर्वत्र शांततेचें पूर्ण साम्राज्य अजून नांदूं लागलें नाहीं. अशा स्थितींत तुर्कस्थानची मैत्री व हिंदी रयतेची राजनिष्ठा यांची सरकारनें अशी फुका पांसरी किंमत करूं नये. तुर्कस्थानच्या बाबतींत मुसलमान किंवा मुसलमानेतर यांना अमान्य अशी तडजोड करण्यांत आली तर तिला खरी तडजोड असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं, तिच्या योगानें शांततेची प्राणप्रतिष्ठाही करतां यावयाची नाहीं. कारण तो न्याय्य मार्ग नव्हे. खरा मुसलमान जो आहे, तो यापुढेंही आपल्या धर्माज्ञा, त्या कितीही अवघड व आचरणाला कठीण असल्या तरी निश्चयपूर्वक पाळील, व त्यांच्या अनुरोधानेंच आपल्या मुक्तीचा मार्ग शोधून काढील. आमच्या कमींत कमी मागण्या अशा आहेत कीं, अरेबियावर मुसलमानांची सत्ता असली पाहिजे, तेथील सर्व धर्मक्षेत्रावर खलिफाची एकजात सत्ता पाहिजे, खलिफाचा मानमरातब योग्य रीतीनें त्याच्या इभ्रतीला साजेसा राखला जाईल याविषयीं हमी दिली पाहिजे व तेथें सर्वत्र अरेबिअन स्वराज्याची ( Self Government ) स्थापना अबाधित झाली पाहिजे. आमचें असें ह्मणणें आहे कीं, बादशाही सरकार हें ख्रिस्ती लोकांच्या प्रमाणेंच हिंदु व मुसलमान लोकांच्या

हितसंबंधाला जबाबदार आहे. यासाठीं येत्या शांतता परिषदेंत आम्ही काय म्हणतों एवढें पुढें मांडून इंग्रजी प्रधानांचें कर्तव्य पूर्ण व्हावयाचें नाहीं; त्यांनीं आमची फिर्याद ही आपली स्वतःची फिर्याद होय असें समजून तेथें झगडलें पाहिजे. मुसलमानी धर्माच्या अन्वयें राजसत्ता व धर्मसत्ता या दोन्ही सत्तांचें सुलतानच्या हातीं एकीकरण झालेलें आहे. त्या अर्थीं जर का सुलतानच्या सत्तेला मर्यादा घालण्यांत आली, व त्याला आपल्या हातांतील बाहुलें बनविण्याचा प्रयत्न पाश्चात्य राष्ट्रांनीं केला, तर त्यांनीं आपण होऊन मुसलमानांचीं मनें जखमी केलीं असें सर्वांना वाटेल. यावेळीं आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, मुख्य प्रधान श्री. लॉईड जार्ज यांनीं ता. ५ जानेवारी सन १९१८ रोजीं मुसलमानांच्या धर्मभावनांना धक्का न बसेल असें वर्तन ठेवण्याचें जें वचन दिलें आहे, तें आतां पाचारण्यांत यावें. आम्हाला येथे केवळ न्याय पाहिजे आहे, दुसरें तिसरें कांहीं नको. वरील अटी-बरोबरच, इतर राष्ट्रें सुलतानच्या सत्तेखालील मुसलमानेतर जातींच्या संरक्षणाचा हक्क मागतील तर तो योग्य आहे असें आमचें आगाऊच सांगणें आहे."

वरच्या विनंतीपत्राला व्हाइसरायांनीं असें उत्तर दिलें कीं, खिला-फतीच्या बाबतींत शांतता परिषदेंत ज्या शिफारशी करावयाच्या होत्या त्या हिंदुस्थान सरकारनें आगाऊच केल्या आहेत, व त्यांत मुसलमानी लोकमताचें योग्य तें दिग्दर्शन केलें आहे. मात्र महायु-द्धाचा प्रश्न हा एकट्या इंग्लंड व तुर्कस्थानमधला नसून त्यांत दुसरीं आणखी कितिएक बलाढ्य राष्ट्रेंही गोंवलीं गेलीं आहेत. त्यांच्या सर्व प्रतिनिधींनीं मिळून तुर्कस्थानच्या भावी दैवाचा निर्णय ठरवाव-याचा आहे. शिष्टमंडळांच्या बाबतींत आपल्या हातून जी जी मदत होण्यासारखी आहे ती ती करण्यास आपण सदैव तयार आहों असेंही व्हाइसरायांनीं सांगितलें. शेवटीं समारोपादाखल बोलतांना त्यांनीं अशी इच्छा प्रदर्शित केली कीं. शांतता परिषदेचा तुर्कस्थानविषयीं

कांहींही निर्णय झाला तरी हिंदी मुसलमान आपल्या बादशहाशीं नेहमीं पूर्ण राजनिष्ठ रहावें.

व्हाइसरायांच्या भेटीला गेलेल्या शिष्टमंडळाच्या हातीं व्हाइसरायांच्या मुलाखतींत फारसें कांहीं लाभलें नाहीं हें वरच्या एकंदर प्रकारावरून उघड आहे. याला कारण, खरें पाहिलें असतां तुर्कस्थानविषयीं कोणतीही गोष्ट करणें व्हाइसरायांच्या आवांक्याबाहेरचें होतें. त्याचा निकाल सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं करावयाचा असून व्हाइसरायांना तेथें हिंदी मुसलमानांचें मत दिग्दर्शन करण्यापुरताच काय तो अधिकार होता. व तेवढी कामगिरी तेव्हांचे व्हाइसराय लॉर्ड चेल्म्सफोर्ड यांनीं योग्यप्रकारें बजावली असेंच म्हटलें पाहिजे.

केवळ परदेशीं शिष्टमंडळें पाठविण्यांतच अलीबंधूंच्या प्रयत्नांची मर्यादा खुंटली नाहीं; सर्व मुसलमानी राष्ट्रांत शिष्टमंडळें पाठवून त्यांच्याशीं ह्या चळवळीचा प्रत्यक्ष संबंध ठेवावयाचा अशी एक नवी कल्पना त्यांनीं शोधून काढली, व तशी शिष्टमंडळें पाठविण्याचें ठरविलें. पण सरकारनें अशा शिष्टमंडळांना परदेशीं जाण्यास आवश्यक असणारे परवानें देण्याचें नाकारल्यामुळें ती योजना फुकट गेली. कदाचित सरकारला तेव्हां अशी भीती वाटली असेल कीं, जर ह्या प्रश्नावर जगांतील सर्व मुसलमानांचें एकमत झालें व त्यांनीं शांतता परिषदेसमोर तसें धरणें धरलें, तर त्यांच्या विरुद्ध तुर्कस्थानच्या खिलाफतीची खिरापत करणें संयुक्तांना फार अवघड जाईल.

वरील योजना चालल्या होत्या, तों दरम्यान हिंदुस्थानांत खिलाफतीच्या कामाची व्यवस्था लावण्याचें कार्य दोघेही अलीबंधू नेटानें करीतच होते. त्यांनीं सेंट्रल खिलाफत कमिटीशीं आपला प्रत्यक्ष निकटचा संबंध ठेऊन हळूहळू तिचीं सर्व सूत्रें त्यांनीं आपल्या हातीं घेतलीं व तिचें पूर्वीचें मिळमिळीत ध्येय बदलून तिच्यांत नवजीवन उत्पन्न केलें. सेंट्रल खिलाफतीच्या उद्देशांत त्यांनीं ' ब्रिटीश प्रधानां-

[stamp]

मार्फत शांततापरिषदेंत तुर्कस्थानला हितकारक अशा अटी पास करून घेणें ' अशी सुधारणा केली. यावरून अखेरपर्यंत अलीबंधूंचा सनदशीर चळवळीवर किती दृढ विश्वास होता याची चांगलीच अटकळ करतां येण्यासारखी आहे.

पूर्वी नियोजिल्याप्रमाणें महंमदअली व त्यांच्या बरोबरीची इतर पुढारी मंडळी शिष्टमंडळांतून विलायतेंत जाण्यासाठीं मुंबई येथें येऊन दाखल झाली. त्यावेळीं महंमदअली व शौकतअली यांचें स्टेशनवर व शहरांत ठिकठिकाणीं अपूर्व स्वागत झालें. मुंबईकरांनीं महंमद-अलींच्या मुंबईतील वस्तींच्या दोनतीन दिवसांच्या तुटपुंज्या काळांत आनंदाची दिवाळी करून सोडली असें म्हटलें असतां अतिशयोक्ती व्हावयाची नाहीं.

दोन तीन दिवस मुंबईचा पाहुणचार घेऊन महंमदअली आपल्या इतर सहकाऱ्यांसह विलायतेला जाण्यास निघाले, ते इ. स. १९२० च्या मार्च महिन्यांत तेथें जाऊन पोंचले. त्यावेळचें विलायतेतील वातावरण ह्या खिलाफतीच्या शिष्टमंडळाला, खिलाफतीला किंवा तुर्कस्थानला मुळींच अनुकूल असें नव्हतें. पण असल्या अडचणींना भिऊन भेदरून जाण्याइतके महंमदअली कच्च्या दिलाचे नव्हते. किनाऱ्यावर पाय टाकतांच ते पहिल्यानें पार्लमेंट सभेकडे तडक चालते झाले. कारण त्यादिवशीं पार्लमेंटांत खिलाफतीच्या प्रश्नावर वादविवाद सुरू होता. पार्लमेंट सभागृहांतील वातावरणावरून त्यांनीं विलायतेंतील एकंदर वातावरणाची अटकळ बांधली, तेव्हां सर्वांच्या मनांतून कॉन्स्टँटिनोपल ( इस्तंबुल ) मधून तुर्कांना त्यांच्या बाडबिछायतीसह हाकलून लावावें व तुर्कस्थानच्या सुलतानाला युरोपच्या हद्दींत एक इंचभर जाग्यावरही सत्ता गाजवतां येऊं नये अशा प्रकारचें होतें.

विलायतेंत पोंचून थोडेसे दिवस लोटतात न लोटतात तोंच महंमदअलींनीं भारतमंत्र्यांची आपल्या शिष्टमंडळाला भेट मिळेल

अशी व्यवस्था केली. अल्पशा अवधीनें शिक्षणखात्याचे प्रधान श्री. फिशर यांनीं भारतमंत्र्यांच्या वतीनें खिलाफत शिष्टमंडळाला भेट दिली. त्यांच्यासमोर महंमदअल्लींनीं मुसलमानांच्या खिलाफत विषयक मागण्यांची थोडक्यांत, मुद्देसूद, अरेरावीनें नाहीं व लोंचट—पोरकट—बावळटपणानेंही नाहीं अशी फिशरसाहेबांची समजूत पाडून दिली. त्यांच्या भाषणांत धमकीचा लवलेशही नसतां योग्य शब्दांनीं सभ्यपणानें त्यांनीं असें बजावलें कीं, खिलाफत ही मुसलमानांना प्राणापेक्षांही थोर अशी चीज आहे. तिला धक्का लावण्यांत आला तर मुसलमान समाज अगदीं स्वस्थपणानें तो अपमान व ती मानखंडणा सहन करील असें कोणीही समजूं नये.

फिशरसाहेबांनीं शिष्टमंडळाचें सर्व ह्मणणें अत्यंत सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतलें, व प्रतिनिधींच्या सभ्य तऱ्हेच्या व मोकळ्या मनाच्या वागणुकीबद्दल त्यांचे आभार मानले. त्यांनीं लौकरच मुख्य प्रधानांशीं शिष्टमंडळाच्या मुलाखतीचा योग जमवून आणण्याचेंही वचन दिलें.

विलायतेंतील वातावरण त्यावेळीं खिलाफतीच्या विरुद्ध तयार करण्याचें काम अमेरिकन लोकांनीं जीवाभावाच्या मोबदल्यानें चालविलें होतें. तें जनतेच्या मनांत परोपरीच्या खोडसाळ विधानांच्याद्वारें एकसारखें विष कालवित होते. तुर्क लोक हे पाशवी अत्याचार करणारे रानटी पशुतुल्य लोक आहेत; त्यांचा राष्ट्रीय पुढारी मुस्ताफा केमालपाशा यानें अमेरिकेंत हजारो अमेरिकनांची अत्यंत निष्ठुरपणानें विनाकारण कत्तल केली वगैरे तुर्कांविषयीं चेव उत्पन्न करणारे खोडसाळ पीक काढणे हे तेव्हांच्या तेथील विघ्नसंतोषी चळवळ्यांचें एक आवडते कार्य होऊन बसले होते. ह्या सर्वांत मौजेची गोष्ट कोणती असेल तर ती ही कीं, अमेरिकेची तरफदारी करणारी ही चळवळ राष्ट्रसंघाच्या नेतृत्वाखालीं चालली होती, व तेव्हांच्या 'इंडिया' पत्रांत ध्वनित केल्याप्रमाणें ह्या चळवळीशीं बादशहांच्या नांवाचाही पाठीराखेपणाच्या दृष्टीनें बराच संबंध येत होता. तुर्कांच्या

विरुद्ध ही चळवळ भाषणें, नाटक सिनेमा वगैरे सर्व साधनांनीं चालली होती, व तिचा तुर्कस्थानच्या हिताच्या दृष्टीनें विलायतीं जनतेच्या मनावर फार भयंकर परिणाम होत होता. महंमदअलींनीं ह्या खोडसाळपणाला आळा घालण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला. अशा प्रकारच्या अत्याचारांना खरा मुसलमान कधींच मान्यता द्यावयाचा नाहीं असें त्यानीं सर्वांना निक्षून बजावलें, व त्याच वेळीं हेंही ठांसून सांगितलें कीं, मुस्तफा केमालपाशा यांच्या हातून वर दर्शविल्यासारखे घोर अत्याचार घडले, या विधानावर कोणत्याही मुसलमानाचा जरादेखील विश्वास बसावयाचा नाहीं. या बाबतींत एक चौकशीमंडळ नेमून त्या मंडळा मार्फत ह्या गोष्टीची चौकशी करण्यांत यावी अशीही त्यांनीं मागणी केली.

शत्रूपक्षाकडून खिलाफतीच्या जिवावर सुटणाऱ्या बाणांचा अशाप्रकारें प्रतिकार करतां करतां दुसऱ्या मार्गानें मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन खिलाफतीच्या बाबतींत हिंदी मुसलमानांच्या अपेक्षा काय आहेत, हें त्यांना पटवून देण्याचा महंमदअलींचा क्रम सुरूच होता. पहिल्यानें त्यांनीं ॲस्किथसाहेबांची भेट घेतली, व पाषाणावर टाकीचे घाव घालण्याचा कसून प्रयत्न केला. ॲस्किथसाहेबांनीं महंमदअलींचें ह्मणणें शांतपणें ऐकून घेतलें, पण अल्पावधिनें तुर्कस्थानच्या मागण्या अवास्तव आहेत असा खुटखुटीत शेरा एका जाहीर भाषणांत मारून महंमदअलींची निराशा केली! त्यानंतर त्यांनीं आणखी कांहीं पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या, निरनिराळ्या पक्षांशीं विचार विनिमय केलें, त्यांत विलायतेंतील मजूर पक्षानें मात्र त्यांना आपली सहानुभूति दाखविली. त्या पक्षाच्या मनांतही खिलाफत, तुर्कस्थान; केमालपाशा वगैरेंविषयीं भरपूर काळें आगाऊ ओतण्यांत आलेंच होतें. पण त्या काळ्याचे डाग महंमदअली आपल्या सत्यपूर्ण वक्तृत्वानें धुवून काढूं शकले.

लौकरच खिलाफत शिष्टमंडळानें मुख्य प्रधान श्री. लॉइड जॉर्ज

यांची मुलाखत घेतली; व त्यांना सर्व परिस्थिती महंमदअलींनीं अधिकारयुक्त वाणीनें सुलभ अशी समजावून दिली. स्वतः लॉइड जॉर्ज यांनीं मुख्य प्रधान या नात्यानें मुसलमानी धर्मसंरक्षणाचें जें वचन हिंदी मुसलमानांना दिलें होतें, त्याचीही त्यांना त्या प्रसंगीं आठवण करून देण्यांत आली. पण ह्या सर्व प्रयत्नांची अवस्था अरण्यरूदनवत् झाली ! आर्मेनियामध्यें तुर्क लोकांनीं मुसलमानेतरांवर अत्यंत घोर अत्याचार केले आहेत, व त्यामुळें मुसलमानेतरांवर ते योग्य प्रकारें राज्यकारभार चालवतील असा विश्वास ठेवणें धोक्याचें झालें आहे, असें मुख्य प्रधानांनीं सांगितलें. यावर महंमदअलींनीं असें चोख उत्तर दिलें कीं, तुर्कांच्या नांवाला चिकटविण्यांत येणारे अत्याचार जर त्यांच्या हातून खरोखरीच घडले असतील, तर त्यांच्याशीं असलेला लागाबांधा तोडण्याची हिंदुमुसलमानांची एका पायावर तयारी आहे. हिंदी मुसलमानांचें असें एक मत आहे कीं, मुसलमानी धर्माच्या नांवावर अशा प्रकारच्या अत्याचाराचा एकही डाग असतां कामा नये. महंमदअलींना खिलाफतीच्या बाबतींतही अन्यायानें जय मिळवावयाचा नव्हता, हें वरील गोष्टीवरून सिद्ध होत नाहीं काय ?

विलायतेंतील बड्या बड्या अधिकाऱ्यांप्रमाणें व पुढाऱ्यांप्रमाणें विलायती वर्तमानपत्रांनींही खिलाफतीच्या कामीं खो घालण्यासाठीं कंबर कसली होती. तीं कधीं सहसा साध्या बातमी शिवाय खिलाफत शिष्टमंडळाचा उल्लेखही करीत नसत, व कधीं उल्लेख केलाच तर तो विघ्नसंतोषीपणाचा असावयाचा. ही अडचण भरून काढण्यासाठीं महंमदअलींना वेळोवेळीं ' मूस्लिम आउटलुक, ' इस्लामिक न्यूज ' मूस्लिम स्टँडर्ड ' वगैरे पत्रें काढावीं लागलीं. ' मूस्लिम आउटलुक ' चीं इतर पत्रें हीं थोड्या फार प्रमाणांत स्थित्यंतरें होती. अशीं स्थित्यंतरें होण्याचें कारण, ' मूस्लिम आउटलुक ' ला हिंदुस्थानांत येण्याचीं बंदी सरकारकडून करण्यांत आली होती. ह्या पत्रांच्या

साह्यानें दुसरा जरी कांहीं फायदा झाला नाहीं, तरी मेसापोटेमियाचा मासा गळासकट गिळण्यांत विलायतसरकारनें केवढी घोडचूक केली आहे, याचें इंग्रजी जनतेला यथातथ्य ज्ञान झालें.

विलायतेंत आपल्या चळवळीचा कांहीं उपयोग ज्याअर्थीं होत नाहीं, त्या-अर्थीं सानरेमो येथें भरणाऱ्या शांतता परिषदेसमोर तरी आपलें ह्मणणें मांडण्याची परवानगी आपल्याला मिळावी, अशी महंमदअ-ल्लींनीं मुख्य प्रधानांना विनंति केली. यावर मुख्य प्रधानांनीं उत्तर दिलें कीं, निरनिराळ्या देशच्या नियोजित शिष्टमंडळांखेरीज इतरांना शांततापरिषदेंत भाग घेणाचा अधिकार नाहीं, व हिंदुस्थानच्या बावतींत बोलावयाचें तर हिंदी अधिकाऱ्यांचें शिष्टमंडळ आपलें म्हणणें परि-षदेसमोर मांडून केव्हांच मोकळें झालें आहे. यानंतर महंमदअल्लींनीं प्रत्यक्ष शांतता परिषदेंत भाग घेणाऱ्या निरनिराळ्या प्रतिनिधींना स्वतंत्र तारा करून आपलें म्हणणें जाहीर केलें. त्यापूर्वी परिषदेच्या अध्यक्षांना तार करून आपली फिर्याद परिषदेसमोर मांडण्याची आप-ल्याला परवानगी मिळावी अशाप्रकारचे प्रयत्नही महंमदअल्लींनीं केलें; पण यशाच्या नांवाने आंवळ्या एवढे पूज्य !

शेवटीं हिंदी खिलाफत शिष्ट मंडळानें शांतता परिषदेच्या सर्व प्रतिनिधींना जो विद्युत्संदेश पाठविला, तो पुढील प्रमाणें होताः—

" हिंदी शिष्टमंडळाला आपलें ह्मणणें परिषदेसमोर मांडण्याची परवानगी देण्यांत आली नाहीं, व ग्रीसचा अर्थाअर्थी महायुद्धांत कांहीं संबंध नसून शेवटीं शेवटीं त्यानें संयुक्ताच्या वतीनें तुर्की प्रदेश मांडीखालीं घातला ह्मणून ग्रीसच्या प्रतिनिधीला मात्र परवानगी देण्यांत आली. हिंदी रयतेच्या मताचा अशा प्रकारें अनादर कर-ण्यांत आल्यास शांतता प्रस्थापनाच्या सर्व गप्पा फोल ठरल्यावांचून रहावयाच्या नाहीं. प्रे. विल्सन यांच्या चतुर्दशसूत्रीप्रमाणें शांतता प्रस्थापनाचा आळ मात्र आणण्यांत येत आहे, पण खरा प्रकार पाहिला तर महायुद्धांत हातीं सांपडलेली खिलाफतीची खिरापत

कोणी किती मुठी खावी, याविषयीं हे सारें उपद्याप चालले आहेत. कान्स्टांटिनोपलमध्यें सध्यां इंग्रजी लष्कराची व आरमाराची सत्ता असल्यामुळें खलिफा संयुक्तांच्या हातचें एक सामान्य बाहुलें बनला आहे, व मुसलमानी धर्माचे जीवनाधार शेख-उल-इस्लाम यांच्या हद्दपारीमुळें इस्लाम धर्माचा घोर अपमान झाला आहे. विशेषतः हिंदुस्थानांत जनता व सरकार यांचें एकमेकांशीं असावें तसें ऐक्य नसतांना हिंदी लोकमताची मुळींच पर्वा करण्यांत आली नाहीं व हिंदी अधिकाऱ्याच्या शिष्टमंडळाची शिष्टाई तेवढी ऐकून घेण्यांत आली, हें बरें झालें नाहीं."

खिलाफतीच्या बाबतींत विलायती राष्ट्रांनीं एकजात स्वार्थीपणाचा व खुनशी असा डाव कसा रचला होता, हें वरील वृत्तांतावरून सामान्यतः कळून येण्यासारखें आहे.

---

## फ्रान्सांतील चळवळ.

विलायतेंत आपल्या चळवळीला यश येण्याचीं भलीं लक्षणें महंमदअलींना दिसेनात तेव्हां त्यांनीं फ्रान्सांत तरी कांहीं डाव साधला तर पहावा या उद्देशानें एक दोन वेळां तिकडे फेरफटका केला होता. तशांत ता. २० मे १९२० रोजीं तुर्कीतहाचा भ्रमाचा भोंपळा फुटला, व त्या तहान्वयें तुर्कस्थानचा सुलतान इंग्रजांच्या हातचें कळसूत्री बाहुलें बनला, तेव्हांपासून तर त्यांनीं फ्रान्साकडेच विशेष लक्ष दिलें व भाषण व लेखनद्वारा फ्रेंच जनतेचीं मनें आपणाकडे वळवून घेण्याचे प्रयत्न चालविले. फ्रान्सप्रमाणेंच इतालीच्या हृदयाचाही त्यांनीं तळठाव पाहिला, तेव्हां त्या दोन्ही राष्ट्रांचे प्रतिनिधी प्रथमपासूनच तुर्कस्थानच्या बाबतींत खुल्या दिलानें वागण्यास तयार असल्याचे आढळून आले. इतकेच नव्हे, तर वर निर्देशिलेल्या

तहनाम्यान्वयें तुर्कस्थानच्या छाताडावर ज्या निरनिराळया अपमानकारक व जाचक धोंडी परतण्यांत आल्या होत्या, त्या आसुरी कृत्याला फ्रान्स व इताली यांची पूर्ण अमान्यता होती.

हिंदी खिलाफत शिष्टमंडळाला फ्रान्समधील लोकांनीं सहानुभूतीनें वागविलें. त्यामुळें एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत निरनिराळया अनेक थोर माणसांना शिष्टमंडळानें आपल्या खिलाफत विषयक मागण्यांची योग्य फोड करून दाखविली. फ्रान्सच्या शिष्टलोकांप्रमाणें तेथील वर्तमानपत्रांनींही या कामीं खिलाफत शिष्टमंडळाला खुल्या दिलानें मदत केली; विलायतेंतील पत्रकारांप्रमाणें द्वेष व स्वार्थ यांच्या जबरदस्त सैतानांना स्वतःच्या मनावर एकतंत्री थैमान घालूं दिलें नाहीं. शेवटीं एका मुलाखतीच्या वेळीं फ्रेंच मुख्य प्रधान श्री. एम्. मिलरँड यांनीं तुर्की तहनामा हा कायमचा तहनामा अजून झाला नसून त्यांत कांहीं सुधारणा करण्यांत येतील अशी आशा महंमदअल्लींना दाखविली. महंमदअल्लींनींही अनेक परीनीं फ्रान्सच्या नजरेला असें आणून दिलें कीं, जर का तुर्की तहाची हीं जुलूम जबरदस्तीची योजना फ्रान्सनें मान्य केली, तर जेथें जेथें फ्रान्सचा तुर्कस्थानशीं संबंध येईल, तेथें तेथें वागणें फ्रान्सला अवघड जाईल. ह्या एकंदर चळवळीनें फ्रान्सचें मत इतकें बदलून सोडलें कीं, अखेर सेव्हर्सच्या तहाची फेरतपासणी झाली पाहिजे असें फ्रान्समधील बड्या बड्या संस्था व बडींबडीं राजकारणी धेंडें आग्रहानें ह्मणूं लागलीं.

महंमदअल्लीनीं इतालीमध्यें जाऊन पोपची भेट घेतली, व पोपनेंही त्यांच्या खिलाफत विषयक कार्याला आपली पूर्ण सहानुभूति दाखविली. पोपचें मत ह्मणजेच इतालीचें व सर्व रोमनकॅथोलिक जगाचें मत होय. धार्मिक बाबींत युद्धकाळीं तुर्कांनीं थोरपणा दाखविला, त्याबद्दल पोपनें त्यांची पाठ थोपटली, व तुर्कस्थानच्या बाबतींत सर्व राष्ट्रांनीं मिळून जो तहनामा केला आहे, तो व्यक्तिशः कोणत्याही राष्ट्राच्या कितीहि पथ्यावर पडणार असला तरी जगाच्या

शांततेच्या दृष्टीनें तो अगदीं कुचकामाचा आहे असें आपलें स्पष्ट मत दिलें. त्यांनीं अशीहि इच्छा दर्शविली कीं, यापुढें तरी हिंदी खिलाफत शिष्ट मंडळाच्या न्याय्य मागण्यांचा संयुक्त राष्ट्रांकडून योग्य तो विचार व्हावा. इतकेंही करून जर ह्या वादाचा निकाल समाधानकारक असा लागला नाहीं, व नव्या लढाईला तोंड फुटलें, तर खिस्ती लोकांविरुद्ध शस्त्र उगारल्याबद्दल मुसलमान लोक कधींहि अपराधी ठरावयाचे नाहींत. रोमन कॅथॉलिक जग अत्याचार, रक्तपात यांना भुकेलेलें नसून शांततेला भुकेलेलें आहे, व शांतता प्रस्थापनाचें जें कार्य हिंदी शिष्ट मंडळानें आपल्या शिरावर घेतलें आहे, त्याला सर्व रोमन कॅथॉलिकांची पूर्ण सहानुभूति आहे, असा निरोप पोपनें महंमदअल्लींच्या मार्फतीनें हिंदुस्थानला पाठविला, आणि इतर ठिकाणींही त्यांना अशीच सहानुभूति मिळत जाईल अशी दृढ आशा व्यक्त केली.

पण ठिकठिकाणच्या अशा कोरड्या सहानुभूतीनें कार्यभाग थोडाच व्हावयाचा आहे? संयुक्त दोस्त राष्ट्रांनीं तुर्कस्थानच्या विरुद्ध जी फळी रचली होती, ती अशानें थोडीच फुटली जावयाची आहे? फ्रान्सनें सहानुभूति दाखवली, इतालीनें सहानुभूति दाखवली, पण प्रत्यक्ष जबाबदार व सत्ताधारी असें इंग्रज सरकार तुर्कस्थानच्या बाबतींत आपली खुनशी व स्वार्थी वृत्ति अंशतःही सोडण्यास तयार नसतांना इतरांच्या सहानुभूतीचा उपयोग काय? इतर राष्ट्रें झालीं तरी कोणत्या ना कोणत्या दृष्टीनें त्यांचे थोडेफार हितसंबंध इंग्रजांच्या हितसंबंधांशीं निगडित झालेले असल्यामुळें इंग्लंडच्या विरुद्ध धडकावून बोलण्याची धडाडी त्यांच्या आंगीं कोठून यावी? खिलाफतीच्या कार्यासाठीं इंग्रजांचें मन दुखवून त्यांची नाराजी पत्करावयाची व सत्यासाठीं झगडावयाचें असली पहिल्या प्रतीची सत्यप्रियता यूरोपच्या बाजारांत फारच महाग विकते, किंवा तिकडच्या हवामानांत ती वितळून अथवा वायुरूप होऊन जाते.

तात्पर्य काय, ज्या हुरूपानें महंमदअली हिंदी खिलाफत शिष्टमंडळ घेऊन परदेशी गेले, तो त्यांचा हुरूप 'जवळ जवळ सर्वांशीं हिरवाच करपून गेला, व त्याला कारण इंग्रज सरकार !

---

## असहकारितेची चळवळ.

यूरोपांत सत्तेपुढें आपल्या सत्याचा कांहीं प्रकाश पडत नाहीं, अशी मनाची खात्री करून घेऊन महंमदअली यूरोपांतून हिंदुस्थानांत येण्यास निघाले ते मुंबई येथें इ. स. १९२० च्या आक्टोबरच्या ४ तारखेला येऊन पोंचले. त्याच दिवशीं प्रचंड जनसमुहासमोर त्यांचें स्वतःच्या यूरोपांतील अनुभवावर भाषण झालें. त्यावेळीं ते म्हणाले, "सध्यांच्या एकंदर परिस्थितचिा पूर्ण विचार करतां माझें असें ठाम मत झालें आहे कीं, मुसलमानी धर्माच्या स्वातंत्र्याची सिद्धता करण्यासाठीं अगोदर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची सिद्धता करणें अगत्याचें आहे. दुसऱ्या देशाचें स्वातंत्र्य दोस्त राष्ट्रांनीं हिंदुस्थानच्या गुलामांना स्वतःच्या वतीनें दुसऱ्या राष्ट्रांविरुद्ध झुंजवून हिरावून घेतलें. यासाठीं जर हिंदूंना, मुसलमानांना स्वातंत्र्य पाहिजे असेल तर त्यांनीं आपसांत एकी करून गुलामगिरच्यिा शृंखला हिंदुस्थानच्या हातीं पायीं असलेल्या तोडून टाकण्यासाठीं मनोभावानें झटलें पाहिजे. हिंदु व मुसलमान या दोघांनींही यावेळीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं, ते एक दिलानें कार्याला लागल्याशिवाय त्यांच्या कपाळींची ताबेदारी टळावयाची नाहीं."

हिंदी स्वराज्याची सांगता व खिलाफतीचें संरक्षण ह्या दोन्हीही गोष्टी हिंदुमुसलमानांच्या एकोप्यानें साधतील हें कांहीं महंमदअलींचें निर्वाणीचें मत नव्हे; विलायतेंत जाण्यापूर्वीही त्यांचा मायदेश व खिलाफत यांच्या मंगलाच्या बाबतींत हिंदुमुसलमानांच्या एको-

ऱ्यावर पूर्ण विश्वास होता. याला प्रत्यंतर पाहिजे असल्यास विलायतेंत जातांना त्यांनीं कराचीच्या ‘ न्यू टाइम्स ’ च्या प्रतिनिधीशीं काढलेले उद्गार ध्यानीं आणावे. तेव्हां ते म्हणाले, “ खिलाफतीच्या बाबतींतील खरी वस्तुस्थिती काय आहे याची यूरोप–अमेरिकेला जाणीव करून देण्यासाठीं आम्हीं परदेशीं जात आहों. त्यांना आम्ही आमची फिर्याद समजावून सांगू व आमची दाद घेण्याची विनंती करूं. इतकेंही करून त्यांनीं दाद घेतली नाहीं, तर त्या बेदादपणाला उत्तर म्हणून नाइलाजास्तव आम्हांला आमच्या धर्माप्रमाणें निर्वाणीच्या मार्गाचा अवलंब करावा लागेल, व त्याचा परिणाम निस्तरतांना आजच्या अरेरावाना मग जड जाईल. अशा आणीबाणीच्या वेळीं हा प्रश्न एकट्या सात कोटी मुसलमानांपुरताच रहावयाचा नसून त्यांना तीस कोटी हिंदूंचें पूर्ण पाठबळ असेल, व त्याला आणखी तीस कोटी हिंदेतर मुसलमानांची जोड मिळेल. केवळ व्यावहारीक दृष्टया व भौतिक तत्वांना प्राधान्य देऊन बोलावयाचें तरीही मी असें निक्षून सांगू शकतों कीं, जगांतलि अर्ध्या मानवी जातीशीं उघड उघड लढाई करून एखाद्या यूरोपीय राजसत्तेला सहजासहजीं जिंकतां येईल, बहुमोल, बहुरत्नांनीं नटलेला थटलेला, कृषिकर्माला जेथें पूर्ण अवसर आहे, व मानवी सुखसोई जेथें भरपूर आहेत असा एखादाही देश परमेश्वराच्या एवढ्या अफाट सृष्टींत सांपडावयाचा नाहीं. आज आम्हीं कदाचित असमर्थ असलों तरी कालाच्या लीला अगाध आहेत, त्या आम्हांला केव्हां सबल करतील याचा पत्ताही कोणाला लागावयाचा नाहीं. आमच्या सत्यवादावर आमची श्रद्धा आहे व परमेश्वरावर आमचा भरंवसा आहे. ”

भाषणाच्या शेवटीं एका चिकित्सकानें त्यांना प्रश्न केला, “ तुमच्या शिष्ट मंडळाला परदेशीं यश मिळालें नाहीं तर तुह्मीं पुढें काय करणार ? ”

“ इतकें निराश होण्याचें आजच कांहीं कारण नाहीं. ” महंमद-

अली उत्तरले, " आम्हीं अंगिकारिलेलें कार्यच असें आहे कीं, त्या बाबतींत यशापेक्षां अपयश येण्याचाच संभव जास्त आहे. युरोपांत भाषण स्वातंत्र्य व लेखन स्वातंत्र्य यांचा कितीही डांगोरा पिटण्यांत येत असला तरी खरें बोलावयाचें तर त्याच यूरोपांत पावलोपावलीं अडचणी कशा दत्त ह्मणून उभ्या रहातात, याची मला अटकळ आहे. हें सर्व माहीत असूनही आम्हीं आशावादी बनून तिकडे जात आहों. आमची फिर्याद त्यांनीं ऐकून घेतली नाहीं तर त्यामुळें अपयशाचा वांटा आमच्या पदरीं पडण्याच्या ऐवजीं त्यांच्यांच पदरीं पडेल. आतां माझ्या स्वतःविषयीं बोलावयाचें तर हा संदेश मी परदेशीं नेऊन पोंचवला कीं मला मोक्ष प्राप्त झाला असेंच मी ह्मणेन. त्या संदेशाचा एक भाग ह्मणून त्यांना मी आज निक्षून सांगतो कीं, ह्या हिंदुस्थानच्या तीस कोटी लोकांचें पूर्ण पाठबळ मला आहे; त्यांचे शब्द तेच माझे शब्द आहेत."

देशांतील जनतेवर महंमदअलींचा जो इतका विश्वास होता, तो सर्वस्वीं सार्थ होता. ते विलायतेंत गेल्यावर त्यांच्यामागें राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग या संस्थांनीं चळवळ जोरानें सुरू ठेवली होती. खिलाफतीची खिरापत करणारा तहनामा प्रसिद्ध झाल्यापासून तर हिंदुस्थानांतील चळवळीला नवा रंग चढला होता. तो अपशकुनी तहनामा प्रसिद्ध होतांच, खिलाफत व जालियनवालाबाग कत्तल या बाबतींत केलेले अन्याय निस्तरले जाण्यासाठीं सरकारला काय करावयास भाग पाडावे याचा विचार करण्याकरतां तसेंच हिंदी स्वराज्याचा प्रश्नही समाधानकारक रीतीनें सोडवण्याकरतां हिंदुस्थाननें काय करावें हें ठरविण्यासाठीं कलकत्ता येथें जादा राष्ट्रीय सभा भरविण्याचें बनारस येथें भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत ठरलें.

याच वेळीं महात्मा गांधींनीं राष्ट्राला निर्वाणीचा उपाय ह्मणून असहकारितेचा उपाय सुचविलेला होता. हें एक अगदीं नवीन राजकारण असल्यामुळें सर्व प्रकारच्या व सर्व दर्जाच्या लोकांत तो एक

चर्चेचा विषय होऊन बसला होता. असहकारिता करावयाचीच झाली तर त्याची सरकारला आगाऊ सूचना देणें कितिएकांना अवश्य वाटत होतें. ह्या प्रश्नाचा एकमतानें विचार करण्याचें मॉस्लेम लीग व राष्ट्रीय सभा यांच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें. त्यासाठीं बनारस येथें सर्व पुढाऱ्यांची ता. २ जून रोजीं एक परिषद भरली. त्या परिषदेंत सरकारशीं असहकारिता करण्याचें ठरून त्या कार्यासाठीं महात्मा गांधीं, मौ. महंमदअली, मौ. शौकतअली, मौ. हजरत मोहानी, श्री. खत्री व डॉ. किश्लू यांचें एक मंडळ नेमण्यांत आलें, व असहकारितेचा कार्यक्रम देशकालपरिस्थितीप्रमाणें ठरविण्याची कामगिरी महात्माजींच्या शिरावर येऊन पडली.

वरील योजनेनुसार महात्मा गांधींनीं व त्याचे इतर सहकारी यांनीं सर्वांच्या सहीनें जाहीरनामा वजा एक पत्र व्हाइसरायांना पाठविलें. व्हॉइसरायांनीं खिलाफत व पंजाबांतील अत्याचार या बाबतींत योग्य न्याय होईल असें आपलें वजन खर्च करावें, व त्यांच्या प्रयत्नांना यश येत नसल्यास किंवा यश येण्याची आशा नसल्यास त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा देऊन खिलाफतीच्या बाबतींत तुर्कस्थानाला न्याय मिळवून देण्यासाठीं त्या चळवळींत पुढाकार घेऊन शांतता परिषदेंत खिलाफतीच्या वतीनें कामगिरी करावी, असें त्या जाहीरनाम्यांत स्पष्ट म्हटलें होतें. त्याच दिवशीं महात्मा गांधींनीं महंमदअलीनां लंडन येथें पुढील आशयाची तार केली:–" हिंदुमुसलमानांच्या सर्व पुढाऱ्यांची एकी होऊन सर्वांनीं मिळून शांतता परिषदेंत खिलाफतीच्या बाबींत योग्य न्याय मिळविण्यास झटण्याविषयीं व्हाइसरायांना लिहिलें आहे. त्याप्रमाणें कांहींच कार्य त्यांच्या हातून न झालें तर ता. १ आगस्टपासून सरकारशीं असहकारिता करण्याचें ठरलें आहे. व्हाइसरायावर सर्व कांहीं अवलंबून आहे. माझा स्वतःचा ह्या चळवळीशीं प्रत्यक्ष संबंध आहे व मला हीं चळवळ सर्वस्वी मान्य आहे असें माझें मत

मी अलाहिदा व्हाइसरायांना कळवलें आहे. माझ्या मतें आमच्या अंगीकृत कार्याला सर्व हिंदुमुसलमानांची एकजीत संमति आहे. इकडे जेवढें कांहीं करतां येण्यासारखे आहे, तेवढें खास केलें जाईल या विषयीं तुह्मीं अगदीं निश्चिंत असा. ह्या कार्यांत आम्हीं पूर्ण स्वावलंबनीनें व सत्यानें वागलों तर परमेश्वर आह्मांला यश देईलच देईल असा मला पूर्ण भरंवसा आहे. ''

व्हाइसरायांना लिहिलेल्या पत्राचा कांहींच उपयोग झाला नाहीं, व त्यामुळें पूर्वीं ठरल्याप्रमाणें ता. १ आगस्ट रोजीं महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ सुरू झाली. पहिल्यानें सरकारी पदव्यांचा व मानमरातबांचा त्याग करावा असें ठरतांच महात्मा गांधी व श्रीमती सरलादेवी चौधुराणी यांनीं त्यांना मिळालेलीं कैसर-इ-हिंद पदकें सरकारपाशीं परत पाठविलीं व हकीम अजमलखान यांनीं हफीज उल्-मुल्क हा किताब परत केला. सरकारकडून मानमरातब किंवा पदव्या मिळावयाच्या तर त्यासाठीं कोण सायास, वरिष्ठ अधिकाऱ्यांची कोण खुष मस्करी करावी लागते. पण त्यांच्यावर पाणी सोडण्याची वेळ येतांच अशा अनेक माननीय पदवीधरांनीं भराभर तें पाप फेंकून दिलें. त्यानंतर कायदेकौन्सिलांवर बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू झाली, व नवीन सुधारणांन्वयें झालेल्या पहिल्या पहिल्या निवडणुकींची केवळ हुरेवडी उडाली. त्या बहिष्कारामुळें कौन्सिलें ओस पडलीं नाहींत हे खरें. जे लोक कौन्सिलांत निवडून गेले, ते एक तर जेथें हजार मतांनीं निवडून जावयाचे, तेथें पांच चार किंवा एखादें दुसऱ्या मतानें निवडून गेले, व दुसरें, जे निवडून गेलें त्यांतले बहुतेक बिचारे इतके बिन महत्वाचे लहान जीव होते कीं, ज्या पुढाऱ्यांनीं असहकारितेपायीं कौन्सिलांवर बहिष्कार घातला, ते निवडणुकीला नुस्ते उभे राहते तरी तर ह्या निवडून आलेल्या उमेदवारांना उभे रहातांनांहि दरदरून घाम सुटला असता.

अशा प्रकारें असहकारितेची चळवळ सर्व बाजूंनीं यशस्वी होत असतांच अलीबंधू विलायतेंतून हिंदुस्थानांत परत आले. दरम्यान कलकत्ता येथें जादा राष्ट्रीय सभेंतही असहकारिता ग्राह्य ठरली होती. अलीबंधूंना काम करण्याला ही आयतीच संधी मिळाली, व त्यांनीं त्याच घटकेला महात्मा गांधींना मदत करण्याचें वचन देऊन त्यांचें अनुयायित्व पत्करलें. त्या दिवसापासून महंमदअली असहकारितेच्या पायीं विकले गेले. त्यांनीं असहकारितेच्या तत्वानुसार पहिला हल्ला अलीगड येथील कॉलेजवर चढविला. महंमदअली म्हणजे विद्यार्थ्यांचें उपास्यदैवतच जणूं काय असल्यामुळें बहिष्काराची गोष्ट काढतांच सर्व विद्यार्थी आपल्या निमसरकारी शिक्षणावर लाथ मारून त्यांचे अनुयायी बनले, व त्यांच्या पुढारीपणाखालीं असहकारितेचा कार्यक्रम पार पाडण्यासाठीं त्यांनीं कंबरा कसल्या. त्यानंतर स्वतःच्या अब्रूचा कसाबसा बचाव करण्यासाठीं कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं विद्यार्थ्यांच्या पालकांना पत्रें पाठवून, त्यांचें वजन खर्चीं पाडून कांहीं थोड्या दुबळ्या मनाच्या विद्यार्थ्यांना कॉलेजांत येणें भाग पाडलें. पण आपल्या मुलांना अशी नेभळी कामगिरी करावयास लावणारे बाप व त्यांची नेभळीं मुलें हिंदुस्थानच्या जागृतीच्या काळांत फार कुठचीं सांपडणार ? जे विद्यार्थी पुन्हां कॉलेजांत आले, ते कोणी सरकारच्या खुषमस्कऱ्या आईबापांचे चिरंजीव असतील, किंवा कांहींच्या पालकांना पोटाची खळगी सरकारी कृपेवर भरण्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळें मनांतील स्वाभिमानाची, देशाभिमानाची ज्योत मनांतच दाबून ह्या निंद्य कर्माचा आश्रय करणें भाग पडलें असेल. पण अशा लवचिक मनाच्या विद्यार्थ्यांबरोबर असे कांहीं खंबीर मनाचे विद्यार्थी होते कीं, ज्यांनीं आईबापांच्या अधर्मकारणी आज्ञेवर लाथ मारून त्यांची अवकृपा संपादून भणंगभिकार पत्करलें; पण मायदेशाच्या हांकेला ओ दिली !

असहकारिता केलेल्या विद्यार्थ्यांची सोय करण्यासाठीं महंमद-

अलींनीं थोडक्याच दिवसांत अलीगड येथेंच एक राष्ट्रीय विश्वविद्यालय स्थापन केले, व एक महाविद्यालय उघडून मुख्याध्यापकाचें काम स्वतः पत्करलें. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, महंमदअली जसे पहिल्या प्रतीचे वक्ते, पहिल्या प्रतीचे लेखक, पहिल्या प्रतीचे कवी आहेत, तसेच ते पहिल्या प्रतीचे अध्यापकही आहेत. त्यांच्याबरोबर काम करणारी इतर अध्यापक मंडळीही नांव घेण्यासारखी नांवाजलेली होती. पण थोड्या दिवसांनीं ह्या अध्यापकाच्या कामापेक्षां दुसरें अत्यंत महत्वाचें राजकीय जागृतीचें काम आपल्यासाठीं अडून पडलें आहे असें पहातांच त्यांनीं पुन्हां राजकारणच जोमानें हातीं घेतलें.

त्यानंतर राजकीय क्षेत्रांत त्यांनी राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें असें कार्य केलें तें मॉस्लेम लीगला राष्ट्रीय सभेच्या पायरीला आणून सोडण्याचें होय. लौकरच नागपूर येथें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरविण्यांत आलें; मॉस्लेम लीगची बैठकही तेथेंच झाली. तेव्हां राष्ट्रीय सभेंत महात्माजींच्या उजव्या हाताप्रमाणें जोमानें काम महंमद अलींनींच केलें, व मॉस्लेम लीगच्या बैठकींत, श्री. जीना वगैरे बड्या पुढाऱ्यांच्या विरोधाचें पाणी करून राष्ट्रीय सभेच्या ध्येयाप्रमाणेंच मॉस्लेम लीगचें ध्येयही ‘ शांततेच्या व योग्य अशा उपायांनीं स्वराज्य मिळविणें ’ बनवून घेण्याचें काम त्यांना म्हणूनच साधलें.

अशा प्रकारें असहकारितेच्या चळवळींत महंमदअली तेजाळ सूर्याप्रमाणें चमकूं लागले, हें सरकारला कसें सहन व्हावें ? अर्थातच सरकारनें आपली कांयदेबाजी त्यांच्या बाबींत आपल्या नेहमींच्या रिवाजाला अनुसरून उपयोगांत आणिली आणि—आणि—आणि ?

## माफीचें गौडबंगाल.

नागपूरच्या राष्ट्रीय सभेनें एक कोटी रुपये टिळक स्वराज्य फंड जमविण्याचें ठरवितांच अलीबंधूंनीं तो ठराव पूर्णपणें अंमलांत आणण्यासाठीं चंग बांधले. त्यासाठीं दोघेही बंधू कधीं महात्माजींच्या सांगातीं तर कधीं स्वतंत्र असे देशांत ठिकठिकाणीं हिंडले. ह्या कामगिरीवर असतां महंमदअलींनीं ठिकठिकाणीं परिणामकारक भाषणें केलीं. प्रत्येक भाषणांत ते लोकांना टिळक स्वराज्य फंडाला शक्य ती मदत करण्याविषयीं कळकळीनें विनवीत, व असहकारितेच्या चळवळीच्या नांवावर आपण शांततामय व अनत्याचारी अशी जागृती, असें बंड करून मायदेशाच्या उन्नतीचा एक नवा मार्ग इतिहासांत आपणा सर्वांना निर्माण करावयाचा आहे याची जाणीव देत. त्यांच्या प्रत्येक भाषणांत स्वदेशीची आवश्यकता, चरक्याची उपयुक्तता वगैरे गोष्टींची यथान्याय फोड केलेली असे. त्यांच्या भाषणौघांतून कितीएक वेळां असे अमोल वाग्रत्नांचे सरांचे सर बाहेर पडत कीं, ते आंगाखांद्यावर धारण करण्याला कोणत्याही भाषासुंदरीला अभिमान वाटावा. एका प्रसंगीं असेच ते व्याख्यानाच्या ओघांत ह्मणाले, " एखादा इंग्रज आपल्या जवळील सुधारलेल्या तोफेनें दोन हजार फूट अंतरावरील मनुष्याला ठार करूं शकतो असें ह्मणतात. पण आमच्यापाशीं आमच्या पूर्वजांच्या वेळीं घडविलेलें व एखाद्या साध्या सुतारालाही जोडतां येतें असें एक अत्यंत साधें यंत्र आहे, तें डागलें असतां समुद्र काय किंवा जमीन काय, कशाचीही पर्वा न करतां ७००० मैल अंतरावरील माणसाला मारूं शकतें. मद्रासेहून एक गोळी झाडली कीं ती सूं सूं करीत जाते व थेट मँचेस्टरला पोंचून तेथें बळी घेते. पण घोडें पेंड खातें तें इथेंच खातें. राष्ट्रीय सभेपासून क्षणभर तरी दूर रहाणें जोंवर तुह्मांला अपमानास्पद वाटूं लागलें नाहीं, व तुमच्या स्त्रियांनीं आंगा

खांद्यावर, नाकातोंडांवर दागिने घालून मिरवण्याचे चोंचले जोंवर सोडले नाहींत, तोंपर्यंत तुमचें पौरुष तर सार्थ होणार नाहींच; पण स्त्रीजन्महि सार्थ होणार नाहीं. तोंपर्यंत हिंदुस्थान देश वैधव्यांत आहे असेंच ह्मणावें लागेल."

. महंमदअलींच्यावर परशत्रूला मदत करून हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य ह्मणून पाडण्याचे प्रयत्न केल्याचा एक फार महत्वाचा आरोप होता. त्या आरोपाचें बीबियाणें वरील त्यांच्या भाषणांतच सरकारनें रुजविलें. ते त्याप्रसंगीं ओघानें बोलून गेले, "परदेशचा कोणताही राजा किंवा कोणतेही लोक येऊन हिंदुस्थानवर स्वारी करून हिंदुस्थानास आपले गुलाम व्हावयास भाग पाडून त्यांच्यावर सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करतील, तर त्यांना आह्मी मदत करणार नाहीं इतकेंच काय; पण शक्य तों त्यांना विरोध करूं. आह्मी एकवार गुलाम झालों आहों; आतां पुन्हां दुसऱ्यानें गुलाम होण्याची आमची इच्छा नाहीं. मात्र राज्य लोभानें स्वारी न करतां, कल्पना करा, आपल्या राज्याचें, आपल्या धर्माचें, आपल्या देवाचें, खिलापतीचें रक्षण करण्यासाठीं उद्यां जर अफगाणच्या अमिरानें हिंदुस्थानवर स्वारी केली, तर त्याला कायावाचामनें करून मदत करण्यासाठीं धावून जाणें हें प्रत्येक सच्च्या मुसलमानाचें कर्तव्य आहे."

महंमदअलींचें दुसरें आक्षेपार्ह भाषण मद्रास मॉस्लेम स्वयंसेवकांपुढें झालें. त्या भाषणांत गुन्हेगारीचें जहर सांठवलें आहे असें सरकारी मत असल्यानें त्याचा उल्लेख येथें करणें अगत्याचें झालें आहे. त्या भाषणांत त्यांनीं आयर्लंडनें स्वातंत्र्याविषयीं चालविलेल्या धडपडीचा थोडक्यांत इतिहास सांगून आयरिश लोकांनीं त्यांच्या वाटेंत येणारें इंग्रज सैन्य कसें कापून काढलें व इंग्रजांना कसें कठोरपणानें वागविलें याचें वर्णन केलें. असला अत्याचारांचा मार्ग आपण आपल्या हिंदी स्वयंसेवकांना मुळींच दाखवून देणार नाहीं असें ते ह्मणाले. याचा अर्थ ते अत्याचार

किंवा रक्तपात यांना भीत होते असें नव्हे; उलट एका काळीं अत्याचारावर पूर्ण भरंवसा ते ठेवीत असत. पण अत्याचार ही स्वातंत्र्यसाधनाची एकच गुरुकिल्ली जगांत आहे असें नाहीं. अत्याचार ही कांहीं भली गोष्ट नव्हे. लढाई करणें ही एक वाईटांतील वाईट गोष्ट आहे, पण लढाईपेक्षांही वाईट अशा कांहीं गोष्टी आहेत. त्या सर्वांच्या कचाटींतून मोकळे होण्यासाठीं आपण हिंदुस्थानांतील खेड्यापाड्यांतून आपली असहकारितेची चळवळ चालविली, तर आपल्याला स्वराज्य मिळण्याला कालावधी नाहीं, तें एका महिन्यांत किंवा वेळीं एका आठवड्यांतही मिळेल. मी असें विधान करतों याचें कारण हिंदी जनतेच्या अनत्याचारी शांततावृत्तीवर माझा पूर्ण भरंवसा आहे...नुसतीं व्याख्यानें देऊन आह्मांला कार्यभाग साधावयाचा नसून प्रत्यक्ष कार्याच्या योगानें सरकारनें केलेल्या अत्याचारांना आह्मी आळा घालूं शकतों असें मला सर्वांच्या निदर्शनाला आणून द्याव-याचें आहे. सरकारला स्वतःची अन्यायाचीं कर्में निस्तरण्याची आह्मी संधी देत आहों. तेवढ्यांत तीं निस्तरलीं गेलीं नाहींत तर मग तीं आह्मांला निस्तरावीं लागतील. हें लक्षांत ठेवा कीं, भर राष्ट्रीय सभेंत हिंदुस्थानचें पूर्ण स्वातंत्र्य (Absolute Independence)पुकारण्याच्या विरुद्ध हा महंमद अली होता. याचें कारण इतकेंच कीं, माझ्या मनांतून इंग्रजांना सिध्या वृत्तीनें वागण्याची आणखी एक संधी मला द्यावयाची होती. त्यांना ती संधी घेऊं द्या. केवळ सरकारला नमवावयाचें ह्मणून नमवावयाचें ह्या मताचा मी नाहीं, तसेंच हें सरकार परकी आहे ह्मणून त्याचा आह्मी द्वेष करतों असें नाहीं. याच्या जागीं जर एखादें हिंदी पण असेंच 'सैतानी' सरकार असेल तर त्याचाही आम्ही असाच द्वेष करूं......स्वराज्याचा हा मंत्र व्यक्तीव्यक्तीच्या अंतःकरणांत बाणेल तेव्हांच हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल. व्यक्तीव्यक्तीचें स्वातंत्र्य परिणामीं राष्ट्राच्या स्वातंत्र्यांत परिणत होत असतें... तुम्ही सर्व स्वयंसेवकांनीं

ह्या चळवळीच्या, ह्या प्रसंगाच्या होमकुंडांत उडी घालावी असा माझा आग्रह आहे. तेथें तावून सुलाखून तुम्ही परिस्थितीच्या ऐरणीवर ठेवले गेलां म्हणजे आपले पुढारी तुमच्यावर अनेक घणांचे घाव घालून तुमची परिक्षा पहातील, तेव्हां तुम्ही आपली पोलादी वृत्ति, दिलाचा कणखरपणा सिद्ध करून दाखवाल. तुमच्या दिलाचें पोलाद बनलें पाहिजे. त्या पोलादाच्या साह्यानें आम्हांला आमच्या फार मोठ्या व धीट अशा शत्रूशीं झगडावयाचें आहे."

दरम्यान लॉर्ड चेल्म्सफोर्ड यांची मुदत संपून लॉर्ड रीडिंग हे नवे व्हाइसरॉय आले. त्यांना एकंदर परिस्थितीचा विचार करावयाचा होता. कारण ते विलायतेंत एक अत्यंत थोर न्यायाधीश म्हणून नांवाजलेले असून हिंदुस्थानच्या लोकाना आपण खुला न्याय ( Unfettered justice ) देण्यासाठीं जात आहों अशी त्यांनीं विलायतेंत आगाऊच हाकाटी केली होती. त्यांच्या विचारी स्वभावामुळें महंमदअलींच्या वरील भाषणांबद्दल त्यांच्यावर कायदेशीर इलाज करण्याचें काम जरा लांबणीवर पडलें. दुसरी अडचण म्हणजे महात्मा गांधींनीं ह्या चळवळीच्या बाबतींत अलीबंधूंच्या मतांशीं आपलीं मतें पूर्णपणें जुळतात असें जाहीर करून त्यांच्यांतच स्वतःला गोंवून घेतल्यामुळें परिस्थिती जरा नाजूक झाली होती. आतां अलीबंधूंवर कायदेशीर इलाज करावा तर महात्मा गांधींवर थोडें फार प्रकरण शेकवण्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण जर का गांधींवर सरकारनें डोळे वटारले तर सर्व देश इतक्या जळफळाटानें सरकारवर डोळे वटारणार कीं, त्या जाळानें सरकार होरपळून जाईल !

पण ह्या सर्व आपत्तींतून सरकारला एका अकल्पित उपायानें बाहेर पडतां आलें. पंडित मालवीयांच्या शिष्टाईमुळें महात्मा गांधी व व्हाइसरॉय यांच्या भेटीचा योग जुळून आला. व्हाइसरॉयांनीं अलीबंधूंच्या वरील भाषणांविषयीं महात्माजींशीं बराच वेळ खलबत केलें व हा प्रकार असाच राहूं दिला तर विघातक होईल यासाठीं अली-

बंधूंनीं वरील भाषणांत आपला कोणताच अत्याचाराचा हेतु नव्हता वगैरे खुलासा करून जनतेमधील संशय दूर करावा व सरकारलाही त्यांच्याविरुद्ध कायदेशीर इलाज करण्यास भाग पाडणाऱ्या प्रसंगांतून सोडवावें असें महात्माजी व व्हाइसरॉय यांच्या भेटींत ठरलें. महात्माजी सरळ मनाचे महापुरुष पडले. त्यांनीं ताबडतोब अलीबंधूंना तसा खुलासा करण्यासाठीं लिहिलें, व अलीबंधूही महात्माजींप्रमाणेंच साधे माणूस असल्यानें त्यांनीं ताबडतोब पुढीलप्रमाणें खुलासा महात्माजींपाशीं पाठविला:—

" आमच्या कांहीं भाषणांत अत्याचारांना उत्तेजन देण्याला कारणीभूत होणाऱ्या विधानांची झांक मारते असें आमच्या कांहीं स्नेह्यांनीं आमच्या निदर्शनाला आणून दिलें आहे.. अत्याचाराचीं तत्वें लोकांच्या मनावर बिंबविण्याचा आमचा कधींही मानस नव्हता, व आमच्या भाषणांतील एखाद्या भागाचा अत्याचाराला पोषक असा निष्कर्ष निघेल अशी आमची कल्पनाही नव्हती. पण आमच्या मित्रांची विचारपरंपराही आम्हांला चांगली कळते; यामुळें आमच्या भाषणांतील ज्या भागाविषयीं अत्याचारी मतांचा वास येतो, ते शब्द बोलून गेल्याबद्दल आम्ही दिलगीर आहों. आम्ही या वेळीं असेंही स्पष्ट जाहीर करतों कीं, जोंपर्यंत आम्ही अनत्याचारी असहकारितेच्या व्रताचा अंगिकार केला आहे, तोंपर्यंत आम्ही प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः सध्यां किंवा भविष्यकाळींही अत्याचार प्रतिपादन करणार नाहीं, किंवा अत्याचाराला पोषक असें वातावरणही तयार करण्याला कारणीभूत होणार नाहीं. असें आचरण करणें हें असहकारितेच्या तत्वाच्या विरुद्ध आहे, व आम्ही तर अनत्याचारी असहकारितेची शपथ घेतली आहे. "

वरील खुलाशाचा अर्थ ज्याला जसा वाटला तसा त्यानें घेतला. अँग्लोइंडिअन पत्रांनीं त्याचा माफी असा अर्थ घेऊन कैदेच्या संकटांतून सुटण्यासाठीं अलीबंधूंनीं ही माफी मागितली असा डांगोरा पिटण्यास

सुरवात केली. नेमस्त पक्षाच्या कांहीं पत्रांनींही ह्या परिस्थितीचा अत्यंत हलक्या मनानें उपयोग करून घेतला. अलीबंधूंनीं माफी मागितली असा जिकडे तिकडे अलीबंधूंच्या व असहकारितेच्या शत्रूंनीं गवगवा केला. परदेशांतही ह्या माफीची बरीच ओरड होऊन कुत्सित टीकाकारांच्या टीकेचे कांटे अलीबंधूंच्या आंगाला बोचूं लागले. ह्या गवगव्यामुळें हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीवर फार अनिष्ट परिणाम होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हां निरुपायास्तव महात्मा गांधींनीं ही पडद्याआडची गोष्ट उजेडांत आणली तसेंच अलीबंधूंनींही आपल्या निश्चयापासून रेंसभरही न ढळतां आपला धर्म व आपला देश यांच्या मंगलासाठीं आपण आपलें स्वातंत्र्यचसें काय, प्राणही गमावण्यास तयार असल्याचें जगजाहीर केलें, त्यानंतरचीं त्यांचीं भाषणेंही इतकीं जळजळीत व पूर्वींप्रमाणेंच स्फूर्तिदायक होतीं कीं, ते भित्रे नाहींत हें सिद्ध करण्याला तेवढा पुरावाही पुरेसा होता. अलीबंधूंसारख्या सिंहाच्या छाव्यांच्या ठिकाणीं भित्रेपणाचा संशय घेणें ही मात्र भित्रेपणाची द्योतक गोष्ट आहे खरी !

---

## महंमदअलींना पकडलें !

माफीचें गौडबंगाल वरच्याप्रमाणें झाल्यावर थोड्याच दिवसांत पुन्हां वातावरण क्षुब्ध झालें. तर्कच करावयाचा, तर राजकारणाचें सामान्य वारें लागलेल्या व ज्याला इंग्रजी राज्यकारभाराची वरवर तरी माहिती आहे, अशा कोणालाही वरील माफीप्रकरणाचा अर्थ तेव्हांच कळून येईल, व त्यांतील सरकारी डावपेंचांची मख्खी तेव्हांच उमगेल. अलीबंधू हे दिवसेंदिवस हिंदुस्थानचे पंचप्राण बनत चालले होते, व ते अत्याचाराचे कैवारी आहेत असा सर्वसामान्य ग्रह असतांही त्यांनीं अनत्याचारी असहकारितेचें व्रत महात्मा गांधींच्या

बरोबरीनें स्वीकारलें, आतां त्यांच्यापुढें आपल्या डावपेंचांची धडगत लागावयाची नाहीं अशी बालंबाल खात्री झाल्यामुळें कोणत्या ना कोणत्या उपायानें जनतेच्या हृदयांतील त्यांचें अद्वितीय पुढारीपणाचें आसन डळमळीत करण्यासाठीं, त्यांना लोकांत नामोशी आणण्यासाठीं हा उपाय सुपीक सरकारी डोक्यांतून निघाला असावा. पण त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं, तेव्हां अल्लीबंधूंची मुस्कटदाबी करण्याची आवश्यकताही अर्थात कमी झाली नाहीं. आतां काय करावयाचें हा अर्थातच जबाबदार राज्यकर्त्यांपुढें एक महत्वाचा प्रश्न होता.

पण वरचा प्रश्नही फार कुशलपणें सोडवला गेला. पार्लमेंटांत निरनिराळे सभासद असहकारिता, महात्मा गांधी व अल्लीबंधू यांच्या विरुद्ध वाटेल तसें अद्वातद्वा बोलून सरकारला टिवल्या बावल्या दाखवूं लागले. यावेळीं जर ह्या पुढाऱ्यांविरुद्ध व ह्या चळवळीविरुद्ध कडक उपाय सरकारनें योजिले नाहींत तर हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राज्याला जबरदस्त धोका बसणार असें रडगाणें विलायतेंतील अनेक वडेवडे हिंदुस्थानचे हितशत्रू रडूं लागले. अशा प्रकारच्या कावेबाजीची परिसीमा दिवसेंदिवस जास्त जास्त होऊं लागली, तेव्हांच प्रत्येकाला वाटलें कीं, अल्लीबंधूंवर भविष्यकाळीं ओढवणाऱ्या संकटांचीं हीं अमंगळ चिन्हें आहेत.

असले अपशकून कधीं खोटे होत नसतात, ह्या सिद्धांताला महंमदअल्लींचें उदाहरणही अपवाद ठरलें नाहीं. महंमदअल्ली महात्मा गांधींबरोबर मद्रास इलाख्यांत दौऱ्यावर असतां विजगापट्टण येथें उतरले. तेथें दोघांचींही भाषणें व्हावयाचीं होतीं. पण त्यांच्या भाषणाऐवजीं त्यांच्याविषयीं निराळी अमंगल वार्ता ऐकण्याचें तेथील नागरिकांच्या व सर्व हिंदुस्थानच्या कपाळीं असल्यामुळें विजगापट्टणाच्या डि. मॅजिस्ट्रेटनें क्रि. प्रो. कोडच्या १०७ व १०८ कलमान्वयें त्यांना कैद केलें. ही कैद म्हणजे त्यांच्यावर पुढें होणाऱ्या खटल्याची केवळ रंगी तालीम होती. सरकारला त्यांच्यावर खटला करा-

वयाचा होता तो निराळाच; तो कराची येथील खिलाफत परिषदेंत त्यांनीं केलेल्या भाषणाबद्दल करावयाचा होता. पण त्याला थोडासा अवधी होता, म्हणून हे सारे उपद्व्याप सरकारी अधिकाऱ्यांना करावे लागले.

महंमदअल्लींना कैद केल्याबरोबर स्पेशल आगगाडींतून कराचीला पाठविण्यांत आलें. त्यावेळीं त्यांच्याबरोबर व ठिकठिकाणीं स्टेशनवरही पोलीस पहाऱ्याला—किंवा तैनातीला म्हणावें पाहिजे तर—होते. त्यांच्या कैदेची बातमी शक्य तों गुप्त ठेवण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या जिवाची जालियनवाला बाग करून सोडली. पण एवढी महत्वाची बातमी अशानें लपते थोडीच ! सरकारच्या पहारेकऱ्यांना न जुमानतां ठिकठिकाणच्या स्टेशनावर प्रचंड लोकसमूह जमून आपल्या ह्या वंदनीय पुढाऱ्यांचें भारावलेल्या अंतःकरणानें खड्या सुरांत स्वागत करीत होता, “ अल्ला हो अक्बर ! ”

कराचीला महंमदअल्लींना नेण्यांत आल्यावर तेथें खटल्याची सर्व प्राथमिक तयारी मॅजिस्ट्रेटसमोर झाली. नंतर खटला सेशनकमिट करण्यांत आला. त्या खटल्याचें वर्णन करीत बसण्याचें हें स्थळ नव्हे. येथें इतकेंच सांगावयाचें कीं, महंमदअल्लींच्या कैदेनें सारा हिंदुस्थान हादरून गेला. त्यांतली एवढी मजा मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, त्या खटल्यामुळें महंमदअल्लींनाही वाईट वाटलें नाहीं, किंवा इतर खऱ्या असहकारितावाद्यांनाहि वाईट वाटलें नाहीं. असहकारितेचा अवलंब करणें म्हणजेच राजद्वारींच्या यातनांना आव्हान करणें. त्यांत सुखदुःखाचा संबंध येतो कोठें ? पण देशांत सर्वत्र सरकारच्या ह्या कृत्याचा तीव्र निषेधही झाल्याशिवाय राहिला नाहीं. नाहीं म्हणायला ॲंग्लोइंडियन वर्तमानपत्रांनीं मात्र टाळ्या पिटल्या, पण त्यांत नवीन तें काय आहे ! तशांत पहिल्यानें सर्व जनता खवळेल व सरकारला खाऊं किंवा गिळूं करील असें तरी भय होतें. पण अनत्याचारी असहकारितेचें व्रत सर्व जनतेनें पत्करलें असल्यामुळें तेंही फिटलें. मग महंमदअल्लींच्या शत्रूंच्या खुनशीपणाला उधा-

नाची भरती आल्याशिवाय कशी राहील ?

ज्या आरोपाबद्दल महंमदअल्लींना पकडलें, त्याच आरोपाबद्दल मौ. शौकतअल्ली, डॉ. किश्लु वगैरे दुसऱ्या सहा पुढाऱ्यांनाही पकडण्यांत आलें. लौकरच राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटीची सभा भरून अल्लीबंधू व इतर मुसलमान पुढारी यांच्याविषयीं पूर्ण आदर व्यक्त करण्यांत आला व हिंदु-मुसलमानांच्या एकीचा ताम्रपट खरें पाहिलें तर त्या दिवशीं गांधी, दास, केळकर, नेहरू, राजगोपाळाचारिअर वगैरे पुढाऱ्यांच्या सहीनिशीं हिंदुस्थानच्या हातीं पडला. सर्वांनीं मुसलमान पुढाऱ्यांना सरकारनें कैद केल्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त केला; हिंदुस्थानच्या कोनाकोंपऱ्यांतून निषेधाचा पाऊस सरकारच्या मस्तकावर पडला. पण सरकार कसलें खंबीर ! त्यानें ह्या निषेधाला धूप घालूनही विचारलें नाहीं. याचा परिणाम सरकारला पुढें युवराजांच्या भेटीच्या वेळीं बहिष्काराच्या रूपानें भोगावा लागला ही गोष्ट अगदीं निराळी !

राजकीय खटला म्हटला कीं त्याच्या दोन बाजूंचा विचार शहाण्या माणसानें कधीं तुलनात्मक दृष्टीनें करूंच नये. सरकारच फिर्यादी, सरकारच न्याय देणार, सरकारचाच पुरावा, सरकारचेच साक्षीदार, गुळाचा गणपती व गुळाचाच नैवेद्य अशांतला सारा प्रकार ! मृत्यु एखाद्या जीवाला मारतांना कोणत्या तरी रोगाचें निमित्त पुढें करतो व राजकीय खटल्यांच्या बाबतींत एखाद्या पुढाऱ्याला शासन करतांना सरकार त्याच्यावर खटला करतें. अशा खटल्यांत आरोपीनें आपला बचाव करण्याच्या भानगडींत पडणें शहाणपणाचें नसतें. या न्यायाला अनुसरून व असहकारितेच्या शपथेला स्मरून महंमदअल्लींनीं स्वतःचा खटला चालवला नाहीं. सरकारी न्यायाधिशाला करावयाचा होता तेवढा न्यायाचा तमाशा त्यानें केला व शेवटीं त्यांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली !

# तुरुंगवासांतून सुटका व पुन्हां राजकारण.

महंमदअल्लींच्या दोन वर्षांच्या शिक्षेची मुदत हां हां म्हणतां संपली. त्यांना पहिल्यानें कराची येथील तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. त्यानंतर ते व डॉ. किश्लू यांची धुळयाच्या तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. पण पुन्हां सरकारचा हुकूम कां फिरला नकळे, दुसऱ्याच दिवशीं धुळयाहून त्यांना विजापूरच्या तुरुंगांत नेण्यांत आले. त्यावेळीं प्रस्तुत चरित्रलेखक हा लोकशाहीचा संपादक या नात्यानें त्याच्या वांट्याला आलेली एक वर्षाच्या सक्तमजुरीची राजद्रोहाच्या आरोपाबद्दलची शिक्षा धुळयाच्या तुरुंगांत भोगीत होता.

महंमद अल्लींच्या शिक्षेची मुदत पुरी होण्यापूर्वी चार दोन दिवस त्यांना विजापूरहून झांशीच्या तुरुंगांत नेऊन ठेवण्यांत आलें होतें. तेथून त्यांची ता. २९ आगष्ट रोजीं सुटका झाली. त्यांच्या सुटकेकडे सर्व देश तीव्र उत्कंठेनें डोळे लावून बसला होता, त्यानें ते सुटून येतांच त्यांचें अपूर्व स्वागत केलें. ठिकठिकाणीं त्यांना मानपत्रें देण्यांत आलीं, त्यांच्या मिरवणुकी काढण्यांत आल्या व त्यांच्या गौरवपर सभा भरवण्यांत आल्या. तुरुंगाबाहेर येतांच त्यांनीं पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ती असहकारितेच्या कार्यक्रमावरील आपली अढळ श्रद्धा जाहीर करण्याची. त्यानंतर पण तितकीच महत्वाची कामगिरी त्यांनीं जी सध्यां शिरावर घेतली आहे ती महात्मा गांधींना सोडवून आणण्यासाठीं येरवड्याच्या तुरुंगाची किल्ली शोधण्याची !

आतां प्रचलित राजकारणाच्या दृष्टीनें महंमदअल्लींच्या आयुष्याचा विचार करावयाचा, तर आजला ते सुटका होऊन हिंदी राजकारणाची तुफान नौका चालविण्याला लायक असे कुशल कर्णधार ऐन वेळीं लाभले, यांतच हिंदी राष्ट्राचा काय तो तरणोपाय आहे.

असहकारितेची चळवळ सुरू झाल्यापासून हिंदुस्थानचें वातावरण

हरघडी सारखें बदलत आहे. हिंदुस्थानच्या कमनशिबानें ह्या चळवळीच्या प्रारंभापासूनच कांहीं कांहीं कर्ते राष्ट्रीय पुढारी महात्मा गांधींशीं निदान ह्या चळवळीपुरते तरी नेहमीं फटकून वागत आहेत. त्यांच्या राजकारणी असमाधानतेला पहिल्यानें अलीबंधूंच्या कारागृहवासाच्या वेळीं ऊत आला, व त्यानंतर महात्मा गांधींना सरकारनें तुरुंगांत लोटल्यावर तर त्या मंडळींनें असहकारितेच्या चळवळीविरुद्ध उघड उघड बंड उभारण्याची तयारी केली. हें बंड हिंदुस्थानच्या अहितासाठीं उभारण्यांत यावयाचें नव्हतें हें खरें; पण तें बंड होतें, व त्या बंडांत विशेषतः कौन्सिल बहिष्काराच्या बाबींत असहकारितेचा पाडाव झालेला पाहून त्या बंडखोरांना समाधान वाटलें असतें.

ह्या बंडाची बोलाचाल सुरू असतांच देशबंधू दास यांची तुरुंगांतून मुक्तता झाली. त्यांनीं राजकारणाचा खोल विचार करून कौन्सिलांत जाऊन असहकारिता करण्याच्या नव्या कल्पनेला चालना दिली. पण सर्व जनता कौन्सिलांत जाऊन असहकारितेशीं बेइमानदारी पत्करण्यास तयार नसल्यानें कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेंत असहकारितेचाच ठराव पुन्हां पास झाला. त्यामुळें दासबाबूंना स्वमत–प्रतिपादनासाठीं श्री. नरसोपंत केळकर, पंडित मोतीलाल नेहरू, श्री. विठ्ठलभाई पटेल वगैरे पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्यपक्षाचा सवता सुभा स्थापन करावा लागला. राष्ट्रीय सभेंत जर दासबाबूंच्या व इतर त्याच मताच्या पुढाऱ्यांच्या शब्दाला योग्य तो मान जनतेनें दिला असता, तर स्वराज्यपक्षाचा सवता सुभा खास स्थापन झाला नसता. वस्तुस्थितीचा विचार केला तरीसुद्धां हिंदुस्थानच्या सध्यांच्या परिस्थितींत असहकारितेची सध्यांची चळवळच काय ती मार्गदर्शक असतांहि तिच्याशीं ज्यांचा विरोध आहे अशा विचारणीय पुढाऱ्यांचीं भिन्न भिन्न मतें विचारांत घेणें अवश्य होतें. कारणें कांहींही असोत; पण असहकारितेची चळवळ कांहीं अंशीं

अपुरी पडली, म्हणून तर प्रतियोगी सहकारितावाद्यांना किंवा याहीपेक्षां स्पष्ट बोलावयाचें तर फेरवाल्यांना कौन्सिलाचा हट्ट धरण्यास फावलें.

दुसरी गोष्ट; स्वराज्यपक्षही ज्याची सहज उपेक्षा करतां येईल इतका दुबळा नाहीं. दास, केळकर, नेहरू वगैरे कितितरी बडीबडी श्रद्धापूर्वक राष्ट्रकार्य करणारी पुढारी मंडळी त्या पक्षाचे घटक आहेत. अशा कार्यकर्त्या पुरुषांवरच हिंदी राष्ट्रीय चळवळीचें यशापयश अवलंबून असल्यामुळें त्यांना बाहेर सोडून राष्ट्रीय सभेलाही कांहीं करतां आलें नसतें.

फेरवाले व नाफेरवाले अथवा प्रतियोगी सहकारितावादी व व असहकारितावादी यांच्यांत मुख्यतः मतभेद कोठें असेल तर तो बहिष्काराच्या बाबतींत. व त्यांतल्या त्यांत कौन्सिलबहिष्कार हा विशेष महत्वाचा. त्या प्रश्नाला ह्या वर्षीं तीव्र स्वरूप यावयाचें कारण कौन्सिलांच्या निवडणुकी ह्या वर्षीं नव्यानें व्हावयाच्या हें होय. या वेळीं आपण पूर्वींप्रमाणेंच कौन्सिलें गमावलीं तर पुन्हां नव्या निवडणुकीची वाट पहात तीन वर्षे पर्यंत आपल्याला मूग गिळून स्वस्थ बसावें लागणार, ह्या अडचणीमुळें फेरवाला पक्ष राष्ट्रीय सभेची कौन्सिलप्रवेशाला मान्यता मागत होता. राष्ट्रीय सभेची मान्यता त्यांना एवढ्याच साठीं हवी होती कीं, त्यामुळें राष्ट्रीय सभेनें कौन्सिलवाल्यांवर किंवा कौन्सिलवाल्यांनीं राष्ट्रीय सभेवर बहिष्कार घातला असले दोषारोप एकमेकांवर एकमेकांनीं केलेले ऐकून घेण्याचें पाप कपाळीं येऊं नये.

ह्या—फक्त ह्या एकाच—कारणासाठीं असहकारितावादी पक्षानें केवळ आपद्धर्म म्हणून गम खावयाला व स्वराज्यपक्षाशीं तडजोड करायला हवी होती. असहकारितेचा पराजय झाला म्हणून नव्हे, तर कमनशिबानें असहकारितेचीं महान् तत्वें आपणांमधलिच कांहीं महान् पुढाऱ्यांना मान्य होत नाहींत, व त्यांच्यामुळें राष्ट्रकार्याचा तर

घोंटाळा होतो, अशा वेळीं थोडीशी माघार घेऊन कार्यकर्त्या माणसांची एकी साधणेंच निर्वाणींचें साधन होय.

ह्या गोष्टीचा फेर विचार करण्यासाठीं दिल्लीयेथें गेल्या सप्टेंबर १९२३ मध्यें जी जादा राष्ट्रीय सभा भरली, त्या सभेंत महंमदअली होते, म्हणूनच बहुतांशीं फेरवाला पक्ष व नाफेरवाला पक्ष यांचा समेट झाला असें म्हटलें पाहिजे. नाहीं तर एका बाजूनें फेरवाला पक्ष बेदरकारपणें राष्ट्रीय सभेच्या आज्ञेला धाब्यावर बसवून कौन्सिलांत जाण्यास तयार होता, तर दुसऱ्या बाजूनें राष्ट्रीय सभेंत व राष्ट्रीय पक्षांत दुफळी झाली तरी पत्करली, कौन्सिलांत पाऊल ठेवावयाचें नाहीं असें हट्टानें म्हणणारा नाफेरवाला पक्ष होता.

मौ. महंमदअली हे अशा आणीबाणीच्या वेळीं नाफेरवाल्या पक्षाला ताब्यांत ठेवण्याला तयार होते, म्हणूनच कौन्सिलवाल्या फेर पक्षाच्या कौन्सिलप्रेमाला राष्ट्रीय सभेंत मुकी मान्यता मिळाली. म्हणूनच दुफळीचा प्रसंग टळून राष्ट्रीयसभेची अब्रू बचावली गेली. आतां कौन्सिलाचे कैवारी लोक कौन्सिलांत जाऊन, तेथें ठेचा खाऊन पुन्हां पूर्ण असहकारिता करण्यासाठीं, बहिष्काराचीं तत्वें नव्या जोमानें आचरणांत आणण्यासाठीं राष्ट्रीय सभेच्या पायीं धरणें धरून बसतील तेव्हां राष्ट्र त्यांना प्रेमानें कुरवाळून त्यांच्या तोंडांत साखर घालील व एकजुटीनें पुन्हां असहकारिता अक्षरशः यशस्वी करण्याच्या उद्योगाला लागेल.

आतां महंमदअली कोकोनाडा येथें येत्या डिसेंबर १९२३ मध्यें भरणाऱ्या राष्ट्रीय सभेचे नियोजित अध्यक्ष आहेत, तेथें व त्यानंतरही पुढारी या नात्यानें ते एकीच्या तत्वाला साजेशी कामगिरी करून राष्ट्राचें तोंड उजळ करतील, अशी आशा आहे, अशी कामगिरी करण्याला त्यांना उदंड आयुष्य, उत्साह व शक्ती द्यावी अशी परमेश्वराला शेवटची प्रार्थना आहे.

ॐ तत्सत.

ग्रंथालय
२२
ग्रं. क्र.